Regd-No. N150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१ ] आकोला—सोमवार तारीख ७ माहे मे सन १९१७ ई० [ अंक १८

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........२ रुपये.
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल

## जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला १।१।०९ } Lyon Scott एजंट
नो नं १

## सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**—उत्तम पानें व टिकाऊ पक्का रंग किंमत ।||, १, १।, १||, २, २||, ते ५ रु. प. **बुद्धीबळजोड लांकडी**— किंमत ।||। १, १||, २ ते ४ रु. प. **सोंगट्या जोड**— किंमत ।, ||, ।||, १, १||, रु. प. **खडावा जोड**— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान घाऊक व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट

डी. आर. आळवणी, स्टेट सावंतवाडी
नो. नं. ३

## रोल्डगोल्ड सोन्याचे

### कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. रु. ३-४; गोट जोडी २-२||; पाटल्या जडी २-२||; वज्रटीका ३-४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४-५. शिप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सराची २-३-४; अंगठी १; सले अष्टपैलू जोडी १|| बांगड्या जोडी २-२||. सरी ४

### केंस काळे करण्याचा साबण.

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाकसची किं. १|| रु.

पत्ता— मगनलाल के आणि कंपनी
गिरगांव— मुंबई
नो० नं० ५

अगोदर हे वाचा नंतर निराश व्हा.

## नशिबाची— परीक्षा.

सवलत— पुढील पांच कामें एकावेळीं मागविणारास २||. रुपयांत पाठवूं, किरकोळ एकेका कामास पुढील प्रमाणें फी पडेल. (१) इच्छेप्रमाणें वाटेल त्या पांच प्रश्नांचे उत्तरास १। रु (२) एक वर्षाचे वर्ष फलास १|| रु. (३) छापील फार्मावर सर्व माहिती सह पत्रिकेस १। (४) जन्म कुंडलीवरून सुप्रसिद्ध ग्रंथाधारें आयुष्य अखेरपर्यंतची फलें लिहून पाठविण्यास १||. रु. (५) इच्छित कार्यांत यश येऊन अनिष्ट ग्रहाची पीडा निरसन व्हावी त्या करितां एका महान सिद्ध पुरुषाचा प्रासादिक ताईतास ३।. सूचना— ग्राहकांनीं वरील कामा करितां साग्रजन्मकाल व प्रश्नवेळ व वय लिहून कळवावें. विशेष खुलासा पत्रद्वारें उत्तरास ८/- आण्याचे तिकिट पाठवावें.

ज्यो. डि. टि. मायधनी
म्या. ज्योतिषकार्यालय. चांदडकर
पेठ— नाशिक
नो० नं० ७३

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H L. Batliwala Sons & Co. Ltd.**
N. N. 6 Dadar Bombay

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशाजोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदी अग्रफुलें सार्धी व घागऱ्याचीं वगैरे सजातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या चाळ, उपकरणीं, ताटें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोन्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तालून पाहावें गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रेल्वेनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर

FOR A SHORT PERIOD ONLY.
Free.

A BEAUTIFUL LEVER WATCH.

Guaranteed for 2 Years.

Every purchasers of our reliable golden studs and links at Rs. 2-15-0 will be presented with the said watch absolutely free. The golden studs and links and the above watch will be sent in one parcel. Remit early to avoid disappointment.

ONLY FOR A SHORT PERIOD.
*good Bargains Rare opportunity*

## Money Refunded If Not Satisfied.

To avoid disappointment send us a Money order of Re 1-15-0 we will send any of the following you require. Orders by V. P. P. will be executed only on receipt of 3 annas stamps which is extra.

GEO. MACFARLANE & Co.,
G. T. MADRAS,

One Gents Best lever watch.
One Set of Rolled Gold Studs & Links (Guaranteed for 3 Years.)
One Set of real solid silver studs & Links
One Beautiful rolled gold chain (Guaranteed 3 Years.)
One Pair of Rolled gold Spectacles (Guaranteed for 3 Years.)
One Best fountain pen fitted with 14ct solid gold Nib.
One Austrian siver Newada Cup.
One self Shaving safety Razor.
One Bottle hair oil (scented) with a nice comb one looking-glass and a brush

N. N. 103

## काश्मीरी केशर.

पवित्र आणि अस्सल १८८ उत्तम कस्तुरी ३५, शुद्धशिलाजीत ८८ सुर्मा ममीरा ३ तो अंगूरी हींग २।, सुगंधित जीरा १ कागजी बादाम ८९ पौंड, बादाम मुरब्बा २ पौं. टिन १

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५
नो० नं० ९

## Notice

Notice is hereby given that the Municipal Committee of Khamgaon in the Buldana District propose to impose a tax on dogs kept within the limits of the Khamgaon Municipality under section 41 (1) (A) (c) of the Berar Municipal Law, 1886 The tax will be fixed at 0–8–0 per dog per annum subject to a maximum of 5 per annum from any individual. Pups under 6 months old on April 1 st. will not be taxed.

The proposal will be taken into consideration on the expiry of one month from the date of first publication of this notice and any objections in respect thereof must be forwarded to the Secretary of the Municipal Committee before the expiry of the said period.

G. R. Kothare
Vice Chairman
Municipal Committee
Khamgaon.

No. N 195

## Notice

In the Court of the Subjudge
Khamgaon.

Notice to creditors of application for discharge under Sect 44 (1)
Insolvancy case N. 35
1915

Applicant—Kundanmal Agarchand Marwadi of Khamgaon

Take notice that the above named insolvant has applied to this court for his discharge and that the court has fixed 22 nd day of June 1917 for hearing the application.

R. M. Wathodker
Subjudge
Khamgaon.

No. N 196



# वऱ्हाडसमाचार

वैशाख शुद्ध १५ पिंगल संवत्सर १८३९


## देशी संस्थानिक आणि ब्रिटिश सरकार.

मार्चच्या इंडियन रिव्ह्यूच्या अंकांत हिंदुस्थानांतील देशी संस्थानिक आणि ब्रिटिश सरकार यांच्यामधील परस्परसंबंध या विषयावर एक सुंदर लेख आलेला आहे. ऐतिह्यसिक माहितीच्या दृष्टीनें तो अगदीं निर्व्यंग आहे; लेख लिहिणाराची दृष्टि व्यापक, देशाभिमानाची, आणि लिहिण्याची शैली ही भारदस्तपणाची आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या काळापासून तों आजतागाईत कंपनीसरकारानें व पुढें ब्रिटिश सरकारानें निरनिराळ्या वेळीं कालमान व स्वतःचें हित साधण्यास अनुकूळ असे प्राप्त झालेले प्रसंग पाहून देशी संस्थानिकाविषयींच्या आपल्या धोरणांत कसे कसे फेरफार केले; संस्थानिकांच्या कारभारांत हात न घालण्याचा आपला विचार प्रसंगानुरूप भिन्न भिन्न काळीं कसा फिरविला; संस्थानिकांना प्रथम आपले दोस्त, नंतर आपल्या सल्लयानें चालणारे स्नेही, नंतर अंतर्गत कारभारासंबंधानें पूर्ण स्वतंत्र पण इतर संस्थानिकांशीं व परदेशी सरकाराशीं व्यवहार करण्यापुरते आपले अर्धवट अंकित, त्यानंतर डलहौसी साहेबांचे वेळीं राज्याच्या सुव्यवस्थेबद्दल ही कंपनीसरकारला अप्रत्यक्ष रीतीनें जबाबदार, पुढें बंडानंतर उघड रीतीनें ब्रिटिश सार्वभौम सत्ता मान्य करणारे मांडलिक, आणि त्यानंतर मांडलिक राहून ब्रिटिश सरकारशीं सहकारिता ठेवणारे व राज्याच्या अंतर्गत कारभारांत ही रेसिडेंट किंवा पोलिटिकल एजंट यांच्या ओंजळीनें पाणी पिणारे, आणि अखेर लार्ड हार्डिंज यांच्यावेळेस अंतर्गत कारभारासंबंधानें अगदीं स्वतंत्र नसले तरी बरेच स्वतंत्र असलेले संस्थानचे मालक, अशीं आमच्या संस्थानिकांच्या उत्क्रांतीचीं भिन्न भिन्न रूपें वरील लेखकानें स्पष्टपणानें ऐतिहासिक कथानकांत गोंवून दाखविलीं आहेत. हा भाग आमच्यामतें फार सुंदर झालेला आहे. शेवटीं सध्याच्या युद्धानें ज्याप्रमाणें ब्रिटिश सरकारच्या हिंदी प्रजेच्या मनांत आकांक्षा उत्पन्न करून स्वराज्याचे हक्क मागण्यास तिला प्रवृत्त केलें आहे, त्याप्रमाणें देशी संस्थानिकांनीं ही प्रस्तुत युद्धांत ब्रिटिश सरकारला मनापासून साह्य केलें असल्यामुळें त्यांना ही कांहीं ज्यास्ती हक्क मिळविण्याची पात्रता आली आहे या गोष्टीचा अवश्य विचार व्हावा असें सूचित केलें आहे व या आपल्या सूचनेस लंडन टाइम्स सारख्या वजनदार इंग्रजी पत्राचा ही पाठिंबा असल्यामुळें आपली सूचना लवकरच सफळ झालेली पाहण्याचा योग येईल अशी आशा प्रकट करून लेखाची समाप्ति केली आहे

या लेखाच्या शेवटीं जे हक्क संस्थानिकांना मिळावे अशी आशा प्रकट केली आहे ते विशेषतः विचार करण्यासारखे आहेत. पण दुःखाची गोष्ट आहे कीं लेखकानें त्या हक्कांची नुसती यादी मात्र एका पारिग्राफांत देण्यांत इतिकर्तव्यता मानिली आहे. आमच्या मतें हाच भाग हल्लींच्या काळीं विशेष महत्त्वाचा होता. ही यादी तरी काय आहे ती आपण पाहूं या. ब्रिटिश सरकार व देशी संस्थानिकांचा संघ यांच्यामध्यें देह आणि अवयव असा संबंध प्रस्थापित व्हावा; संस्थानिक आणि त्यांची प्रजा यांच्या संबंधाच्या प्रश्नाचा विचार करतेवेळीं संस्थानिकांना म देण्याचा अधिकार मिळावा, इतर संस्थानिकांशीं त्यांचे जे संबंध येतात त्या संबंधानें त्यांना अधिक स्वातंत्र्य मिळावें, त्यांचें इतर संस्थानिकांशीं अधिक मोकळेपणानें दळणवळण राहावें, आणि त्यांना आपल्या राज्यांत हवी ती गोष्ट कोणताही धरबंद न ठेवतां करतां यावी, याप्रमाणें लेखकाच्या संस्थानिकांच्या वतीनें मागण्या आहेत.

या मागण्या नवीन नाहींत. लार्ड चेम्सफोर्ड साहेबांनीं हिंदुस्थानचा राज्यसूत्रें हातीं घेतांच त्यांच्या करवीं दिल्ली येथें जी संस्थानिकांची परिषद भरविण्यांत आली होती तिच्यापुढें श्रीमंत गायकवाड सरकार यांनीं केलेल्या भाषणांत या मागण्यापैकीं बहुतेकांचा समावेश इतक्याच स्पष्टपणानें पण मोठ्या खुबीनें करण्यांत आला होता, व या परिषदेच्या वेळीं लार्ड चेम्सफोर्ड साहेबांनीं केलेल्या भाषणावरून व त्यापूर्वीं जयपूर येथें झालेल्या लार्ड हार्डिंज साहेबांच्या भाषणावरून ही या पैकीं कित्येक मागण्या संस्थानिकांना देण्याचें बहुतेक ठरलें असावें असें अनुमान निघतें. परवा साम्राज्याच्या परिषदेंत बिकानेरच्या महाराजांची नेमणूक झाल्यानें ब्रिटिश सरकारचा देशी संस्थानिकांविषयींचा अनुकूळ ग्रह बहुतेक स्पष्ट केलाच आहे, व या मागण्या संस्थानिकांना मिळाव्या अशीच इच्छा प्रत्येक देशाभिमानी हिंदी गृहस्थ करील यांत शंका नाहीं. पण देशी संस्थानिकांना हे हक्क देण्याशीं ज्यांच्या हिताहिताचा विशेष संबंध येणार ती संस्थानिकांची प्रजा खरोखर काय इच्छित आहे हें पाहिल्याशिवाय संस्थानिकांना एकदम येवढे हक्क देणें वाजवी होईल काय हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. पण आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं संस्थानिकांची वकिली करणारे लेखक बहुधा या प्रश्नाचा विचार कधींच करीत नाहींत. थोड्या दिवसांपूर्वीं सेंट निहालसिंग या सुप्रसिद्ध लेखकानें नाइन्टीन्थ सेंचरी मासिक पुस्तकांत याच विषयावर लेख लिहिला होता त्यांत ही आह्मी आतां दाखविलेलेंच वैगुण्य होतें. आतां मि. रामकृष्ण आयर इंडियन रिव्ह्यूमध्यें लेख लिहितात, तेव्हां ही ते या गोष्टीचा विचार करीत नाहींत. गेल्या आठवड्यांत मद्रासच्या न्यू इंडिया पत्रांत देशी संस्थानिकांच्या तरफदारीचा निर्भीडपणाचा लेख आला त्यांत ही पाहिला तर तोच प्रकार. हॅम्लेट नाटकांतला हॅम्लेटचा पार्ट गाळून बाकीच्या नाटकाचा प्रयोग करावयाचा, त्या प्रमाणें देशी संस्थानांतल्या प्रजेला वगळून देशी संस्थानिकांचे हक्क वाढविण्याची गोष्ट मनांत आणणें हा हास्यास्पद प्रकार नाहीं काय? कारण, देशी संस्थानिकांना ज्यास्त हक्क द्यावयाचे ह्मणजे ते खरोखर कोणाला व कशाकरितां द्यावयाचे? येथें संस्थानिक ह्मणजे व्यक्ति समजणें वाजवी नाहीं. राजा व प्रजा यांच्या संबंधाच्या प्रश्नांत राजाचें व्यक्तीत्व प्रजेंतच लीन होत असतें, निदान तें झालें पाहिजे. तेव्हां देशी संस्थानिकांच्या संबंधानें कोणता ही विचार करतांना व्यक्तिविषयक विचार अजीबात सोडून गादी व त्या गादीची प्रजा यांच्या हिताचें अद्वैत धरूनच तो विचार करणें इष्ट आहे, आणि या दृष्टीनें प्रस्तुतच्या प्रश्नाचा विचार झाला तरच तो देशी संस्थानिकांना व त्यांच्या अंमलखालीं राहणाऱ्या कोट्यावधि लोकांना श्रेयस्कर होईल. या दृष्टीनें अद्याप कोणीच विचार केलेला नसल्यामुळें आह्मी ही विचाराची दिशा धरून कांहीं गोष्टी सुचविण्याचे मनांत आणिलें आहे. पण आजच्या या लेखाची मर्यादा अतिक्रांत झाल्या कारणानें पुढच्या आठवड्यापर्यंत वाट पाहणें भाग आहे.

## कायदा आणि समाजसुधारणा.

समाजांत शिक्षणप्रसार झाला ह्मणजे लोकांना आपल्या चालीरीतींतलीं व्यंगें दूर करण्याची इच्छा आपोआपच होते, आणि ते जातीचे अनवश्यक, अनीतिमूलक, किंवा हानिकारक निर्बंध झुगारून देऊन जातीविरुद्ध बंड करण्यास प्रवृत्त होतात. पण सगळी जातची जात एकदम सुशिक्षित झालेली नसल्याकारणानें जुन्या चालींना वेडगळपणानें चिकटून राहिलेले लोक या बंडखोरांना जाति बहिष्काराच्या वगैरे उपायांनीं शिक्षा भोगण्यास लावून समाजांतल्या दुष्ट चालींना कायमचे अस्तित्व देऊं शकतात. सुधारणेच्या प्रगतीस याच्या योगानें प्रतिबंध होतो. हा प्रतिबंध दूर करण्यास समाजांतल्या व्यक्ती असमर्थ आहेत असें दिसून आलें ह्मणजे त्यांच्या प्रयत्नास कायद्याचें पाठबळ देऊन सुधारणेचा मार्ग निष्कंटक करणें हें सुशिक्षित राज्यकर्त्यांचें कर्तव्य आहे. पण जेथें प्रजेकडून भिन्न जातीचे किंवा धर्माचे राज्यकर्ते असतात, ते अशा कायद्यानें समाजांतल्या बहुसंख्याक लोकांचीं मनें क्षुब्ध होतील कीं काय या भीतीनें समाज सुधारणेसारख्या प्रशंसनीय कृत्याला मदत करण्यास कचरतात. हा अनुभव ब्रिटिश अंमलाखालच्या हिंदुस्थानच्या प्रजेला अनेक वेळा आलेला आहे. बसुबिलाला कौंसिलांत सरकारी कौंसिलराकडून अनुकूळता मिळाली नाहीं ती याच भीतीमुळें. वस्तुतः ही भीति निरर्थक आहे हें सती बंद करण्याच्या, व संमतिवयाच्या कायद्याच्या वेळेस सरकारच्या पूर्ण लक्षांत आलेंच आहे. पण परदेशी, व भिन्न जातीच्या सरकारला रयतेच्या खऱ्या भावनांची योग्य परीक्षा करतां येणें अशक्य असल्यामुळें त्यांच्या हातून अशा चुका होत असतात. देशी संस्थानिकांची स्थिति याच्या उलट आहे. ते व प्रजा यांच्या अंतःकरणांत भावनांची एकतानता असल्यामुळें कोणती समाजसुधारणा किती अंशानें समाजाच्या प्रगतीस अवश्यक आहे येवढें नक्की ठरविणें येवढेंच काय तें काय त्यांना कठीण वाटतें. तें एकदां नक्की ठरलें ह्मणजे ती सुधारणा लोकांच्या मनाविरुद्ध कायद्यानें दडपीत नेल्यास समाजांत कितीशी क्षुब्धता उत्पन्न करील याचें बरोबर मोजमाप त्यांना स्वतःच्या भावनेच्या साह्यानें घेतां येतें, आणि ती क्षुब्धता व सुधारणा घडवून आणण्यापासून होणारें समाजाचें कल्याण यांच्यातला तारतम्यभाव ओळखून ते समाजसुधारणेला कायद्याचें साह्य देण्यास चटकन तयार होतात.

## देशी संस्थानिक आणि सुधारणा.

इंदूर आणि बडोदें हीं दोन संस्थानें आजच्या घटकेला समाजसुधारणेला कायद्याचें साह्य देण्याचें कामीं विशेष तत्परतेनें पुढें आलेलीं दिसतात. इंदूरच्या महाराजांना गादीवर येऊन पांचच वर्षें झालीं आहेत. पण येवढ्यांत त्यांनीं पुनर्विवाहाचा कायदा व सिव्हिल म्यारेज आक्ट हे अमलांत आणून सोडले आहेत, व बालविवाह प्रतिबंधाचा आणि

काडी मोडून देण्याचा असे दोन कायदे तयार करून ठेविले आहेत असें ऐकतों. पहिले दोन कायदे ब्रिटिश हिंदुस्थानांत ही आहेत, पण त्यांच्या पेक्षां इंदूरच्या कायद्यांनीं समाजसुधारणेचा मार्ग अधिक सुगम केला आहे. इंदूरच्या राज्यकर्त्यांना असे कायदे करतांना प्रजेचीं मतें मागवून तिच्यांत क्षुब्धता उत्पन्न करण्यासारखें कांहीं आहे कीं काय हें अजमावून पाहण्याची अवश्यकता दिसत नाहीं. ते एकदम कायदे जाहिर करून मोकळे होतात. कदाचित् हें त्यांच्या तरुण वयामुळें होत असेल, किंवा तेथील प्रजा ज्यास्त सुशिक्षित किंवा ज्यास्त आज्ञाधारक असल्यामुळें होत असेल. बडोद्याचें तसें नाहीं. तेथील महाराज प्रजेच्या मताला अधिक मान देणारे व प्रोक्त विचाराचे असल्यामुळें ते असा एखादा कायदा मंजूर करण्यापूर्वीं त्याचा मसुदा लोकांपुढें ठेवतात, व लोकांकडून येणारे आक्षेपांचा विचार करून मग तो कायदा मंजूर करतात. अशा रीतीनें बडोदें संस्थानानें ही आतांपर्यंत अनेक सामाजिक व्यंगें कायद्यांचें साह्य देऊन दूर केलीं आहेत.

## जातिनिर्बंध नाशक कायदा.

समाजातल्या शारीरिक, नैतिक व सांपत्तिक प्रगतीला अडथळा करणाऱ्या चाली रीतींचा नायनाट करण्याचे कामीं साह्य देणाऱ्या अशा एका कायद्याचा मसुदा बडोदा सरकारानें नुकताच प्रसिद्ध केला आहे. अमुक एक चाल समाजाच्या प्रगतीला हानिकारक आहे असें जाहिर करून तेवढ्या चालीला प्रतिबंध करण्याचा जातीचा अधिकार जातीकडून काढून घेऊन तो कोर्टाकडे देणें हें या मसुद्याचें एकंदर सार आहे. या मसुद्यांत एकंदर सात कलमें आहेत. पैकी पहिलीं तीन औपचारिक आहेत, व शेवटलीं तीन कोर्टाचे विधि वगैरे सांगणारीं आहेत. महत्वाचें कलम एकच—चौथें—आहे, आणि त्यांत ह्मटलें आहे कीं एखादी चाल सार्वजनिक नीतीच्या विरुद्ध असल्यास ( उदा. घरांत मृत्यु झाल्यास बायकांनीं छाती पिटून शोक करणें, किंवा और्ध्व देहिक क्रिया ह्मणून पुरुषांनीं दाढी मिशा काढणें, ) किंवा विवाहाचें क्षेत्र आकुंचित करणारी असल्यास ( उदा०--पोट जातींतच बेटीव्यवहार करण्याचा जातीचा निर्बंध ), अथवा मर्यादेबाहेर खर्च करण्यास लावणारी असल्यास (उदा०—लग्नाच्या मृत्यूच्या, किंवा गर्भाधानाच्या वगैरे प्रसंगीं द्यावी लागणारी जातिभोजनें ), अथवा प्रवासाला आड येणारी असल्यास उदा०—समुद्र यात्रा निषेध ), अथवा धडधडीत नित्याचरणाच्या विरुद्ध असल्यास ( उदा.— मुलगी उपवर झाली असतांही तिच्या विवाहाच्या आड जाणें ) व या चालीविरुद्ध समाजाचे कमींत कमी एक चतुर्थांश जाणते लोक असल्यास ही चाल समाजहिताविरुद्ध सबब बेकायदेशीर आहे असें सिव्हिल कोर्टानें ठरविण्यासाठीं कोर्टांत फिर्याद लावतां येईल असें या बिलानें ठरविलें आहे. या बिलाचा परिणाम एकंदरीनें हितकारकच होईल अशी आमची समजूत आहे. तथापि एकचतुर्थांशाची घातलेली किमानपक्ष मर्यादा फार अल्प आहे असें आह्मांस वाटतें. एक चतुर्थांश संख्येनें बाकीच्या तीन चतुर्थांश समाजाला कायद्याच्या साह्यानें जिंकून सोडून त्या समाजावर नैतिक विजय मिळविणें ही कल्पना हिंदुस्थानासारख्या प्राच्य देशांत तरी कशीशीच वाटते. एकचतुर्थांश सुधारक वर्ग कित्येक वेळां फाजील, उतावळा, अविचारी, अदूरदृष्टि किंवा समाजहिताविषयीं बेपर्वा असूं शकेल, व अशा वर्गाच्या हातांत समाजाच्या तीन चतुर्थांश संख्येच्या मताविरुद्ध जाण्याचा अधिकार दिल्यास त्याचा परिणाम हितकारकच होईल असें खात्रीनें सांगतां येत नाहीं. जातीचा जुलूम मोडून व्यक्ति—स्वातंत्र्य चांगल्या आचरणापुरतें देणें हा उद्देश स्तुत्य आहे यांत शंका नाहीं, पण कायदे करतांना क्वचित् प्रसंगीं घडून येणाऱ्या अनिष्ट गोष्टी कशा टळतां येतील याचा ही विचार अगोदर करून ठेवावयास हवा, तो या बिलांत केलेला दिसत नाहीं.

## जातिसंस्थेचें निर्मूलन.

जातिभेद संस्था आणि जातिसंस्था यांच्यामध्यें पुष्कळ लोक घोटाळा करतात. जातिभेद हानिकारक आहे अशी आतां लोकांची खात्री होत चालली आहे व आज नाहीं उद्या त्या संस्थेचें बारा वाजणार हें निश्चित आहे. पण जाति संस्था ह्मणजे कांहीं निवडक, एका विशिष्ट चाली रीतींच्या व मताच्या, लोकांचा संघ होय. असे संघ निर्माण होणें ही एक सामाजिक शक्ति आहे. या शक्तीचा उपयोग चांगल्या कामाकडेसच होईल येवढी खबरदारी मात्र घेतली पाहिजे. पण ती नाहींशी करून टाकणें या सारखी राष्ट्रहिताला हानिकारक दुसरी गोष्ट नाहीं. या संघ शक्तीवरच आज हजारों वर्षें हिंदुसमाज टिकला आहे. हें विसरतां कामा नये तेव्हां जातिभेद गेला पाहिजे हें जितकें इष्ट आहे तितकेंच जातिसंस्था राहिली पाहिजे ही गोष्ट इष्ट आहे. सध्याच्या बिलानें जातिसंस्था कायम ठेवून तिचा जुलूम तेवढा नष्ट करण्याचें जें धोरण ठेविलें आहे तें या दृष्टीनें सर्वथा प्रशंसनीय आहे. ह्मणून ही दूरदृष्टि ठेवल्याबद्दल आह्मी श्रीमंत गायकवाड सरकारचें अभिनंदन करतों, व समाज सुधारणेच्या प्रगतीस त्यांचे हातून असेंच विचारपूर्वक साह्य मिळत राहो असें इच्छितों.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**— आकाश बहुतेक मेघाच्छादितच असते परंतु रात्रीं आल्हादकारक वसंत ऋतूची जोत्स्ना प्रकाशमान असते, किंवा जोराचीं वादळें होत असतात. लहान लहान तुषारही पडत असतात. हवेंत आल्हादकारक गारवा आलेला आहे. एकंदरींत उन्हाळ्यामुळें थंड हवेंत जाण्याची जरूर पडत नाहीं व पडण्याचा संभव दिसत नाहीं.

**पुनरागमन व सूचना**— लोक आतां प्लेग छावण्यांतून बहुतेक परत आलेले आहेत. गांव रिकामे होते ते वेळीं कॉन्सरव्हन्सी खात्यास बहुतेक सुट्टीच होती. लोकांनीं छावण्यावर आपापली व्यवस्था कशी तरी लावून घेतली. म्युनिसिपालिटीनें स्थानीक कारभारास असदृश अशी मदत दिली. पाण्याचा पुरवठा, छावण्याच्या मोठमोठ्या रस्त्यावर रोषणाई किंवा छावण्यांत सफाई याकडे कमिटीनें मुळींच लक्ष दिलें नाहीं. यामुळें प्लेगाची साथ ह्मणजे कमिटीच्या सफाई खात्यास चांगलीच सुट्टी मिळाली. हल्लीं गांवांत गेलेल्या लोकांस नळाचें पाणी फार सूक्ष्म धारेनें मिळतें व पायखान्यांची सफाई फार ढिलाईनें होते अशा दोन तक्रारी सर्वतोमुखीं ऐकूं येतात. जें काम बहुजनहित संबंधाचे असतें तें करण्यास कोणीच पुढाकार घेऊं नये हें आश्चर्य आहे. ज्यांची अशी कामें पार पाडण्याची इच्छा असते त्यांस कोठें दाद मागावी हें कळत नसतें. यामुळें अशा तक्रारी वर्तमानपत्रकर्त्यांकडे होणें साहजीकच आहे.

राजश्री धनजी शाह दोराबजी दादी मास्तर हे वऱ्हाडांत बरेच दिवस ए. अ. कमिशनर होते. त्यांस तारीख १४ मे १९१७ इसवी पासून रा. जे. बॅथर्ड आय. सी. एस. डेप्युटि कमिशनर जिल्हा सिवनी यांचे जागीं तेथेंच डेप्युटि कमिशनर नेमिले.

**कुमारिका ताराबाई**— मिस ताराबाई ह्या इच्छा शक्तीनें आणि शरीर सामर्थ्यानें मद्रास इलाख्यांत प्रसिद्ध झाल्या आहेत. इच्छा शक्तीचा अभ्यास वाढवून त्या मोठमोठाले दगड उचलतात, त्यांस छातीवर ठेवून घेऊन त्यांवर घाव सोसतात, भाल्यांच्या उभ्या टोकावर उताणे निजून सर्व शरीराचा भार एककेंद्रस्थित करितात. त्यांचे जवळ शरीरसामर्थ्य व इच्छा शक्ती जशा सिद्ध आहेत, तसेच त्यांस वक्तृत्व आणि मर्दानी सौंदर्य हीं लाभलीं आहेत.

या शहरांतील सार्वजनिक कामांत पुढाकार घेणारे कांहीं गृहस्थ कुमारी ताराबाईस मुद्दाम बोलावणार आहेत असें कळतें. त्यांनीं हातीं घेतलेल्या कामांत त्यांची प्राप्तीवर नजर नसून परोपकारावर व स्त्रियांस आणि विशेषतः कुमारिकांस शिक्षण देण्याचा अधिक उद्देश आहे हें लक्षांत ठेवलें असतां त्यांचे या शहरीं आगमन होणें अनेक दृष्टीनें हितावह आहे. निदान अधांतरी राहणें हा दैवीक अथवा सिद्धीचा प्रकार नसून इच्छाशक्तीच्या आटोक्यांतील एक भाग आहे इतकी लोकांची खात्री झाल्यास तितकेंच पुरे आहे.

**डॉक्टर वानलेस**—बऱ्याच मध्यमस्थितींतील लोकांस औषधोपचारासाठीं किंवा शस्त्रक्रियेच्या प्रयोगासाठीं मिरजेस जाण्याची इच्छा होऊं लागली आहे. तेथील मिशन हास्पिटलचे डाक्टर वानलेस एम. डी. हे एका वर्षाची फर्लो रजा घेऊन गेल्या महिन्यापासून स्वदेशी रवाना झाले ही गोष्ट इतक्या दूरच्या लोकांस कळणें जरूर आहे. त्यांचे जागीं डाक्टर फ्रॉस्ट हे आलेले आहेत. धद्यांत प्राविण्य संपादलेले लोकांस सामान्य जनतेंत विश्वास उत्पन्न केल्याशिवाय यशप्राप्ती मिळत नाहीं. या दृष्टीनें डॉक्टर वानलेस यांचें जाणें ह्मणजे रुग्ण स्थितींतील लोकांस फार गैरसोयीचें होईल.

**स्वराज्य संघ**— आकोले येथील स्वराज्य संघ आपलें काम बरेंच उत्साहानें व लोकैक दृष्ट्या करीत आहे. स्वराज्य संघाचा वाढदिवस साजरा करणें किंवा हळदी कुंकूवा सारख्या सामान्य कार्य प्रसंगीं देखील कार्य दृष्टी ठेवणें व त्यास सर्वंगम सहकारित्व मिळविणें हा सामान्य प्रयत्न नाहीं. इष्ट ध्येय प्राप्त होईपर्यंत हा संघ दृढ व दृढतर यत्न करीत जाईल यांत तर संदेह नाहींच; परंतु सांप्रत ज्युरी पद्धतीनें लोकांस न्याय मिळावा, लोकांस सुलभ शिक्षण मिळावें व स्थानिक स्वराज्याबद्दल आस्था, अभिमान आणि फलोद्गामी प्रयत्न करविण्यास दिशा लाऊन दिल्यास हा संघ मोठें उपयुक्त कार्य करीत राहील यांत संशय नाहीं.

राजश्री काशीनाथ श्रीराम जठार साहेब यांची स्पेशल डयुटीवरील कामगिरी बहुतेक संपली आहे. ती संपल्यावर ते परत याच जिल्ह्यावर येतील यांत संशय नाहीं. ते येथें परत येणार हें ऐकून लोकांस समाधान वाटेल.

**रेल्वे कंपनीस सूचना**-- रेल्वे कंपन्यांनीं जणूं काय लोकांच्या सूचनाकडे होईल तितकें दुर्लक्ष करावें असा निश्चयच केला आहे असें दिसतें. अशा सूचनाकडे दुर्लक्ष केल्याच्या योगानें रेल्वे कंपन्याबद्दल लोकांस अभिमान तो कसा वाटावा? बरें, रेल्वे कंपन्यावर जे नोकर असतात ते तरी किती बेपर्वा व लोकांच्या सोयीकडे दुर्लक्ष करणारे असतात! रेल्वेंतून प्रवास करणारे ह्मणजे थर्ड क्लासांतील खेडवळ व अडाणी लोकांचा समूह. या समूहास धक्के मारणें, कोंडून ठेवणें, सर्व गाडी रिकामी असली तरी एकाच डब्यांत खेचून भरणें, यांस लघुशंका व दीर्घशंका करण्यास साधनें न ठेवणें व बहुतेक गाड्यांबरोबर प्रवास करणाऱ्या पोलीस कॉन्स्टेबल साहेबांच्या अरेरावीखालीं दडपऊन ठेवणें इत्यादि प्रकार नित्य चालू असून ठिकठिकाणीं ते रेल्वे कंपनीच्या नजरेस आणून दिले जात आहेत व लोकांच्या सूचनाकडे एकसारखें दुर्लक्षच होऊन राहिलें आहे असें नाहीं, तर जी सूचना करावी तिचे उलट दुप्पट जोरानें वर्तन केलें जाते. तरी पण एक गोष्ट कंपनीचे निदर्शनास आणून देणें भाग आहे. भुसावळ स्टेशनावर नागपूरकडून मुंबईकडे जाणाऱ्या थ्रू पॅसेंजर ह्या दोन गाड्या सोडून सर्व उतारूस खालीं उतरावे लागते व दोन दोन चार-चार तास खोळंबावें लागतें. तीच अवस्था मुंबईहून इकडे येणाऱ्या गाड्यांची आहे. रेल्वेच्या सोयी करितां व अपघात न व्हावे ह्मणून जाणाऱ्या येणाऱ्या गाड्यांचे प्लॅटफार्म वेगवेगळे आहेत हेंही बरोबर आहे. परंतु एका प्लॅटफार्मवरून दुसऱ्या प्लॅटफार्मवर जाण्यांत जी विशेष गैरसोय होते ती कंपनीच्या लक्षांत आली नाहीं असें नाहीं. रेल्वे स्टेशनच्या बाहेर होऊन निदान १॥ फर्लांगाचें चक्कर घेऊन एक पूल ओलांडावा लागतो. बहुतकरून उतारूजवळ भले भक्कम सामान असतें. त्यांत बायकांचे हाल तर विचारूच नका. दोन दोन तीन तीन मुलांचे लटांबर, त्यांचे हलक्या किंमतीचे परंतु बऱ्याच उपयोगाचें सामान व इतकें लटांबर घेऊन इकडून तिकडे जाणें या त्यांच्या ह्मणजे स्त्रीवर्ग,

वृद्ध पुरुष व ओझ्याखाली लादलेले इतर प्रवासी यांच्या यातना पहाणारांस देखील जें दुःख होतें तें अनिर्वाच्य आहे. बरें येवढा भार वाहण्याच्या वेळा तरी दिवसाच्या असतात कां ? नाहींत. बहुतेक गाड्या रात्रीच्या आहेत. एवढ्यां चक्रावर दिवे तरी असतात कां ? नसतात. ह्मणजे ओझें घेऊन झोपी गेलेल्या मुलास कसेबसे जागे करून स्त्रियांस अंधारांतून निष्कारण पाव मैलाचा प्रवास करावा लागतो. सर्व पूल भरलेला असतो व पुलावर टिकिट कलेक्टराच्या बाळक्रीडेमुळें गाड्या येईपर्यंत किंवा तयार होणाऱ्या गाड्या सुटण्याच्या बेतांत येईपर्यंत थांबून राहावें लागते. ही सर्व दुःख कहाणी परिहार्य असून केवळ कंपनीच्या औदार्यानें लांबवावी तितकी लांबवता येण्यासारखी आहे. नागपूर बाजूनें जाणाऱ्या येणाऱ्या उताऱ्यांच्या संगावर भुसावल स्टेशनचें नांव घेतलें कीं शहारे येऊं लागले आहेत. येवढा अनवश्यक व परिहार्य त्रास कंपनी चुकवील तर कंपनीचे दुर्बल लोकांवर अनंत उपकार होतील.

**पुरवणी**— येत्या अंका सोबत रा. रा. जसवंत ब्रदर्स मथुरा यांच्या औषधाची पुरवणी वाटली जात आहे तिकडे वाचकांनीं लक्ष द्यावें.

## जाहीर नोटीस

बेशमी शिवराम वा। विठु बारकी महार रा. आँकोट फाईल आकोला. व सुक्या वा। शिवराम बारकी महार रा० खेर्डा ता। मुर्तिजापूर जिल्हा आकोला.

या उभयतांस नोटीस देणार बेशमी ठमी मर्द रामजी महार रा० आकोट फाईल आकोला. तुह्मांस नोटीस देण्यांत येते कीं माझा पुतण्या नामे जन्या याच्याशीं सदर्हु सिवराम यानें आपली मुलगी नामे बायनी हिजला देण्याचा—ह्मणजे लग्न करण्याचा ठराव सुमारें ६ वर्षांपूर्वी पंचासमक्ष केला व त्याप्रमाणें मी सिवराम याजवर विश्वास व भरंवसा ठेऊन जातीच्या चाली रितीप्रमाणें डागडागीने, पंगत, कपडे लत्तेवगैरे कारितां एकंदर अंदाजन १५० रुपये खर्च केले. पुढें गेल्या १९१६ सालचे मे महिन्याचे सुमारास लग्नाची तिथी पक्की ठरविण्यास विचारले असतां सदर्हु सिवराम हा टाळाटाळी करीत आहे. व मनला आतां खात्रीपूर्वक समजलें आहे कीं सदर्हु शिवराम हा आपल्या मुलीचें लग्न सदर्हु सुक्या यांच्याशी लैकरच लावणार आहे. करितां तुह्मां उभयतांस कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्यापासून ४ दिवसांचे आंत सदर्हु सिवराम यानें माझे कडे येऊन आपल्या मुलीचे माझे पुतण्याशी लग्न लावण्याचे तिथीचा निश्चय करून लग्न लावून टाकावें. व सदर्हु सुक्या यानें सदर्हु मुलगी बायनी इच्याशीं लग्न करूं नये. असें न केल्यास तुह्मां उभयतांवर कायदेशीर कारवाई केली जाईल. व ह्या नोटिसीचा खर्च व इतर आमचे झालेलें नुकसान तुह्मांस भरून द्यावे लागेल. कळावें ही नोटीस दिली ता. ५-५-१७

सही

ठमी मर्द रामजी महार इचे हातची निशाणी बांगडी असे.

नो० नं० १९७

---

**NOTICE**

The Public is hereby informed that Mr. M. G. Thakar, Secretary, Akola People's Club, has applied for a plot of Nazul Land near the Europeon culb, measuring 200, × 150, to the southern side of the road leading from the Town Hall to the Europeon Club, for building a club honse, and it will be dealt with on the 12 th June 1917. in the Court of the Extra Assistant Commissioner Akola.

Dated Akola the 5th May 1917.

Sd [ in English ]

Assistant Commission-r.

Akola.

No. N. 198

---


पैसा मिळविण्याची नवी विद्या शिका.

# क्रोमोपॅथी इंस्ट्रक्टर

## अर्थात्

## वर्णजलचिकित्सा–शिक्षक.

ज्या दिव्यौषधीच्या प्रभावानें आज युरोप, अमेरिकेसारख्या सुधारलेल्या देशांत सुद्धां नाना तऱ्हेचीं औषधें घेऊन कंटाळलेले हजारों असाध्य रोगी रोगमुक्त होत आहेत, त्या अपूर्व विद्येची सप्रमाण व सप्रयोग माहिती ह्यांत दिली असून ही गुप्त पण अगदीं सोपी विद्या प्रत्येकानें अवश्य शिकून कधीं न संपणारा व हटकून गुण देणारा दिव्यौषधींचा दवाखाना उघडावा! रोगग्रस्तांना नवजीवन प्राप्त करून द्या! पैसा व कीर्ति मिळवा. किं अवघी ४८, व्ही. पी. नें ५१०. जरूर मागवाच.

प्रो. ज्ञानमित्र, शनवार पुणें सिटी.

नो. नं. १९९


---

## नोटीस

आकोले शहरवासी लोकांस या नोटिशीनें जाहीर करण्यांत येत आहे कीं खालीं लिहिलेल्या ७ सात ठिकाणीं देवी काढण्याच्या जागा मुकरर केल्या आहेत, तरी त्या ठिकाणीं नेमलेल्या दिवशीं आपल्या वेटाळांतील मुलें नेमलेल्या दिवशीं हजर करावी सदर्हू व्यवस्था तारीख १५ माहे मे सन १९१७ इ. पासून अमलांत येईल. कळावें. तारीख २-५-१९१७

सोमवारीं— भाजी बजार ताजनापेठ.

मंगळवारीं— शहरांत काळ्या मारुती जवळ.

बुधवारीं— गंज वेस शहर.

गुरुवारीं— धर्मशाळा ताजनापेठ.

शुक्रवारीं— म्युनसीपाल शाळा नंबर ३.

शनिवारीं— अकोट फाईल.

रविवारीं— बार्शीटाकळी रोड टोल नाका.

सही

टि. एन्. बापट

ऑननरी सेक्रेटरी

म्युनिसीपाल कमेटी

आकोला.

नो. नं. २००

---

# नोटीस.

बळीरामसा वा। रतनसा सावजी रा० साहु दुकान पातुर्डा ता० जळगांव यास:—

मी खालीं सही करणार लक्ष्मणसा वा। तुकारामसा रा० पातुर्डा ता० जळगांव याजकडून या नोटिशीनें कळविण्यां। येते कीं आपल्या ह्मटल्याप्रमाणें मी अज्ञान अवस्थेत माझे घरांतून जो खालीं लिहिलेला डागडागीना आणिला त्याचें वर्णन.

| अ. नं | दागीन्याचें वर्णन | वजन | किंमत एकूण | | | चांदीचे अगर सोन्याचे त्याचें वर्णन. |
|---|---|---|---|---|---|---|
| | चांदीचे दागीने दर ॥≈ तोळा | | रुपये | आणे. | पै. | |
| १ | तोड्याचा जोड १ ........... | ८० तो.आ. | ५० | .... | .... | चांदीचा जोड |
| २ | करड्याचा जोड १ ........... | ४० तो. आ | २५ | .... | .... | चांदीचा जोड |
| ३ | दंडवाळ्या जोड १ ........... | २० " " | १२ | ८ | .... | चांदीचा जोड |
| ४ | कडे हातांतील जोड १ ... ....... | ८ " " | ५ | .... | .... | चांदीचा जोड |
| ५ | करड्याचा जोड १ ........... | २० " " | १२ | ८ | .... | चांदीचा जोड |
| | | | १०५ | ० | ० | |
| ६ | रोख कल्दार दिवाणी मु. नं १७ सन १९१० आ. डी. आकोले कोर्टांतील दस्तऐवज नकला परत मिळाले ते. ........... | | १० | | | |
| ७ | सोन्याचे दागीने दर २४ प्रा सन्या २ दोन वजन तोळे ........ | १९।८तो. " | ५९२ | | | सोन्याच्या |
| ८ | पानत्राळ्याचा जोड १ मोत्यासह .... | .... | ५० | | | सोने व मोत्यें |
| ९ | बुगड्याचा जोड १ मोत्यासह .... | .... | ५० | | | सोने व मोत्यें |
| १० | वेलबाळी १ मोत्यासह ........... | .... | २५ | | | सोने व मोत्यें |
| ११ | जडावाची नथ १ मोत्यासह ........ | .... | ५०० | | | सोने व मोत्यें |
| १२ | हिरकण्याच्या मुद्या २ ........... | .... | १००० | | | हिरकणी व सोने |
| १३ | पुतळ्यांचें गाठलें १ त्यांत बोर मणी १४ पुतळ्या १२ ........... | ५ तो. आ. | १२० | | | सोन्याचा |
| १४ | बिंदल्याचा जोड १ ........... | ४ तो. आ. | ९६ | | | सोन्याचा |
| १५ | कांकणाचा जोड १ ........... | ५ तो. आ. | १२० | | | सोन्याचा |
| १६ | मुदी १ .... .... .... .... .... | मासे २ | ६ | | | सोन्याची |
| १७ | मोत्यांचा चौकड्याचा जोड १ एक ४ मोत्यासह .... .... .... .... | .... | १०० | | | मोती व सोने |
| १८ | पाटलींतील सोन .... .... .... .... | १ तो. आ. | २४ | | | सोन्यापैकीं |
| १९ | गरसोळी १ .... .... .... | १ तो. आ | १५ | | | सोन्याची हलकी |
| २० | तांदळी पोथ १ .... .... .... .... | १ तो. आ. | १५ | | | सोन्याची हलकी |
| २१ | सोंन्याची बाळी मोत्यें २ .... .... | .... | ८ | | | सोनें व मोत्यें |
| २२ | गळेबंद १ लालखड्याचा .... .... | .... | ५० | | | लालखड्याचा |
| | | | २८४६ | ० | ० | |

येणेंप्रमाणें सर्व दागीने तुमचेच जवळ आहेत. तुह्मास शेकडों वेळां परत करणे विषयीं विनंती केली परंतु अद्याप पावेतों परत करित नाहीं. दागीने आपले जवळ आज सुमारें पांच वर्षापासून आहेत. व तेव्हां पासून आजपर्यंत आपण व्याजच देत आला आहांत. आपण मामाचे नाते विसरून मज गरीब भाच्याला विनाकारण त्रास देतां व बेमानी करावा असा आपला हेतु दिसतो.

तरी आपणास या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, ही नोटीस आपणास मिळाल्या तारखेपासून पंधरा ( १५ ) दिवसाचे आंत वर वर्णन केलेले सर्व दागीने नकला दस्तऐवज मला आणून द्यावेत व माझी पावती घ्यावी. असें जर आपलेकडून घडून आले नाहीं तर आपलेवर फौजदारी अगर दिवाणी कायदेशीर इलाज करीन या शिवाय या नोटिशीचा खर्च व दागीन्यावरचे वापरण्याचे व्याज व वर लिहिलेल्या दागीन्याशिवाय ज्या दागीन्याची मला आठवण येईल ते सर्व दागीने तुमचे कडून वसुल करण्यांत येईल कळावे.

सही

लक्ष्मण वा। तुकारामसा

रंगारी रा० पातुर्डा द. खु.

नो. नं. २०१

## आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका. आपले आयुष्याचा विमा **धि एशियन कमर्शियल अशुअरन्स** कंपनी लिमिटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने व माहिती आमचे वऱ्हाड आणि मध्यप्रांतांचे फिरते एजंट रा. रा. वि. रा. सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटाची जरूरी आहे.

सेक्रेटरीज

धी एशियन कमर्शियल अशुअरन्स
कं. लि. इस्मायल बिल्डिंग.
फोर्ट, मुंबई.

नो. नं. ८


## नोटीस

मारुती सूर्यभान राहणार अंबासी ता० बाळापूर जि० आकोला

यांसः—

खाली सही करणारणिकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी तुमची लग्नाची बायको असून तुम्ही मला अंदाज १६ वर्षापासून टाकून दिले आहे. तेव्हांपासून मी माझे सख्खे भावाचे घरी ( नागो वा पुंजाजी रा. गोरेगांव ) राहत असते. तुम्ही मला कां वागवीत नाहीं हें मला समजत नाहीं. माझे भावानें मला आपलें घरी या अवधींत ४-५ वेळ आणून घातलें. परंतु आपण बरोबर वागविलें नाहीं, व खाण्यापिण्याची ही माझी व्यवस्था केली नाहीं. या त्रासामुळें मी आपलें भावाचे घरी पुनः परत आले. तुम्ही जर अजून वागविण्यास राजी असाल व बरोबर खाण्यापिण्याची व्यवस्था बरोबर करित असाल तर मला आपण आजपासून ८ दिवसांचे आंत नेण्यास यावे व असे न कराल तर मी ही मी आपणांस नोटीस दिली तीच फारकती असे समजून दुसरा घरठाव करीन. कारण माझा भाऊ मला इतःपर पोसण्यास नाखुष आहे. व या सोळा वर्षाच्या अवधींत मला खाण्याचा खर्च रुपये अंदाज ८०० आठशे रुपये दरसाल ५० प्रमाणें माझे भावास आला आहे. तो आपण वर दिलेली मुदतींत द्यावा व न दिल्यास मी आपणावर त्या बद्दल कायद्याप्रमाणें दिवाणींत दावा घालीन ही नोटीस दिली ता० ३-५-१७ इ.

सही

मानकाबाई मर्द मारुती राहणार अंबासी इचे करितां नागो वा पुंजाजी वाकोडे नि. आंगठा खुद दस्तूर त्रिंबक मेघःशाम कुळकर्णी आकोला

नो. नं १८६

## नोटीस

विद्यमान सिनीयर सब जज साहेब कोर्ट आकोला

स. सर्टीफिकेट नंबर ७ सन १९१७
चौ. ता. ७-७-१९१७

अर्जदार

भुलाई मर्द विठू राहणार कानळेश्वर ता. मुर्तिजापूर

सर्वत्र लोकांस या नोटिशीनें जाहीर करण्यांत येते कीं, सदरहू अर्जदारानें आमचे कोर्टांत मयत विठू वा सूर्यभान राहणार कानळेश्वर यांचे इस्टेटीबद्दल मैताची बायको या नात्यानें वारस आहे. सबब त्यांस सकसेशन सर्टीफिकेट मिळणेबद्दल अर्ज दिला आहे सबब सदरहू इस्टेटीशीं ज्यांचा हक्क संबंध असेल त्यांनीं आपल्या पुराव्यानिशीं आमचे कोर्टांत ता. ७-७-१९१७ इसवी रोजीं १० वाजतां हजर राहावें. सदरहू तारखेवर कोणी हजर न झाल्यास दुसरे कोणी वारस नाहीं, असें समजून अर्जदारास सकसेशन सर्टीफिकीट दिलें जाईल. हें या नोटिशीनें जाहीर करण्यांत येत आहे. व ही नोटीस आमचे कोर्टाचे शिक्या निशीं व सहीनिशीं देण्यांत आली आहे. तारीख ३०-४-१७

सही
N. G. Subhedar
Senior Sub Judge
Akola

N. N. 187

## नोटीस

रा. रा. किसनराव वा शिवरामराव देशमुख राहणार चरणगांव तालुके बाळापूर पोष्ट आलेगांव

यांसः—

खालीं सही करणार नोटीस देतो कीं, मी तुम्हास माझे सर्व कामाबद्दल कुलमुखत्यारपत्र पांच रुपयाचे कागदावर दोन वर्षांपूर्वी नोंदून दिले होतें; परंतु तुमचा यापुढें काम करण्याचा इरादा नसल्यानें व मला ही ठेवणें योग्य दिसत नसल्यानें मी तें आज तारखेपासून रद्द करीत आहे. यापुढें त्या मी दिलेल्या मुखत्यारपत्राअन्वयें माझे तर्फे कोणतीही कारवाई करूं नये. केल्यास त्याबद्दल तुम्ही स्वतः जबाबदार राहाल. तारीख १६-२-१७ पासून तुमची नौकरी बंद आहे. यापुढील तुमच्या कोणत्याही कृत्याम मी जबाबदार नाहीं. क. ता. २९-४-१७

सही

भगवंत सदाशिव पाटील अ. पा. क. आई भागाबाई मर्द सदाशिव पा. दस्तुर भगवंत सदाशिव पाटील दस्तुर खुद

नो. नं. १८८

## नोटीस

सयद कासम वा सयद गफुर व सयद कादर वा सयद गफुर व सयद इब्राहीम वा सयद गफुर व सयद हुसेन वा सयद गफुर यांस व शेट सावकार व इतर लोक

यांसः—

खालीं सही करणार नोटीस देतो ऐसाजे कीं, माझी मुलें नामें सयद कासम वा सयद गफुर व सयद कादर वा सयद गफुर व सयद इब्राहीम वा सयद गफुर व सयद हुसेन वा सयद गफुर ही माझी मुलें आहेत. तीं अज्ञान आहेत. मी अजून जिवंत आहे व जिवंत असतांना माझ्या वरील ४ चारी मुलांना मी इस्टेट वाटून दिली आहे. त्याबद्दल मी वाटणीपत्रक केले आहे मी जिवंत असेपर्यंत माझ्या इस्टेटीवर कोणी ही पैसा देऊं नये. कोणी दिल्यास त्याची जबाबदारी मजवर किंवा माझे इस्टेटवर नाही. सबब त्यांना कोणीही पैसे देण्याचे धाडस करूं नये. कळावें. ही नोटीस दिली असे ता १७-४-१७

सही

सयद गफुर वा सयद कमाल मुसलमान राहणार पातुर्डा निशाणी खुद हातचा आंगठा

नो० नं० १८९

## नोटीस

नोटीस बेशमी यशवंता वा महेपती राहिटे कुणबी राहणार मौजे सेंदला प्रगणे व पोष्ट जानेफळ तालुके मेहेकर जिल्हा बुलढाणा ( वऱ्हाड )

यांसः—

खालीं सही करणार गंगू मर्द यशवंता राहिटे कुणबी राहणार मौजे उमरा पोष्ट अंजनी बुजरुक तालुके मेहकर जिल्हा बुलढाणा नोटीस देण्यांत येते कीं, तुम्ही माझे लग्नाचे नवरे असून आज सुमारे अडीच वर्षें झाली तुम्ही मला मारहाण करून काढून दिले. तेव्हां पासून मी व तुमचा मुलगा नामें सखाराम असे दोघेजण माझा सख्खाभाऊ नामें परशराम वा गोविंदा पळसकर कुणबी राहणार उमरा पोष्ट अंजनीबु॥ तालुके मेहकर याचे घरीं राहून निर्वाह करीत आहों. तरी माझे भावावर माझे करितां व मुलाचे उपजिवीके करितां रुपये तिनशे पंचाहत्तर ३७५ कर्ज झाले. ते आपण देऊन मजला व मुलाला घेऊन जाणे. मी आपले घरीं नांदण्यास कबूल आहे. मला चांगले नांदविण्याविषयीं दोन संभावित मनुष्यांची जामिन माझे भावास द्यावी. व माझे भावाचे वरील कर्ज देऊन मजला घेऊन जाणे. सदरहू प्रमाणें आपले कडून ही नोटीस पावल्यापासून आठ ८ दिवसाचे आंत कर्ज वैगेरे देऊन चांगले नांदविण्यासंबंधानी जामिन देऊन मजला घेऊन जाणे असें न केल्यास पुढें मी घरठाव केल्यावर किंवा करण्याच्या अगोदर माझे भावाच्या पैशाबद्दल तुमचेवर कोर्टात योग्य दावा करून कोर्ट खर्च व ह्या नोटिशीच्या खर्चासह पैसे घेतले जातील. तुमचा मजवरील नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. हीच फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन मग तुमची कोणतेच तऱ्हेची मुबब ऐकूं जणार नाहीं. कळावें तारीख २७ माहे एप्रिल सन १९१७ इ. दस्तुर महमद फयाजअली नूर महमद मुसलमान राहणार अंजनी बुजरुक ता. मेहकर

सही

गंगू मर्द यशवंता राहिटे कुणबी रा. उमरा पोष्ट अंजनी बुजरुक तालुके मेहकर जि. बुलढाणा इची खुद हातची नि॥ बांगडी दस्तुर सदरहू प्रमाणें

नो. नं. १९०

## नोटीस.

नोटीस बेशमी दरी मर्द रामनाथ राहणार दहिगांव व सरी मर्द मछींद्रनाथ राहणार अंजनगांव सुरजी हल्लीं अडगांवबु. तालुके आकोट जिल्हा आकोला

यांसः—

नोटीस देणार सिताबाई मर्द सखाराम नाथ रा. अडगांवबु० ता. आकोट जि० आकोला नोटीस देण्यांत येते कीं माझा नवरा सखाराम नाथ हे मरण पावल्यावर कांहीं वर्षे माझी सासू नामे पुंजाबाई मर्द शंकरनाथ व मी एके ठिकाणीं राहत होतो पण पुढें एकमेकीचे बनेना म्हणून एकाच वाड्यांत दोन वेगवेगळ्या खोल्यांत राहूं लागलो. स्थावर व जंगम इस्टेटीची वारस कायद्याप्रमाणें पूर्ण मालकी माझी असल्यामुळें मीतिजला स्थावर मालापैकीं दोन शेतें वहिती करून पिकावर उदार निर्वाहाकरिता दिली होती व त्याबद्दल तिनें मला लेख नोंदून दिलेला आहे. मात्र सर्व जंगम माल तिच्या देखरेखी खालीच ठेवलेला होता. तो जंगम माल तिच्या ताब्यांत असलेला खालील प्रमाणेः—

सोन्याचे डागीनेः—बाळ्या ४ तोळा १ मुद्या २ तोळे २, हसळी सोन्याची तोळे १२, बाळी मासे ६ वगैरे, चांदीचे डागिनेः—साखळी १ व. तोळे २० कडे १ व तोळे १६, पोल्टे २ व. तोळे ६, धान्ये ज्वारीचे पोते ६, तुरीची डाळीची पोतीं २. मुगाचे डाळीची पोतें १ वगैरे दगडी सामान—जाती २, पाटा १ उखळ १ वगैरे. पितळेची भांडीं—पराती २, ताबे ४, कढई १, समई १, चवी १, तुपाची चाडी १, बहगुणे १ वगैरे. तांब्याची भांडीं—घागर १, भरणे १, गंगाळ १, कोपर १ वगैरे. लाकडी शेतीची आऊतें. चौरंग १, नांगर १, वखर १, कोळपे २, गाडे १, जुपण्यासह वगैरे. शेतीचे लोखंडी सामान—कुसा १ (फाळ) पासाचा जेड १, कोळप्याच्या पासा २, पहार १, कुदळी १, फावडे १, विळे २, खुरपे २ वगैरे. जनावरेंः—वासरासह गाय १, वगैरे वर दर्शविलेला माल तिचे ताब्यांत होता. या सर्व मालाची चालू भावानें अदमासे किंमत रुपये ६९५ आहे. गेल्या आक्टोबर महिन्यांत अडगांवबु॥ येथें प्लेग सुरू झाला तेव्हां आम्ही सासूसुना एकाच ठिकाणीं झोपडीवर राहात होतों. त्यांत माझी सासू आजारी झाल्यामुळें तूं म्हणजे सरी मर्द मछींद्रनाथ मुलगी असल्यामुळें म्हणजे माझी नणंद असल्यामुळें माझे सासूला म्हणजे पुंजाबाई मर्द शंकर-

नाथ इच्या शुश्रुषेकरितां जवळ राहात होती. ती आजारांतच मरण पावली तेव्हां तिचा सर्व प्रकारें मी व्यवस्था करून कर्मकर्मांतराचीही व्यवस्था केली. वर दर्शविलेली जिनगी ताबडतोब ताब्यांत घ्यावी पण मजला प्लेग होऊन दोन गाठी ही उठल्या व बेशुद्ध झाली. माझ्या आजारीपणाची बातमी आकोलखेड्यास माझ्या भावास मिळतांच तसाच येऊन घेऊन गेला. ह्या अपरिहार्य अडचणीमुळें जिनगीचे एकीकडे राहून जिवाचेच पडले. ह्मणून तूं तिच्या झोंपडींतच असल्यामुळें वरील सर्व जिनगी तुझे हातीं अनायासे आली. खरोखर तुझा कांहीं हक्क नाहीं. खरोखर कायद्यानें माझा हक्क असून मालकीही आहे. करितां वरील सर्व जिनगी नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत मजला देऊन पावती घ्यावी. असें न केल्यास कोर्ट मार्फत व्यवस्था करणें भाग पडेल. तेव्हां कोर्ट खर्च व नोटिशीचा ही खर्च तुला द्यावा लागून मला विनाकारण त्रास दिल्याबद्दल जबाब ही द्यावा लागेल. कळावें. तारीख

सही

सिताबाई मर्द सखारामनाथ राहणार आडगांव बुजरुक तालुके आकोट

नि॥ आंगठा

नो० नं० १९१

---

## जाहीर नोटीस

ती. गंगाभागीरथी सारजाबाई मर्द गणाजी वा बाळाजी इंगोलें राहणार मौजे अठकळी पोष्ट कुरनखेड ता. आकोला

इसः—

खालीं सही करणार यांजकडून या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, मौजे अठकळी प्रा॥ कुरणखेड येथील आमची वडीलोपार्जित जमीन सर्वे नंबर १९-२१-२३-६ हे आमचे वडीलोपार्जित आहेत व या शेतांत माझा जन्म देता बाप १ जयराम पुतण्या १ तुकाराम चुलता १ सीताराम आणि तुमचा नवरा( ह्मणजे ) माझा चुलता गणाजी या चौघांचे सारखे चार हिस्से सारखे आहेत. त्यापैकीं एक चतुर्थांश आमचा चुलता मयत झाल्यामुळें त्याचे योग्य वारस आह्मी तिघे आहोंत परंतु त्याची विधवा तुह्मी आहां ह्मणून तुमचे हयातीपावेतों वरील हिस्सा एक चतुर्थांश तुमचे अन्नवस्त्रासाठीं आह्मी आमचे तीघांचे ताब्यांत न घेतां तुमचे ताब्यांत ठेविला आहे तर या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुह्मी या एक चतुर्थांश हिश्याचा तुमचे हयाती पावेतों फक्त वाहुन त्याचा उपभोग घ्यावा. तुह्मी कोणास गहाण खरेदी ताबेगहाण पद्धतीनें, बक्षीस वगैरे देऊं नये. दिल्यास हे सर्व लेख बेकायदेशीर असल्यामुळें त्याचा बोजा कर्जाचा या जीनगीवर राहणार नाहीं ही नोटीस दिली सही मु० आकोला

सही

रामजी वा जयरामजी नि. खु. हातची रेघ असे

नो. नं. १९२

---

## नोटीस

रा. रा. महमद गवस वल्लद कासम अल्ली राहणार शहर आकोला

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आह्माकडून आकोले येथील अफजूलखानवाले घर २२ फेब्रुवारी १९१७ रोजीं दोन महिन्यांचे भाडें आगाऊ देऊन राहण्यास घेतले आणि त्या बद्दलची भाडेचिठ्ठी लिहून दिली व या गोष्टीला संमती दर्शविण्यासाठीं ह्मणून घराची विक्री करणारे अफजूलखान यानीं त्या चिठ्ठीवर साक्षही टाकली आहे.

आतां माझे घर मला खालीं करून द्यावें ह्मणून मी तोंडी नोटीस दिली आणि आज लेखी नोटीसही देत आहें. तुमचा इरादा अफजूलखानाला घराचा ताबा लवाडीनें देण्याचा दिसतो आणि तुह्मी दोघे एकत्र होऊन आतां मला घराचा ताबा योग्य मुदतींत ह्मणजे ता. ८ मे १९१७ च्या आंत देणार नाहीं तर तुह्मावर व अफजूलखान याजवर दिवाणी व फौजदारी करून कोर्टमार्फत ताबा घेण्यांत येईल आणि ताबा मिळेपर्यंतची सर्व नुकसानी तुह्मास द्यावी लागेल. कळावें ता.१ मे १९१७

सही (उर्दूत)

गुलामनबी वल्लद गुलामगवस अज्ञान पालन करणार चुलता शाबासखा वल्लद नवासखा बकलम खुद

नो. नं. १९३

---

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार तुकाराम वा कोंडजी लादे राहणार मौजे पांगरीनवघरे प्रगणे व तालुके वासीम जि. आकोला याजकडून विनयपूर्वक कळविण्यांत येते कीं माझा मुलगा नामे निवरुती वा तुकाराम हा अज्ञान असून त्याचे वय सुमारे १६।१७ वर्षांचे आहे. तो वाईट चालीचा आहे. त्यास कर्जाची वगैरे मुळींच जरूरी नाहीं असें असून तो मुद्दाम लोकांकडून कर्जाऊ रकम व माल घेतो व त्याचा सर्व प्रकारें वाईट मार्गाकडेस उपयोग करितो. घराचे कामास त्यांस मुळींच पैशाची जरूरी नाहीं करितां त्यास कोणी कर्जाऊ रकम व माल देऊं नये अगर त्याजपासून कोणत्याही प्रकारें दस्तऐवज करून घेऊं नये. करून घेतल्यास मी अगर माझी इस्टेट जबाबदार नाहीं. ह्मणून मुद्दाम जाहीर केलें आहे. कळावें तारीख २८ एप्रील सन १९१७ इसवी दस्तुर दामोधर महादेव अर्जनवीस वासीम

सही

तुकाराम वा कोंडजी लादे राहणार पांगरीनवघरे हल्लीं मुक्काम वासीम याची नि० खुद असे दस्तुर वरप्रमाणें

साक्ष

कडतोबा वा नारायण द० खु.

नो० नं० १९४

---


# चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेली सर्व प्रकारची मुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.

नो. नं. २

---

# हात मागाचा मोठा कारखाना.

अगदीं पक्के रंगाचीं लुगडीं पाहिजे असल्यास

# कला-भुवन सोलापूर.

यांच्याकडे मागणी करा.

लछमय्या व्यंकटनरसू इरावती,
मालक,

नो० नं० १०

---

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भसंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व अन्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एक रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३६ गो० १ रु० ७६ गो० २ रु० १६१ गो० ४ रु० २७१ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—याने वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार खचित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांची लाल, सकाच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्ही० नें पाठवू.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून ती पूर्ण खात्रींची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, योक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी.

नो० नं० २२


---

हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१] आकोला—सोमवार तारीख १४ माहे मे सन १९१७ ई० [अंक १९

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपये.
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीसं सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्टीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई ब्यांक } Lyon Scott
आकोला ९।९।०९ } एजंट
नो नं १

### सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**—उत्तम पानें व टिकाऊ पक्का रंग किंमत ॥।, १, १।, १॥, २, २॥, ते ९ रु. प. **बुद्धीबळजोड लांकडी**— किंमत ॥। १, १॥, २ ते ४ रु. प. **सोंगट्या जोड**— किंमत ।, ॥, ॥।, १, १॥, रु. प. **खडावा जोड**— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान टाकाऊ व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट

डी. आर. आळवणी, स्टेट सावंतवाडी
नो. नं. ३

## रोल्डगोल्ड सोन्याचे

### कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. रु. १—४; गोट जोडी २—२॥; पाटल्या जडी २—२॥; वज्रटीका ३—४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४—९. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सराची २—३—४; अंगठी १; सले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २—२॥. सरी ४

### केंस काळे करण्याचा साबण.

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाक्सची किं. १॥ रु.

पत्ता— मगनलाल के आणि कंपनी
गिरगांव— मुंबई
नो० नं० ९

अगोदर हे वाचा नंतर निराश व्हा.

## नशिबाची— परीक्षा.

सवलत— पुढील पांच कामें एकावेळीं मागविणारास २॥. रुपयांत पाठवूं, किरकोळ एकेका कामास पुढील प्रमाणें फी पडेल. (१) इच्छेप्रमाणें, वाटेल त्या पांच प्रश्नांचे उत्तरास १। रु (२) एक वर्षाचे वर्ष फलास १॥ रु. (३) छापील फार्मावर सर्व माहिती सह पत्रिकेस १। (४) जन्म कुंडलीवरून सुप्रसिद्ध ग्रंथाधारें आयुष्य असेपर्यंतचीं फळें लिहून पाठविण्यास १॥. रु. (५) इच्छित कार्यांत यश येऊन अनिष्ट ग्रहाची पीडा निरसन व्हावी त्या करितां एका महान सिद्ध पुरुषाचा प्रासादिक ताईत ३।. सूचना— ग्राहकांनीं वरील कामा करितां साग्रजन्मकाल व प्रश्नवेळ व वय लिहून कळवावें. विशेष खुलासा पत्रद्वारें उत्तरास ८— आण्याचे तिकिट पाठवावें.

ज्यो. डि. टि. मायधनी
म्या. ज्योतिषकार्यालय. चांदडकर
पेठ— नाशिक
नो० नं० ७३

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारांस वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १०८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H. L. Batliwala Sons & Co. Ltd.**
N. N. 6 Dadar Bombay

## श्री दत्तात्रय अलंकारालय

### कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशाजोड, गुलाबाचींफुलें, बिल्वदळी टीका, मुदी अग्रफुलें सार्धी व घागऱ्याचीं वगैरे स जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या चाळ, उपकर्णी, तारें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोन्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन्नसाची लाख काढून वजन तोलून पाहावें गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रेल्वेनें अगर व्ही पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापर

FOR A SHORT PERIOD ONLY.
Free.

**A BEAUTIFUL LEVER WATCH.**

Guaranteed for 2 Years.

Every purchasers of our reliable golden studs and links at Rs. 2-15-0 will be presented with the said watch absolutely free. The golden studs and links and the above watch will be sent in one parcel. Remit early to avoid disappointment.

ONLY FOR A SHORT PERIOD.
*good Bargains Rare opportunity*

## Money Refunded If Not Satisfied.

To avoid disappointment send us a Money order of Re I-15-0 we will send any of the following you require Orders by V. P. P. will be executed only on receipt of 3 annas stamps which is extra.

GEO. MACFARLANE & Co.,
G. T. MADRAS,

One Gents Best lever watch.
One Set of Rolled Gold Studs & Links (Guaranteed for 3 Years.)
One Set of real solid silver studs & Links
One Beautiful rolled gold chain (Guaranteed 3 Years.)
One Pair of Rolled gold Spectacles (Guaranteed for 3 Years.)
One Best fountain pen fitted with 14ct solid gold Nib
One Austrian siver Newada Cup.
One self Shaving safety Razor.
One Bottle hair oil (scented) with a nice comb, one looking-glass and a brush

N. N. 103

## काश्मीरी केशर.

पवित्र आणि अस्सल १०८ उत्तम कस्तुरी ३९, शुद्धशिलाजीत ०८ सुर्मा ममीरा ३ तो. अंगूरी हींग २।, सुगंधित जीरा १ कागजी बादाम ०९ पौंड, बादाम मुरब्बा २ पौं. टिन १

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९
नो० नं० ९

## नोटीस

प्यारेलाल नोनीतराम रघुवंशी खंडवेकर राहणार येवले

यांसः—

कळविण्यांत येते कीं, तुमचे मुलीस ह्मणजे माझे बायकोस नेण्या करितां संगमनेर येथें माझा भाऊ गणपतसिंग व दौलतसिंग यांस पाठविले होते, परंतु मागाहून मीच घेवून येतो असें ह्मटले वरून माझा भाऊ परत आला आहे. तुह्मी गावोंगांव फिरत आहा. व मुलगी अद्यापपर्यंत पाठविली नाहीं. या करितां आपण आठ दिवसाचे आंत माझे बायकोस घेवून यावे. या प्रमाणें न केल्यास तीस आणण्याबद्दल कायदाप्रमाणें तजवीज केल्या जाईल. कळावें. दस्तुर गणपतसिंग गुलाबसिंग मंगरूळपीर

सही

जयरामसिंग गुलाबसिंग दस्तुर खुद

नो. नं. २०२

## नोटीस

राधाबाई जवजे गुलज्यारगार गोसावी राहणार बालखेडा पोष्ट वाकद तालुके वाशिम जिल्हा आकोला

ईसः—

तुह्मास या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, तुमचे शेत सर्वे नंबर ७ एकर २० गुंठे ७ आकार रुपये ४७ हे शेत मौजे तारापूर प्रगणे उगवे येथील असून ते तुमचे जवळून आह्मी एक वर्षा करितां रुपये एकशे पंचावण १५५ रुपयाला तारीख ४-५-१७ ला केले आहे. त्यांत मी वाही करण्याकरितां तारीख ८-५-१९१७ ला वखर घेऊन गेलो तेथें मला रतनगीर गुरु संभुगीर गोसावी यांनीं अडविले. तर मला जी शेती वहितीस दिली, ती तुह्मी आठ दिवसाचे आंत येऊन तंट्यांतून मोकळी करून माझे ताब्यांत द्यावी. नाहीं तर मी तुमचेवर कोर्ट मार्फत रुपये पाचशाचा ५०० नुकसानीचा दावा घालून भरून घेईल. व शिवाय नोटिशीचा खर्च तो ही तुह्माला द्यावा लागेल. व कोर्ट खर्च द्यावा लागेल, या नोटिशीनें तुह्माला कळविले आहे. कळावें. मुक्काम आकोला तारीख ९-५-१७

सही

नथु वा रामजी सरप राहणार उगव पोष्ट उगव तालुके आकोला दस्तुर खुद

नो. नं. २०३

## जाहीर नोटीस

मेहेरबान हुसेन बा मदार गवळी राहणार औरंगाबाद येथें हापट साहेब याचे बंगल्या-नजीक धनी मर्द ललु गवळी इचे घरीं रिसाल्याचे कोन्याजवळ

यांसः—

खालीं सही करणार इजकडून या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, तुह्मास कांहीं रोग आज सहा वर्षापासून झाला असून तुमचेकडून काम धंदा वगैरे करून माझा प्रतिपाळ होत नसल्याकारणानें तुह्मी मजला आज सहा वर्षापासून टाकून गेला आहां. आज पावेतो तुमचा आह्मास पत्ताच लागला नाहीं. यामुळें मजला कांहीं करतां आले नाहीं. आतां तुमचा पत्ता लागल्यामुळें ही नोटिस तुह्मास दिली आहे. तर या नोटिशीनें कळवितें कीं, ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत माझा सहा वर्षाचा खावटी खर्च रुपये २५० दोनशे पंन्नास देऊन मजला घेऊन जावें. जर तुमचेकडून या नोटिशीचा जबाब मजला न मिळाला व तुह्मी वरील रकम देऊन न नेले तर मी ही नोटिस फारकती समजून दुसरा निका करीन. व नंतर तुमचा कोणतेच प्रकारचा कायदेशीर हक्क चालणार नाहीं. ही नोटिस दिली सही. आकोला तारीख १०-५-१९१७

सही

हिन्याबाई मर्द हुसेन गवळी निशाणी बांगडी ठिकाणा लालू वा पिरा गवळी याचे घरीं आकोला

नो. नं. २०४

## जाहीर नोटीस.

नोटीस बेशमी १ सौ. सवाबाई जवजे अंबादास बोंडी राहणार निंबगांव तालुके मलकापूर २ गं. रोडाबाई सदाशिवराव कुळकर्णी रा. वालसांवंगी हल्लीं मुक्काम रोहिणखेड ता. मलकापूर व सर्वत्र साहू-सावकार मंडळी

यांसः—

या जाहिर नोटिशीनें खालीं सही करणार कळवितेकीं, माझा भ्रतार रंगभटजी हे सुमारें २५ वर्षापूर्वी मयत झाले. त्या नंतर त्यांचा भाऊ (माझा दीर) पांडु भटजी हा वडिलोपार्जीत समाईक इस्टेटीचा व भिक्षुकी वृत्तीची वहिवाट करित आला. अलीकडे माघ शुद्ध ५ पंचमी शके १८-३८ रोजीं पांडू भटजी मयत झाला. त्यांस पुत्र संतान कांहीं नसून फक्त दोघी तुह्मी त्यांच्या मुली आहात. त्यांची बायको मयत झाली आहे. त्यांच्या मागें सदर्हू इस्टेटीची व वृत्तीची मी पूर्ण मालकीण असून ती वडिलोपार्जीत इस्टेट खालीं लिहिले प्रमाणें:—

१ कजबे रोहिणखेड येथील वडिलोपार्जित घर, चौकासह (ज्यांत हल्लीं तुह्मी राहत आहां.)

२ कजबे रोहिणखेड येथील मुळे यांची खालीं जागा. यांत एक विहिर आहे.

३ मौजे पोखरी येथील भिक्षुक वृत्तीनें मिळालेले शेत अर्धे रा. संपत मोहना पाटील यांनीं दिलेले.

४ भिकु मारुती पाटील यांनीं दिलेले शेत अर्धे या दोन्ही शेतात अर्धा हिस्सा भाऊबंद असून अर्धा माझा आहे.

५ भिक्षुक वृत्तीची १२ गांवे

सदर्हू इस्टेटीची व वृत्तीची पूर्ण मालकीण मी असून माझे ऐकण्यांत असें आहे कीं सदर्हु स्थावर जंगम इस्टेटीची तुह्मी उभयता बहिणी अफरातफर करीत आहांत. सबब या नोटिशीनें कळविते कीं, अशी अफरातफर करण्याला तुह्माला कांहीं हक्क नसून तुह्मी सदर्हू इस्टेट कोणाजवळ गहाण अगर खरेदी देऊं नये. दिल्यास ती रद्द समजली जाईल व असें करण्याची सर्व जबाबदारी तुमचेवर येईल. इतःपर माझे जे असे नुकसान होईल ते या नोटिशीचे खर्चा सुद्धां तुमचे जवळून कोर्ट मार्फत भरून घेतले जाईल. तसेंच सर्वत्रांस कळविण्यांत येते कीं, सदर्हु दोन मुलीशी गहाण खरेदी अगर पट्याचा व्यवहार कोणी करूं नये. केल्यास त्याची जबाबदारी सदर्हू इस्टेटीवर राहणार नाहीं. कळावें तारीख ८।५।१७ इ

सारजाबाई जवजे रंगभटजी रा. रोहिणखेड ता. मलकापूर जि. बुलढाणा सहीची निशाणी आंगठा

नो. नं. २०५

## नोटीस

नोटीस बेशमी मोतीराम वा शिवराम जात माळी रा० मौजे लेहराजपूर ता० दर्यापूर जि० उमरावती

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी व मी असे व गणाजी पवार व सिताराम पवार असे सर्वत्रा मिळून तुकाराम श्रीखंडे माळी याचे शेत सर्वे नंबर ६४ एकर २७ गुंठे हे सालीम शेत सन १३२६ फसली सालाकरितां रुपये ६९० साहाशे नव्वद मालकी देण्याचे कबूल करून एक पिकाकरितां वहितीस केले. व त्याजबद्दलचा कबुलायती पट्टा तुकाराम यास लिहून दिला. त्याप्रमाणें सन मजकूरी मालकीचे रुपये तुकाराम यास दिले व त्याजबद्दल पावती ही घेतली ती तुमचे जवळच आहे. जमिनीतील एकंदर माल विकून मालकी दिली आहे. नंतर राहिलेले उत्पन्न वाटून घेतले. पुढें कपाशीचे फरदळ राखण्याकरितां तुह्मी आपले संमतीने परदेशी रखवाली ठेविला व कांहीं फरदडीचा कापूस तुह्मी वेंचून आणिला तो १५ पंधरा मण भरला तो तुमचेचजवळ होता. आणखी माल पराटीस होता त्यांत तुमचा चुलता सखाराम यानीं आपलीं जनावरें व तुह्मी आपलीं जनावरें त्या शेतांत तुह्मी चारलीं वरून मी जनावरे कोंडवाड्यांत नेत असतां सखाराम यानें प्रतिबंध केला. तुमचे ह्मटल्या वरून मी कोंडवाडा आक्टाप्रमाणें फिर्याद केली. परंतु तुमचे अंग सखाराम याजकडून असल्यामुळें साक्षदारास फुसलावून माझी फिर्याद ढासळली. जनावरें चारलीं त्यावेळीं शेतांत कपाशी होती हें कांहीं साक्षदारानें सांगितलें. त्यावेळीं खंडीच्यावर कपाशी निघत होती. प्रथम निघालेली कपाशीपैकीं ५ पांच मण माझे हिशाची कपाशी ती ही तुह्मी दिली नाहीं. व चारलेल्या कपाशीपैकीं ७ सात मण कपाशी व कोर्ट खर्च वकीलासहीत रुपये तुमचे दोन हिश्शाचे २८ अठ्ठावीस व पोटगी दंडाबद्दल रुपये २॥। व नोटिशीचा खर्च जो लागेल तो कपाशीसहीत नोटीस पावल्यापासून पंधरा दिवसाचे आंत आणून देऊन माझी पावती घ्यावी तसे न केल्यास तुमचेवर दि० कोर्टीत फिर्याद करून खर्चासहीत भरून घेतले जाईल. कळावें ता० २५-४-१९१७ इ. द० नारायण शामराव द० खु०

सही

चाहादु वा रावजी ताथोड माळी रा० मौजे लेहराजपूर याचे हातचा नि० असे

नो० नं० २०६

## जाहिर नोटीस

खालीं सही करणार याजकडून सकल रघुवंशीय बंधु जनास कळविण्यांत येते कीं नामे प्यारेलाल नोनीतराम रघुवंशीय खंडवेकर याची मुलगी नामे काशी इचेशीं माझे लग्न मंगरूळपीर तालुके मजकूर जिल्हा आकोला या ठिकाणीं तारीख १२-माहे ७ जुलई सन १९११ मित्ती आषाढ शुद्ध ९ रोजीं रघुवंशीय पंच मंडळी न्हावी व ब्राह्मण याचे समक्ष झालेले आहे. लग्न झाले नंतर ४-५ महिने तो येथेंच त्याचे मंडळीसह हलवाईपणाचा धंदा करून राहिला. त्या धंद्यांत त्यानें पुष्कळ लोकांस ठकवून पैसे उपटले. व त्या कर्ज बाजारीच्या त्रासामुळें तो येथून रात्रीं पळून गेला. पुढें तो वाशीम इंगोलीवगैरे अनेक ठिकाणीं फिरून प्रत्येक ठिकाणीं कर्ज काढून लोकांस बुडवीत येऊन पुन्हा मंगरूळपीर येथें आमचे आश्रयानें वर लिहिले प्रमाणें धंदा करून राहिला. व आह्मी पुन्हा त्या धंद्यास आमचे मध्यास्थिनें पुन्हां त्यास पैशाची मदत देवविली. परंतु त्याचे अप्रमाणीकपणामुळें त्यास पुन्हा पुरे न पडून पुन्हां येथून पळून गेला. तो नाशीक जिल्ह्यांत राहिला. तेथें ही त्याजवर पोलीसची कारवाई वगैरे चालली होती. हल्लीं तो नगर संगमनेर वगैरेकडे आहे त्याठिकाणीं बायकोस आणण्याकरितां आमचा भाऊ गनपतसिंग व दौलतसिंग हे त्याजकडे गेले होते, परंतु त्यानें आमचे बायकोस पाठविलें नाहीं. गुप्त रीतीनें अशी बातमी लागते कीं, त्याचे कर्ज बाजारीमुळें व त्याचे चालचलणुकीमुळें माझी जी बायको ह्मणजे त्याची मुलगी नामे काशी उमर वर्षे १६ ची त्याचे जवळ आहे. तिचें लग्नच झाले नाहीं किंवा धर्म पद्धतिप्रमाणें लग्नच लागलें नाहीं अशी कांहींतरी थापा ठोकून तिचेबद्दल पैसा घेऊन अगर मोठ्याचे कोणाचे आश्रय धरून लग्न झालेले मुलीचे पुन्हां लग्न अगर गोणा करून दुसऱ्यास देऊन टाकावा असे समजले. या करितां या जाहीर नोटीसीनें वर लिहिलेला मजकूर सर्वत्रांस जाहिर केला आहे. तरी त्याचे थापेस कोणी लागू नये व त्याचे मुलीस कोणी करूं नये. अगर केल्यास त्यास कायदा प्रमाणें गुन्हेगार समजून त्यानवर कायदा प्रमाणें तजवीज केली जाईल. कळावें. द० गणपतसिंग गुलाबसिंग मंगरूळपीर

सही

जयरामसिंग गुलाबसिंग द. खु.

नो. नं. २०७

## आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका. आपले आयुष्याचा विमा धि एशियन कमार्शीयल अशूअरन्स कंपनी लिमीटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने व माहिती आमचे वऱ्हाड आणि मध्यप्रांताचे फिरते एजंट रा. रा. वि. रा. सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटाची जरूरी आहे.

सेक्रेटरीज,

धी एशियन कमार्शीयल अशूअरन्स कं. लि. इस्मायल बिल्डिंग्ज.

फोर्ट, मुंबई.

नो. नं. ८


## नोटीस

नोटीस बेशर्मी रामज्या वा। दामाजी वानखळे राहणार मौजे हिवरखेड तालुके आकोट जि. आकोला.

पांसः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको आहे. तुमच्या पोटचे मजला चार मुलगे झाले होते ते तुमचे घरीं मरण पावलें त्या पश्चांत तुम्ही मजला बदनसीब समजून मारझोण करून घराचे बाहेर काढून दिले. त्यास सुमारास १० वर्षे झाले आहे. दहा वर्षांपासून तुमची वाट पाहून लोकांचे कर्ज काढून माझी म्हातारी आईचे घरांत माझी जिंदगी गुजर करितों. माझे आईनें तुम्हास दोनचारवेळ मनुष्य पाठऊन इला घेऊन जावे. असें कळविलें पण तुम्ही हो हो म्हणून आले नाहीं आतां मजला कोणी कर्ज देत नाहीं व तुमचे शिवाय माझे जिंदगीचा कोणी आधार नाहीं. आतां मला फार दुःख असून या नोटिसीनें कळविते कीं वरील वर्षांची खावटी बद्दल रुपये अजमास चारशें ४०० लोकांचे देऊन मला घेऊन जावे. असें न केल्यास तुमची पंधरा दिवस वाट पाहून हेच नोटिसीला फारकती समजून दुसरा घरठाव करून लोकांचे रुपये देऊं. मग तुमचा माझ्यावर नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं कळावें तारीख ८ माहे ५ सन १०१७ इसवी

सही

धन्ना मर्द रामजी वानखळे हल्लीं मुक्काम दाऊतपूर ता. आकोट जि. बांगडी

नो. नं. २८

---

वऱ्हाडसमाचार

वैशाख वद्य ८ पिंगल संवत्सर १८३९

## देशी संस्थानिकं आणि त्यांची प्रजा.

प्रस्तुतच्या युद्धानें ब्रिटिश सरकारच्या अंमलाखालच्या हिंदी प्रजेला व हिंदी संस्थानिकांना सार्वभौम सरकारला द्रव्याच्या, व त्यापेक्षां ही अधिक महत्त्वाच्या अशा मनुष्यबळाच्या रूपानें साह्य करून आपापला दर्जा वाढवून घेण्याची महोदय पर्वणी आणून दिली व तिचा योग्य रीतीनें उपयोग करून घेऊन हिंदी प्रजा व संस्थानिक यांनीं थोड्या फार अंशानें त्या पर्वणीचें पुण्यफल पदरांत पाडून घेण्याचा सुयोग लवकरच प्राप्त होईल अशीं सुचिन्हें स्पष्ट दिसत आहेत हें मागें एका लेखांत आम्ही दाखविलेंच आहे. त्याबरोबरच आम्हीं हें ही सूचित केलें होतें कीं देशी संस्थानिकांचा दर्जा वाढविण्याच्या प्रश्नाला खरोखर दोन अंगें आहेत, पैकीं फक्त एका अंगाचा विचार मात्र सार्वभौम सरकार व ब्रिटिश अंमलांतल्या हिंदुस्थानांतले राजकीय पुढारी व वर्तमानपत्रकार करीत असतात. दुसऱ्या अधिक महत्त्वाच्या अंगाकडे त्यांचें इतकें पूर्णपणें दुर्लक्ष होत आहे कीं तें अंग त्या प्रश्नाला खरोखर आहे ही गोष्ट ही त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. हें दुसरें अंग म्हणजे संस्थानिकांच्या प्रजेच्या दृष्टीनें या प्रश्नाचा विचार हें होय. मोठ्या दुर्दैवाची गोष्ट म्हटली पाहिजे कीं साऱ्या जगाचें लक्ष सध्या प्रजेच्या राजकीय स्वातंत्र्याकडे किंवा तिच्या हक्काच्या संवर्धनाकडे लागलें असतां हिंदुस्थानांत संस्थानिकांच्या अंमलाखालीं असलेल्या सुमारें सात आठ कोटि प्रजेच्या हक्काचा विचार करण्याचें ही कोणाच्या ध्यानीं मनीं येत नाहीं! संस्थानिकांचा दर्जा वाढवावयाचा या शब्दांचा खराखुरा अर्थ किती व्यापक आहे व त्या अर्थानें संस्थानिकांचा दर्जा वाढविला जाणार आहे कीं काय हा खरोखर मोठा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. पण गंमत ही आहे कीं संस्थानिकांच्या प्रजेच्या हिताच्या दृष्टीनें खरोखर एक ही मनुष्य या प्रश्नाचा विचार करीत आहेसें दिसून येत नाहीं.

ब्रिटिश अंमलाखालच्या मुलुखांतली हिंदी प्रजा व संस्थानिकांच्या अंमलाखालची हिंदी प्रजा यांच्यांत शिक्षण, कर्तृत्व, व आपल्या वरच्या जबाबदारीची जाणीव इ. बाबतींत विशेषसा फरक नाहीं. बहुतेक सगळ्या हिंदुस्थानभर या बाबतींतली प्रगति बरोबरीनें सारखीच आहे असें म्हटल्यास हरकत नाहीं. पण त्या मानानें दोघांच्या स्थितींत मात्र जमीन अस्मानाचें अंतर आहे. सांपत्तिक किंवा सामाजिक प्रगतीच्या दृष्टीनें कोण कोणाच्या पुढें आहे हें सांगणें मात्र थोडेसें कठीण असलें तरी राजकीय स्वातंत्र्याच्या दृष्टीनें संस्थानी प्रजा खालसा मुलुखांतल्या प्रजेच्या मानानें अधिक दुर्दैवी आहे हें कोणालाही सहज कळून येणार आहे. खालसा मुलुखांतल्या प्रजेला जरी असावेत तेवढे न्यायाचे राजकीय हक्क किंवा उच्चारस्वातंत्र्य असावे तितकें नाहीं ही गोष्ट खरी आहे तरी ते हक्क मिळवून घेण्याचे रस्ते व न्यायाचे मार्ग तरी त्यांना खुले आहेत. त्यांना लोकांत वर्तमानपत्रांच्या द्वारें लोकांत विचार जागृति करतां येते, सभा भरवून व अर्ज करून थेट पार्लमेंटापर्यंत दाद मागता येते, आणि राष्ट्रीय सभेसारख्या संस्थांच्या द्वारें आपल्या मागण्या साऱ्या जगापुढें मांडता येतात. संस्थानिकांच्या प्रजेला यांतला एकही मार्ग आज खुला नाहीं. म्हैसूर, त्रावणकोर यांसारखीं पांच, चार ठळक संस्थानें सोडलीं तर बाकीच्या पावणे सहाशें संस्थानांतून वर्तमानपत्रें काढण्याची सुद्धां प्रजेला मनाई आहे असें दिसून येईल. इतक्या लोकांना आपलीं दुःखें जाहिर रीतीनें लोकांपुढें मांडण्याचा हक्क नसावा, त्यांना राष्ट्रीय सभे सारख्या संस्था काढून कायदेशीर रीतीनें आपल्या मागण्या पार्लमेंटपर्यंत राहोच, पण त्यांचे सरकार म्हणजे संस्थानिक यांच्या कानापर्यंत ही पोंचवितां येऊं नयेत, फार काय, पण कायदेकौंसिलें, किंवा म्युनिसिपालिट्या सारख्या संस्था यांतून ही खरे खरे लोकनियुक्त सभासद पाठविण्याचे हक्क सुद्धां पुष्कळशा संस्थानांच्या प्रजेला असूं नयेत ही केवढी खेदाची व शरमेची गोष्ट आहे! संस्थानच्या मर्यादेच्या बाहेर साम्राज्यांतर्गत स्वराज्याचे हक्क मिळविण्याकरितां आपल्या रक्ताचे, आपल्या नात्यागोत्याचे, आपल्या इतकेच सुशिक्षित, व सर्व प्रकारें आपल्याच सारखे असे आपले बंधु हट्टाहास करीत असलेले व सरकारच्या कायदेकौंसिलांत व एक्झिक्युटिव्ह कौंसिलांत ही मानाच्या व अधिकाराच्या जागा मिळवूं शकतात, आणि आपण मात्र पिंजरांत अडकून पडलेल्या शुकाप्रमाणें सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याला मुकून आपले संस्थानिकें किंवा त्यांचे दिवाण देतील तेवढा अधिकाराचा तुकडा चघळीत त्यांनीं पढविलेलीं स्तुतिस्तोत्रें गात आयुष्याचे दिवस कंठीत आहों हा विचार संस्थानांतल्या सुशिक्षित प्रजेच्या मनाला केवढी यातना देत असला पाहिजे याची खरी कल्पना संस्थानी प्रजा होण्याचें दुर्दैव ज्यांच्या वांट्याला आलें असेल त्यांनाच करता येईल.

खरोखर म्हटलें तर हा विचार खुद्द संस्थानिक व त्यांचे दिवाण किंवा मलुगार प्रधान मंडळ यांनीं करावयास पाहिजे व जगात प्रजास्वातंत्र्याचा पारा राजकीय थर्मामिटरांत कसा झपाट्यानें वर चढत चालला आहे तें पाहून आपल्या प्रजेला ही शिक्षणाच्या प्रगतीबरोबर वाढते राजकीय हक्क आपण होऊन देण्याचें मानासिक औदार्य दाखवावयास पाहिजे. पण खरोखर असें घडत आहे काय व नसल्यास कां नाहीं हे प्रश्न विचार करण्यासारखे आहेत. श्रीमंत सयाजीराव महाराजासारखे कित्येक संस्थानिक साऱ्या जगाचा अनुभव घेऊन आलेले आहेत. इतर ही बऱ्याच संस्थानिकांनीं युरोपचा प्रवास करून तेथील राजकीय स्थिति पाहिलेली आहे. या संस्थानिकांनीं आपापल्या राज्यांत प्रजेच्या हक्कांची वाढ होण्यास खरी खरी मदत कितीशी केली आहे? कांहीं संस्थानिकांनीं आपापल्या राज्यांतून कायदेकौंसिलें किंवा लोकसभा काढल्या आहेत असें आपण वर्तमानपत्रांतून वाचतों. पण या कौंसिलांत लोकनियुक्तत्व खरें खरें किती आहे, प्रजेला विचारस्वातंत्र्य किंवा उच्चारस्वातंत्र्य किती आहे व केवळ दिखाऊपणा किंवा भपका किती आहे तें जर खरोखर बाहेर येईल तर सारें जग या भपक्याला भुलून कसें भ्रमांत पडलें आहे तें कळून या विसाव्या शतकांतही ही नजरबंदीची जादू चांगल्या जाणत्या लोकांच्या डोळ्यांत ही कशी धूळ टाकण्यास समर्थ होते याचें आश्चर्य वाटेल. संस्थानिकांनीं एखादी गोष्ट करण्याचें मनांत आणिल्यास त्यांच्या दिवाणासारख्या अधिकाऱ्यांना सुद्धां त्या गोष्टीविरुद्ध मत प्रांजलपणें देतां येत नाहीं, दिल्यास दुसरेच दिवशीं त्यांना आपल्या वैभवाला, आणि अधिकाराला कसें मुकावें लागतें याचा अनुभव संस्थानांतून काम करून आलेल्या मि. व्ही. पी. माधवराव किंवा सर नारायणराव चंदावरकरासारख्यांना विचारावें. खुद्द दिवाणांची जेथें अशी स्थिति आहे तेथें लोकनियुक्त सभासद तेथील कौंसिलांतून असले तरी त्यांचा काय उपयोग होणार? पोलिटिकल एजंटासारख्यांच्या सासुरवासामुळें हे असे प्रकार होतात असें मोठमोठ्या संस्थानासंबंधानें तरी निदान म्हणतां येणार नाहीं. उलट कित्येक ठिकाणीं संस्थानिकांच्या हातीं असलेल्या अमर्याद सत्तेचा जेथें जेथे दुरुपयोग होतो तेथें तेथें पोलिटिकल एजंटांचा धाकच त्या सत्तेला थोडा बहुत आळा घालण्यास उपयोगीं पडला आहे असें दिसून येतें. पो. ए. चा धाक असतांना जर संस्थानिकांचा येवढा जुलुम चालतो तर प्रस्तुतच्या युद्धाचा परिणाम म्हणून तो धाक काढून टाकून संस्थानिकांच्या अधिकाराची मर्यादा वाढविण्यांत आली तर काय परिणाम होईल, व संस्थानिकांचा दर्जा वाढविल्याबद्दल देशी संस्थानिकांची प्रजा सार्वभौम ब्रिटिश सरकारचे धन्यवाद गाईल कीं काय म्हणेल याचा निर्णय आम्ही वाचकांवरच सोंपवितों. चांगले सुशिक्षित, विस्तृत व दूरदृष्टीचे, सुसंस्कृत व उदार मनाचे आणि प्रागतिक विचाराचे म्हणविणारे संस्थानिक खरोखर आपल्या हातांतले अधिकार त्यांनींच स्वतः हुशार व प्रामाणीक म्हणून पसंत करून आणिलेल्या दिवाणाच्या हातांत देण्यास जर इतके निरुत्सुक असतात, तर मग ते अधिकार प्रजेच्या हातीं देण्यास संस्थानिक कधीं काळीं खुषीनें कबूल होतील असें घडण्यास मनुष्यस्वभाव पक्षिणीच्या कांडीनेंच बदलला पाहिजे. एरव्हीं हें शक्य नाहीं. आमच्या सांगण्याचा इत्यर्थ हा कीं संस्थानिकांनीं आपल्या रयतेजवळून घेतलेला जो पैसा सार्वभौम सरकारला युद्धसाह्यार्थ दिला, व संस्थानांतल्या ज्या प्रजेनें आपलें रक्त सार्वभौम ब्रिटिश सरकारच्या सेवेप्रीत्यर्थ रणक्षेत्रावर अर्पण केलें, त्याचा मोबदला त्या संस्थानीं प्रजेच्या हक्क संवर्धनाच्या रूपानें मिळेल अशी कांहीं तरी योजना सार्वभौम सरकारनें केली पाहिजे. संस्थानिकांना स्वातंत्र्य देण्यानें तो मोबदला दिला जाईल या भ्रमांत राहूं नये. संस्थानिकांचा दर्जा वाढविणें म्हणजे त्यांना

अंतर्गत राज्य व्यवस्थेंत पूर्ण मुखत्यारी देणें ही कल्पना चुकीचीच नव्हे, तर अत्यंत घातुक आहे. तिच्या योगानें संस्थानिक बेकाम वर्तन करूं लागून प्रजेच्या पारतंत्र्याच्या शृंखला अधिक घट्ट आवळूं लागतील व त्यांना आज पो. एजंट किंवा व्हाइसराय साहेब यांच्याकडे दाद मागण्याचा मार्ग तरी खुला आहे, तो ही उद्या बंद झाला, ह्मणजे संस्थानी प्रजेचा पुरा कोंडमारा होऊन त्यांना देमाय धरणी ठाय असें होऊन जाईल या गोष्टीचा विचार या प्रश्नाचा निर्णय करतांना अवश्य झाला पाहिजे.

## सध्याच्या काळीं असे उत्सव पाहिजेत.

यंदाच्या वर्षी श्रीमदाद्यशंकराचार्यांच्या पुण्यतिथीचे उत्सव निरनिराळ्या प्रांतांतून वाढत्या प्रमाणावर व विशेषतः इष्ट अशा स्वरूपाच्या वळणावर करण्यांत आले याबद्दल आमच्या मनाला खरोखर फार समाधान वाटलें. शंकराचार्यांचा वेदांत हा साऱ्या जगाला माया अथवा भ्रम समजणारा आहे व खरा वेदांती ह्मटला ह्मणजे तो निष्क्रिय असला पाहिजे अशी जी आजपर्यंत लोकांची खरी ह्मणा खोटी ह्मणा समजूत होती तिचें महत्त्व जर गावयाचें असतें तर अशा जगद्गुरूच्या उत्सवाची सध्याच्या काळीं अवश्यकता नाहीं, किंबहुना राष्ट्राच्या प्रगतीस ते उत्सव प्रतिबंधक अतएव त्याज्य आहेत असेच आह्मी ह्मटलें असतें. पण सुदैवानें लोकमान्य टिळकांच्या गीतारहस्यानें ज्ञानोत्तर ही योग्याला कर्माची अवश्यकता आहे व तें कर्म व्यावहारिक स्वरूपाचें असलें तरी निष्काम असेल तर त्याची योग्यता थोर समजली पाहिजे हें गूढ तत्त्व उदयाला आणिल्यामुळें यंदाच्या शंकराचार्यांच्या स्वरूपाला कांहीं निराळेंच इष्ट स्वरूप प्राप्त झालें आहे हें येथें स्पष्टपणें सांगणें अवश्य आहे. आचार्यांचा मायावाद खरा आहे, पण तो कोणत्या अर्थानें आहे तें न पाहतां जगाला एकदम असत्य मानून निष्क्रिय बनण्याची जी लाट देशावर आली होती तिचा प्रतिकार यंदाच्या सारख्या उत्सवांनीं होत जाईल तर तें इष्टच आहे. जगाचा व्यवहार सत्य आहे व जगांत करावयाचें कार्य ही सत्यच आहे, मात्र तें कार्य करतांना माणसानें फलावर आसक्ति ठेवूं नये, तर कर्तव्य ह्मणून कार्य करीत राहावें, व अशा रीतीनें केलेली देशसेवा, पतित समाजाची सेवा, निकृष्ट वर्गाच्या उन्नत्यर्थ प्रयत्न वगैरे हीच खरी ईश्वरसेवा होय, अशा प्रकारचें तत्त्व जर अशा उत्सवाचें वेळीं श्रोत्यांचे मनावर बिंबविण्याची खबरदारी घेतली जाईल तर असे उत्सव खरोखर आचार्यांच्या जगद्गुरुत्वाला शोभणारे व देशोन्नतीच्या पुण्यकार्याला हात भार लावणारे होतील. सध्याच्या काळीं अशाच उत्सवांची विशेष जरूरी आहे. आचार्यसंपादक बापट शास्त्री यांच्या सारख्या केवल्याचा तत्त्ववाद करणाऱ्या उत्सवांची नाहीं हें आह्मी सांगावयास पाहिजे असें नाहीं.

## मराठी निबंधास सोन्याचें पदक.

ता. २ च्या इंदूरच्या 'मल्लारिमार्तंड-विजय' पत्रांत वरील मथळ्याखालीं एक नोटीस प्रसिद्ध झाली आहे तिच्याकडे आमच्या होतकरू लेखक वर्गाचें लक्ष आह्मी वेधतों. होळकर शाहींतल्या धरगांव येथील इनामदार रा. ठाकुर बागसिंग यांनीं स्वतःची मातृभाषा हिंदी असतां 'मातृभाषेच्या द्वारें शिक्षण' या विषयावर मराठी भाषेंत उत्तम निबंध लिहून ता. १ जुलैच्या आंत प्रो' लक्ष्मण बाळकृष्ण देव एम. ए. सेक्रेटरी साहित्यसभा, इंदूर या पत्त्यावर पाठविणारास बक्षीस देण्यासाठीं सोन्याचें एक पदक तयार करून तें सदर सेक्रेटरीच्या हवाली केलें आहे. तरी वरील मुदतींत निबंध पाठवून रा. बागसिंग यांनीं उदार मनानें व साहित्योन्नतीच्या खऱ्या कळकळीनें दिलेल्या या देणगीचें चीज होतकरू मराठी लेखक वर्ग करील अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे. इतर व्यवसायबंधूनीं ही या नोटिशीस प्रसिद्धी देण्याची कृपा करावी अशी सेक्रेटरीची त्यांना विनंति आहे.

## सध्याचे गुरु!

'गुरु' हा शब्द उच्चारल्याबरोबर खऱ्या हिंदुधर्मी माणसाच्या मनांत जी एक पवित्रतेची व पूज्यत्वाची भावना संचरते तिची खरी कल्पना पाश्चात्यांना करतां येणें शक्य नाहीं. 'गुरुब्रह्मा गुरुर्विष्णु.' गुरु हेंच सर्वस्व, त्याची आज्ञा वेदाहून ही ज्यास्त वंद्य ही भावना हळूं हळूं अस्तंगत झाली आहे; तथापि अद्याप ही तिचें प्राबल्य जें उरलें आहे त्याचा फायदा घेऊन भोंदू गुरु आपली चंगळ चालवीत आहे. ही धार्मिक अथवा पारमार्थिक बाबतींतल्या गुरूंची स्थिति झाली. व्यावहारिक अथवा शिक्षणविषयक बाबतींतल्या गुरूंची स्थिति याहून विशेषशी बरी नाहीं, व तेथें ही त्यांच्या होत असलेल्या अवज्ञेस ते स्वतःच बहुतांशीं कारण झालेले आहेत. शाळांतून व कॉलेजांत गुरु अथवा अध्यापक नेमतांना केवळ त्यांच्या पदव्यांकडे किंवा वशिल्याकडे दृष्टि देऊन नेमणुका होतात, त्यांच्या शिलाकडे किंवा अध्यापनविषयक महत्त्वाच्या कामगिरीच्या पात्रतेकडे बहुधा लक्ष नसतें. यामुळें ज्यांचे स्वतःचे विचार क्षुद्र, बुद्धि संकुचित, आणि अनुभव बहुतेक शून्यांश, असे गुरु एकदम मोठाल्या जागांवर नेमून विलायतेहून आल्यामुळें त्यांच्या हातून वारंवार अविचाराचें वर्तन होतें, व तें विद्यार्थ्यांच्या नजरेस आल्यावर त्यांच्याविषयीं आदरभाव प्रस्थापित न होतां उलट तिरस्कारच उत्पन्न होतो. अलीकडे पुष्कळशा कॉलेजांतून विद्यार्थी आणि प्रोफेसर यांच्यांत बेबनाव होऊन जे बखेडे माजतात त्यांतल्या पुष्कळांच्या मुळाशीं असा कांहीं तरी प्रकार असलेला आढळून आला आहे. परवा रुडकी येथील इंजिनियरिंग कॉलेजचे प्रिंसिपाल मि. वुड यांनीं एका भाषणांत बोलतांना 'हिंदी गृहस्थ ह्मणविणारांत खरी सभ्यता असलेले क्वचित्च आढळतील' असें ध्वनित केलें असें बाहेर आलें आहे. मि. वुड यांची सभ्यतेची कल्पना काय आहे तें आह्मांस ठाऊक नाहीं. पण अपक्व बुद्धीच्या तरुणांपुढें त्यांच्या वडिल माणसांसंबंधानें किंवा देशांतल्या पुढाऱ्यासंबंधानें वरच्या सारखे घाणेरडे व ते ही सर्वस्वी खोटे शब्द उच्चारणाराला सभ्यसमाजाच्या कोटींत बसविण्यास कोणी ही हिंदी माणूस कधीं तयार व्हावयाचा नाहीं येवढें आह्मी येथें खास सांगतों. वडील माणसें, समाज, धर्म, देशाभिमान, इ. बाबतींत बोलतांना ज्याला आपल्या विकार क्षुब्धता आवरून धरतां येत नाहीं, व यांच्या संबंधानें उच्च प्रतीचा स्वतःच्या वर्तनाचा आदर्श तरुणापुढें मांडतां येत नाहीं, त्याला रुडकी कॉलेजासारख्या शिक्षणसंस्थेचा मुख्याध्यापक नेमण्यांतच सरकारनें घोड्यायेवढी चूक केली आहे आणि अशा प्रकारच्या चुका जोंपर्यंत होत राहतील तोंपर्यंत गुरु आणि शिष्य यांच्या मधला सध्याचा बेबनाव वाढत न गेला तर आश्चर्य ह्मणावयाचें! विद्यार्थ्यांच्या वर्तनाची चौकशी करण्याकरितां सरकार कमिश्या नेमतें, व विद्यार्थ्यांत राजद्रोह पसरत आहे अशी समजूत करून सापसाप ह्मणून भुईला धोपटतें, प्रसंगाविशेषीं विद्यार्थ्यांना शिस्त लावण्याच्या निमित्तानें कडक शिक्षा ही करतें, पण हा सगळा प्रकार 'चोराला सोडून संन्याशाला सुळावर देण्या' सारखा होत आहे हें थोडासा शांत मनानें विचार करणारास सहज कळण्यासारखें आहे.

## उच्च नीतितत्त्वासाठीं अनीतीचें अवलंबन!

(आमच्या एका सन्मान्य मित्राकडून)

ब्रिटिश सरकार सध्याच्या भयंकर रण संग्रामांत पडून अमर्याद स्वार्थत्याग, द्रव्यत्याग व प्राणत्याग करण्यास तयार झालें आहे तें बेल्ज्यम् सारख्या निरुपद्रवी छोट्या राष्ट्राच्या रक्षणार्थ—अर्थात् एका उच्चतम नीतितत्त्वाच्या रक्षणार्थ—याविषयीं हिंदुस्थानांतल्या शेंबड्या पोराच्या सुद्धां मनांत तिळमात्र शंका नाहीं, आणि अशा नीतितत्त्वार्थ भांडणाऱ्या सार्वभौम सरकारास यथाशक्ति साह्य करणें हा आपला धर्म आहे असें समजूनच हिंदुस्थानांतले सुशिक्षित अशिक्षित, बायाबापड्या व श्रीमंत, राव आणि रंक, धर्माचार्य आणि धर्मबाह्य सर्व लोक यथाशक्ति द्रव्यसाह्य करण्यास तयार झाले आहेत. असें असतां मुंबईच्या टर्फ क्लबनें युद्धफंडाला मदत करण्याच्या स्तुत्य उद्देशानें असलें तरी लॉटरी किंवा सोडत काढून लोकांना अनीतीचें अवलंबन करण्याच्या मोहांत पाडण्याचा यत्न करावा, व अशा प्रयत्नास सरकारानें संमति द्यावी हें सर्वथा अनुचित आहे असें आह्मांस वाटतें. टर्फ क्लब युरोपियनांचा आहे व पाश्चात्य समाजांत सोडत किंवा जुगार यांच्याविषयीं आह्मा हिंदू इतकी तीव्र घृणा नाहीं हें आह्मांस ठाऊक आहे. तथापि सोडत ही अनीतिवर्धक आहे अशी अलीकडे पाश्चात्यांची सुद्धां खात्री होत चालली असून सोडती व जुगार कायद्यानें बंद पाडण्याचा प्रघात विलायतेंत ही पडला आहे. सध्या सरकारला मिळेल त्या साधनानें द्रव्यसाधन करावयाचें आहे ही गोष्ट खरी असली व त्यासाठीं विलायतेंत हरतऱ्हेचे प्रयत्न सुरू असले तरी विलायतेंत सुद्धां सोडत काढून पैसे मिळण्याची कल्पना निंद्य वाटून तेथील लोकांनीं सोडत काढली नाहीं; पण दुःखाची गोष्ट कीं आमच्या नागपुरास चांगल्या संभावित कुलांतल्या व सुशिक्षित गृहस्थांनीं पुढाकार घेऊन सोडतीचें जाहिरपत्रक स्वतःच्या सह्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. आमची खात्री आहे कीं ज्या देशाभिमानाच्या उच्च कल्पनेपुढें त्यांनीं नीतितत्त्वाला ही लाथाडून सोडत काढली आहे त्याच देशाभिमानानें प्रेरित होऊन ते वजनदार गृहस्थ दारोदार युद्धफंडाच्या साह्यार्थ झोळी फिरवते, (व अशी सत्कार्यार्थ झोळी फिरविण्यांत हिंदु गृहस्थाला कधीं कमीपणा वाटावयाचा नाहीं) तर सोडतीनें जी रक्कम उभी करण्याची त्यांची अपेक्षा आहे त्यापेक्षां अधिक रकम त्यांना भिक्षेवर सहज उभारतां आली असती. सत्कार्यार्थ साह्य करण्याच्या भावनेनें प्रेरित होतांना सुद्धां नीति तत्त्वांचा अनादर न होईल अशी खबरदारी आमच्या पुढाऱ्यांनीं घेणें किती अवश्य आहे तें यावरून दिसून येईल.

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या आठवड्यांत जर्मन लोकांच्या सगळ्या चळवळींचा रोख पश्चिम रणक्षेत्रांत मित्रराष्ट्रांनीं हस्तगत केलेलीं ठाणीं परत मिळविण्याच्या उद्देशानें जोराचे प्रत्याघात करण्याकडे होता. पण दोस्त राष्ट्रांची सैन्यें आपापल्या ठिकाणीं मजबूद राहून शत्रूच्या हल्ल्याचा जोरानें प्रतिकार करीत होतीं. यामुळें शत्रूचें कांहीं चाललें नाहीं. इंग्रजांनीं बुलेकोर्टच्या पलीकडे पूर्वेकडील हिंडनबर्गच्या लायनीकडे पुढें पाऊल टाकण्यांत यश मिळविलें. हिंडेनबर्गला अशी घमेंड वाटत होती कीं आपण सुरक्षित आहों, पण इंग्रजांचें पाऊल पुढें पुढें पडत चाललेलें पाहून आतां त्याचें तें सुखस्वप्न मावळत चाललें आहे, इतकेंच नाहीं तर पांचावर धारण बसली आहे. जर्मनीनें केवढें अफाट सैन्य पश्चिम रणक्षेत्रांत एकत्र केलें आहे याची कांहींशी कल्पना य एका गोष्टीवरून करतां येईल कीं एकंदर जर्मन सैन्याचा एक तृतीयांश ह्मणजे १४१ डिव्हिजन्स फ्रान्समध्यें आहेत. या पैकीं ४३ डिव्हिजन्स तर प्रत्यक्ष चकमकी करीत आहेत व नुसत्या एप्रिल महिन्यांतच जर्मन शत्रूची प्राणहानि दोन लाख झाली आहे.

## केसरचें धाबे दणाणलें!

रशियांतल्या राज्यक्रांतीच्या ज्वालामुखीचें गुरगुरणें जरी पुष्कळ दिवस आगाऊ ऐकूं येत होतें तरी त्याचा प्रत्यक्ष स्फोट इतक्या अकल्पित रीतीनें होऊन त्यांत झारच्या बादशाही मुकुटाची पहिली आहुति पडेल अशी अटकळ कोणालाच करतां आली नाहीं. पण या युद्धांत अशी अकल्पित घटनांची परंपरा जी आजपर्यंत दिसून आली आहे तिजवरून रशियांतली

क्रांति ही त्या परंपरेंतली अखेरची घटना ह्मणण्याचें धाडस कोणालाही करतां प्राव-याचें नाहीं. खाई त्याला खवखवे या ह्मणीप्रमाणें जर्मन कैसरला तर स्वतःच्या मुकुटाच्या रक्षणाचीच मोठी धास्ती येऊन पडलेली दिसते. जर्मन बादशहाचा जुलुम जर्मन लोक आतांपर्यंत जीव मुठींत धरून सोसून राहिले, पण रशियाचें उदाहरण पाहून ते केव्हां आपले विरुद्ध उलटतील याचा नेम नाहीं असें जाणून तो प्रसंग टाळण्याकरितां व जर्मनांच्या मनाची क्षुब्धता थोडीशी शांत करण्याकारितां कैसर बाद-शहा आपल्या राज्यपद्धतीची नवी घटना तयार करण्याचे कामांत गुंतला आहे. या घटनेप्रमाणें आपण आपल्या प्रजेस नवे नवे हक्क देऊ अशीं पोकळ अभिवचनें तो आपल्या अधिकाऱ्यांचे तोंडून वदवीत आहे. पण या अभिवचनांचा फोलपणा प्रत्यक्ष प्रसंग येईल तेव्हां निदर्शनास आल्यावांचून राहील असें समजण्याइतके दुधखुळे जर्मन सोशियालिस्ट खास नसतील अशी सर्वांची समजूत आहे. ती कि[illegible] यथार्थ आहे याचें प्रत्यंतर देणारा काल समर्थ आहे.

## अमेरिकन सैन्य.

अमेरिकेनें जर्मनी विरुद्ध युद्ध जाहिर करतांना जी दिरंगाई केली तिचा वचपा आतां प्रत्येक बाबतींत त्वरा करून सव्याज काढण्याचा त्या राष्ट्राचा विचार दिसतो. अमेरिका नुसतें युद्धच जाहिर करून स्वस्थ बसणार नाहीं. ती फ्रान्समध्यें दोस्त राष्ट्रांच्या मदतीस आपलें सैन्य पाठवून न्याय व नीति यांच्या संरक्षणाचें पुण्य संपादण्यांत दोस्त राष्ट्रांशीं भागीदार होऊं चाहत आहे. फ्रा-न्समध्यें पाठविण्याच्या सैन्याच्या भरतीचें काम सुरू आहे व हें काम मि. रूझ-वेल्टसारख्या पुरुषानें हातीं घेतल्यावर दीड महिन्याच्या अवधींत १ लक्ष ८० हजार माणसांची भरती झाली या बद्दल कोणा-ला ही आश्चर्य वाटणार नाहीं. या सैन्यांत मोठमोठाले व्यापारी, कारखानदार वगैरे सधन व वजनदार गृहस्थ असून ते आपला सगळा खर्च स्वतः सोसणार आहेत. अमे-रिकन लोक ज्या कामांत पडतील तें काम अर्धवट कधीं राहावयाचें नाहीं हा या राष्ट्राचा बाणा या युद्धांत ही उत्तम प्रकारें दिसून येईल.

## विमानांचा हल्ला.

जर्मन सैन्याचें जमिनीवर आतां कांहीं चालत नाहीं असें पाहून जर्मन शत्रूंनीं पे-ट्रोग्राडवर उत्तरेकडून आरमारी हल्ला कर-ण्याचा विचार केला आहे. पण तिकडे हो इंग्रजांचा सबमरिनें आहेत. तेव्हां तेही प्रयत्न यशस्वी होईल अशी खात्री न वा-टल्यामुळें व जर्मनिमधल्या लोकांच्या अधीर मनाला धीर आणण्यासाठीं मधून मधून लंडनवर विमानांचे हल्ले पाठवावे लागत असतात. त्याप्रमाणें गेल्या आठवड्यांत पुष्कळ जर्मन विमानांनीं मागच्या रविवारीं लंडनवर एकदम येऊन मोहीम सुरू केली. पण इंग्रज सावध होते. त्यांनीं त्यांतलीं सात विमानें धरणी तलावर आणिली. नुकसान ह्मणण्यासारखें कांहीं झालें नाहीं.

## मॉस्लेम लीगचें डेप्युटेशन.

हिंदी राष्ट्रीय सभेकडून स्वराज्य हक्क प्राप्तीच्या चळवळी साठीं विलायतेंत खटपट करण्यासाठीं डेप्युटेशन पाठविण्याचें ठरल्या-प्रमाणें तें लवकरच तिकडे जाईल. पण त्यांच्या कार्याला पुष्टि देण्यासाठीं मॉस्लेम लीग कडून ही एक स्वतंत्र डेप्युटेशन विलायतेला पाठविण्याचें ठरलें असल्याचें कळतें. या डेप्युटेशनमध्यें महमुदाबादचे ना. राजेसाहेब, ना. मि. मझरुल्हक, व मुंब-ईचे ना. मि. जिना यांचीं नांवें आहेत. याशिवाय सगळ्या प्रांतांच्या प्रतिनिधींचें ह्मणून एक मुसलमान डेप्युटेशन मागाहून निराळें जावयाचेंच आहे. इतके भारतपुत्र आपल्या मातृभूमीच्या सेवेसाठीं स्वार्थत्याग करण्यास तयार झाल्यावर परमेश्वर त्यांच्या प्रयत्नाला खास यश देईल असा भरंवसा प्रत्येक हिंदपुत्रास वाटत आहे यांत नवल नाहीं.

## पुरुषसूक्त.

### (नाशिक क्षेत्राचें पुण्यस्नान)

नाशिक येथील प्रांतिक परिषदेला गेल्या शनिवारीं आरंभ होऊन आज शेवटची बैठक आहे. नाशिक येथें राजकीय प्रगतीला विलक्षण भरती आलेली आहे प्रतिनिधींची संख्या ३ दिवसापूर्वींच हजाराचे जवळ पोचली होती. उद्या व परवा येथें सामाजिक परिषद भरणार असून मुंबईचे प्रसिद्ध बॅरिस्टर रा. जयकर एम ए. एल. एल बी. हे अध्यक्षस्थान स्वीकारणार आहेत. आणि येत्या गुरुवारीं व शुक्रवारीं तेथें स्वराज्य संघाची निराळी जाहीर सभा भरणार असून राजश्री टिळक पुढील कार्याच्या रेषा स्पष्टतेनें आखून देतील. नाशिक येथील हा वाग्यज्ञाचा सप्ता उच्च उच्च विचारांनीं जेव्हां सर्व महाराष्ट्राचें वातावरण उज्वल करील, तेव्हां लोकांच्या कार्यदिशा पुन्हा व्यवस्थित होऊन महाराष्ट्राची मनोभूमी वर्तमान स्थितीला शोभेल अशी अधिक अधिक बनत जाईल.

हल्लीं विलायतेंत महायुद्धानें जी मानवी उन्नति चालविली आहे, तिच्यामध्यें फाजील श्रीमंतीचा व रावणशाही अतिरेकाचा उच्छेद चालला आहे, आणि आमच्याकडे त्याच्या पेक्षांही उच्चतीची उन्नति करण्याकरितां विनम्रता, स्वार्थत्याग हीं शिकवून निराळेंच राष्ट्रीय पुरुषसूक्त शिकविण्यांत येत आहे. विलायतेंत युद्धामध्यें व्हाइसरॉय सारख्यांची मुलें मरतात, तेव्हां तो रक्तपात सर्व इंग्लिश राष्ट्राला उच्चतर नेतो आणि इकडे शरी राच्या रक्तपातापेक्षांही मनाचें अधःपतन करणारीं कारणें दूर फेकून देणारी ही परिषदांची आकाशवाणी विलक्षण कार्य करीत आहे. तेव्हां या नव्या घटनेंत का-ळागोरा भेदाभेद जाऊन सर्व ब्रिटिश सा-म्राज्याचें एक निराळेंच पुरुषसूक्त प्रथित होईल असा आम्हांस विश्वास वाटतो.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—मध्यंतरीं जें मोठें तुफान झालें व सर्व हिंदुस्थानभर थोडा बहुत पर्जन्य झाला, त्यांच्यामुळें आमच्या प्रांताच्या सपाट मैदानावर ही अबूच्या पहाडांतील उत्साहवर्धक, तेजस्वी व पवित्र हवामान हल्लीं आह्मी अनुभवीत आहों. वातावरणांतील चम-त्कारांचें हें पिंगल संवत्सर आरोग्य संपदा सर्वत्र प्रसृत करीत आहे. रात्रींचीं तारांगणें शरीर वृद्धीला फार तेजी आणतात तेव्हां या कृष्णपक्षांत उघड्या हवेंतील झोपेची श्रीमंती जो उपभोगणार नाहीं त्याचा जन्म निरर्थक होय.

रा. रा. दिगंबर कृष्ण कोल्हटकर आ-डिशनल डिस्ट्रिक्ट जज्य आकोला यांस नव्या घटनेंत ६०० रुपयांच्या दर्जाची बढती मिळाली असून त्यांची येथून चांदा येथें आडिशनल डिस्ट्रिक्ट जज्यच्या जागीं बदली करण्यांत आलेली आहे. त्यांच्या सन्मानार्थ सर्वानुमतें येथील वकील मंडळींनीं एक मोठी मेजवानी केली तेव्हां सद्गुण पूजास्थानीं कसे पोचतात हें चांगलें निद-र्शनास आलें. अधिकार लोकोपकारी करतांना राजश्री कोल्हटकर आत्मोन्नतीच्या शाळेचेच वर्ग चढत जातात ही आनंदाची गोष्ट होय.

रा. रा. गोपाळ वामन बापट डिस्ट्रिक्ट जज चांदा यांस नव्या घटनेंत ५०० च्या सब जजच्या जागीं परत यावें लागलें हें पाहून वऱ्हाडच्या मंडळीस ज्युडिशियल कमिशनर साहेबांचा मोठा राग येईल. राजश्री बापट हे मनोराज्यांतले सुवर्णकार आहेत. त्यांस अकबरी मोहरांचा व्यवहार समजतो, तितका गिनी गोल्डचा पाश्चात्य अभ्यास नाहीं, ह्मणून असें हें आंदोलन होत असलें पाहिजे.

रा. रा. श्रीधर बळवंत गोखले हाय कोर्ट वकील हुशंगाबाद यास नेमाड विभागाचे पब्लि-क प्रासिक्युटर नेमण्यांत आलें आहे. या नेमणुकीबद्दल आमच्या या जुन्या वऱ्हाडच्या वकील साहेबांचें अभिनंदन करण्यापेक्षां आह्मी सरकारी योजनेचीच तारीफ करितों.

**युद्धकर्ज**— सरासरी १९ कोटी जमले आहे. आणि त्यापैकीं ३२९१८०० रुपये आमच्या प्रांतांतलि जमले आहेत.

**किल्ला**—लोकांच्या इच्छा व म्युनिसिपा-लिटीची शक्ती यांच्यामध्यें जेव्हां अंतर पडतें, तेव्हां त्या काटेरी रस्त्यांतील संकटें निवारणाऱ्या म्युनिसिपालिटीच्या चांगल्या कार्याची योग्य वाहवा होत नाहीं हें आ-ह्मांकडे आलेल्या खुद्द सेक्रेटरी साहेबांच्या पत्रावरून कबूल करावें लागतें. आणि गेल्या प्लेगच्या बंदोबस्ताबद्दल अशी ४५९० रुपयांच्या विशेष खर्चाबद्दल आह्मी म्युनि-सिपालिटीचे आभार मानून नव्या आशांचा किल्ला बांधीत आहों.

**पुरवणी**—आजच्या अंकासोबत बेळगांव येथील श्रीरामतत्वप्रकाश प्रेसचे मालक राजश्री आबाजी रामचंद्र सावंत यांची पुस्तकांची पुरवणी वाटली जात आहे तिकडे वाच-कांनीं लक्ष द्यावें.

## नोटीस

**नोटीस कलम ११ आक्ट ८ सन १८९० प्रमाणें.**

किर. दिवाणी मुकदमा नंबर ३९ सन १९१७ इ.
विद्यमान डिस्ट्रीक्ट जज साहेब यांचें कोर्ट

मुक्काम आकोला

नांव फत्तु
बापाचें नांव सखाराम
जात कुणबी राहणार हिवरखेड
तहसील आकोट जिल्हा आकोला
च्या अल्पवयी नारायण व गंगाराम कुणबी
उमर वर्षें १२
राहणार सोनाळा ता. बाळापूर तहसिलीचे (२)
शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालनकर्ता (१)
नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं—

सर्वत्र लोकांस कळविण्यात येते कीं सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयींचें (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालन कर्ता नेमला जाण्या विषयीं अर्ज केल्यावरून सदर्हु अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख ३० माहे जून सन १९१७ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जा-बद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर झाले पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख ४ माहे मे सन १९१७ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्या निशीं दिली.

सही
W. R. Dhobley
डि० जज
पश्चिम वऱ्हाड
आकोला

नो. नं. २१२


# विकाऊ वाडा.

आकोला येथील हनुमान वस्तीतील हाश-मशेटचे धर्मशाळे जवळील आमचा वाडा विकावयाचा आहे. सर्व घर फार उत्तम स्थितींत नाक्यावर व हवाशीर असें आहे. उत्पन्नाच्या मानानें या घराच्या खरेदींत घातलेल्या रकमेला चांगलें व्याज येईल. गरजू मंडळींनीं आमची समक्ष गाठ घेऊन किंमतीचा खुलासा करून घ्यावा.

गंगाधर वामन परांजपे
रा. आकोला.

नो. नं. २१३

## नोटीस

नोटीस बेशमी तुळसाई मारुती कृष्णपक्षी राहणार वरूड बुजरुक पोष्ट तेल्हारा तालुके आकोट व सर्वत्र साहुकार मंडळीसः---

या जाहीर नोटिशीनें खालीं सही करणार कळवितो कीं, तूं (तुळसाई) माझी भावजयी असून विधवा आहे. तुला संतती नाहीं. व वडिलोपार्जित आपली इस्टेट ह्मणजे मौजे वरूड बुजरुक तालुके आकोट येथील शेत सर्वे नंबर ८३ पैकीं पोट हिस्सा नंबर १ क्षेत्रफळ ४ एकर ६ गुंठे आकार रुपये ८८= व एक घर एक आड्याचे.

येणे प्रमाणें आहे. तूं हल्लीं कर्ज वगैरे काढण्याचे विचारांत असल्यानें कळवितो कीं तूं कर्ज करूं नयेस. व केल्यास त्याची जबाबदारी वरील स्थावर इस्टेटीवर राहणार नाहीं. तुझी तूं वरील कर्जास जबाबदार राहाशील. तसेंच सर्वत्रांस ही कळवितो कीं, कोणी वरील बाई जवळून ही इस्टेट गहाण खरेदी अगर पट्यानें घेऊं नये घेतल्यास जबाबदारी या इस्टेटीवर राहणार नाहीं. आगाऊ कळविले आहे. ता. ३-५-१७

सही
विठोबा बिन जानभट कृष्णपक्षी राहणार वरूड बुजरुक नि. आंगठा
नो० नं० २०९

---

## नोटीस

नोटीस बेशमी रान्या वा संभ्य महार राहणार मौजे किनखेड तालुके वाशिम

यांसः--

खालीं सही करणार काशी मर्द रान्या जात महार राहणार मौजे सोयत तालुके वाशिम इच्याकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून लग्न होण्यास सुमारें १० वर्षे झालीत. तेव्हां पासून तुह्मी मजला नेण्यास आले नसून मी आपले आईबापाचे येथें राहात आहे. तुह्मास पुष्कळवेळां मजला नांदविण्यास माझे आईबापानीं तुह्मास सांगितले परंतु तुह्मी मजला नांदविण्यास आपले घरीं नेत नाहा. व दुसरी बायको करून संसार करीत आहां. व मी नांदण्यास राजी असून मजला नांदवित नाहीं. व माझे खावटीबद्दल रुपये ४ चार दरमहा प्रमाणें लागत असून १० वर्षांचे रुपये ४८० चारशे ऐंशी माझे बापावर कर्ज झाले आहे. तर या नोटिशीनें तुह्मास कळविल जाते कीं, ही नोटीस पावल्यापासून आठ ८ दिवसाचे आंत कर्जाचे रुपये सदर्हू प्रमाणें देऊन मजला नांदविण्यास न्यावे. तसें न केल्यास हीच फारकती समजून मी दुसरा घरोबा करीन. मग आपला नवरेपणाचा हक्क मजवर राहणार नाहीं. व नोटिशीचा खर्च आपणास द्यावा लागेल कळावें. तारीख ७ माहे मे सन १९१७ इसवी दस्तुर रामजी वा शिवराम अर्जनवीस वाशिम.

सही
काशी मर्द रान्या महार राहणार सोयत इची निशाणी बांगडी असे
नो० नं० २१०

---

## नोटीस

नोटीस बेशमी तोताराम वा तुकाराम तेली रा० मौजे साकळी बुा प्रगणे देऊळघाट तालूका चिखली जिल्हा बुलडाणा

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझी मुलगी नामे तानुबाई ही तुह्मास दिली असून तिचे व तुमचे विवाहास १-११ वर्षे झाले. तेव्हां पासून तिला तुह्मी आपले घरीं नेले नाहीं व नांदवले नाहीं. या १०-११ महिन्यांत तुह्मी तिला घरीं नेले होते ती ११ महिने तुमचे घरीं राहिली. त्या अकरा महिन्यांत तिला तुह्मी चांगले रीतीनें न वागवतां मारहाण तिचे जिवाचे ही पलीकडे (तिच्यानें सहन न होईल) असी केली. त्यां त्रासास त्रासून ती आज आठ दिवसांपासून माझे घरीं आली आहे. ती माझे घरीं आली त्यावेळीं तिचे आंगावर तुमच्या घरचा एकही डागिना चांदीचा अथवा सोन्याचा नव्हता. तुम्ही तिला नेहमी मारहाण करितां त्यामुळें तिचे आंगावर वेताचे वगैरे बरेचसे वण्ही आहेत.

करितां या नोटिसीनें तुम्हास कळवते कीं तुह्मास माझे मुलीस चांगलें रीतीनें वागवणें नाहीं असे दिसते. करितां तुम्ही माझे मुलीचे उदार्निर्वाहा प्रित्यर्थ दरमहा रुपये पांचप्रमाणें पाठवीत जावे न पाठविल्यास मी तुमचेवर अन्नवस्त्राचा दावा करीन अगर चांगले रीतीनें वागवण्याची असल्यास जातीचे चारपंच जे तुमच्या चांगल्या वागणूकीची खात्री देतील असे घेऊन यावे म्हणजे मी मुलीला पाठवीन कळावें ता. ९-५-१७ इसवी.

सही
तानु आ. पा. रंगु मर्द असरु तेली सागवण ता. चिखली नि. आंगठा

मी रंगु मर्द आसरु तेली प्रतिज्ञेवर कळविते कीं सदरील नोटिसीतील मजकूर मी सांगितलेल्या प्रमाणें मला वाचून दाखविला तो बरोबर आहे. ता. ९-५-१७ इसवी

सही
तानुबाई अ. पा. मा. रंगु मर्द आसरु तेली रा. सागवण ता. चिखली जि. बुलडाणा इचे नि. चा आंगठा

नो. नं. २११

---

NOTICE

The Public is hereby informed that Mr. M. G. Thakar, Secretary, Akola People's Club, has applied for a plot of Nazul Land near the Europeon culb, measuring 200, × 150, to the southern side of the road leading from the Town Hall to the Europeon Club, for building a club honse, and it will be dealt with on the 12 th June 1917. in the Court of the Extra Assistant Commissioner Akola.
Dated Akola the 5th May 1917.

[ F. L. Grille]
Assistant Commissioner,
Akola.

No. N. 198

---

पैसा मिळविण्याची नवी विद्या शिका.

# क्रोमोपॅथी इंस्ट्रक्टर

अर्थात्

## वर्णजलचिकित्सा–शिक्षक.

ज्या दिव्यौषधीच्या प्रभावानें आज युरोप, अमेरिकेसारख्या सुधारलेल्या देशांत सुद्धां नाना तऱ्हेचीं औषधें घेऊन कंटाळलेले हजारों असाध्य रोगी रोगमुक्त होत आहेत, त्या अपूर्व विद्येची सप्रमाण व सप्रयोग माहिती ह्यांत दिली असून ही गुप्त पण अगदीं सोपी विद्या प्रत्येकानें अवश्य शिकून कधीं न संपणारा व हटकून गुण देणारा दिव्यौषधींचा दवाखाना उघडावा! रोगग्रस्तांना नवजीवन प्राप्त करून द्या! पैसा व कीर्ति मिळवा. किं अवघी ८८, व्ही. पी. नें ८१०. जरूर मागवाच.

प्रो. ज्ञानमित्र, शनवार पुणें सिटी.
नो. नं. १९९

---

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तूरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्मीसंबंधी सुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मुत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांची कावा, सकाच, पुयस्त्राव, रक्तस्त्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्ही० नें पाठवू.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रींची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, योक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० बे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी, पो० हर्णै, जिल्हा रत्नागिरी.

नो० नं० २२

हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१] आकोला—सोमवार तारीख २१ माहे मे सन १९१७ ई० [अंक २०

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपये.
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अग यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } Lyon Scott एजंट
नो नं १

### सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**—उत्तम पानें व टिकाऊ पक्का रंग किंमत ॥।, १, १।, १॥, २, २॥, ते ५ रु. प. **बुद्धीबळजोड लांकडी**— किंमत ॥। १, १॥, २ ते ४ रु. प. **सोंगट्या जोड**— किंमत ।, ॥, ॥।, १, १॥, रु. प. **खडावा जोड**— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान टिकाऊ व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट

डी. आर. आळवणी, स्टेट सावंतवाडी
नो. नं. ३

---

## रोल्डगोल्ड सोन्याचे
### कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. रु. १-४; गोट जोडी २-२॥; पाटल्या जडी १-२॥; वज्रटीका ३-४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४-५. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सराची २-३-४; अंगठी १; सल्ले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २-२॥. सरी ४

### केंस काळे करण्याचा साबण.

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाक्सची किं. १॥ रु.

पत्ता- **मगनलाल के. आणि कंपनी**
**गिरगांव- मुंबई**
नो० नं० ५

---

अगोदर हे वाचा नंतर निराश व्हा.

## नशिबाची- परीक्षा.

सवलत— पुढील पांच कामें एकावेळीं मागविणारास २॥. रुपयांत पाठवूं, किरकोळ एकेका कामास पुढील प्रमाणें फी पडेल. (१) इच्छेप्रमाणें वाटेल त्या पांच प्रश्नांचे उत्तरास १।. रु. (२) एक वर्षाचे वर्ष फलास १॥ रु. (३) छापील फार्मावर सर्व माहिती सह पत्रिकेस १। (४) जन्म कुंडलीवरून सुप्रसिद्ध ग्रंथाधारें आयुष्य असेपर्यंतची फलें लिहून पाठविण्यास १॥. रु. (५) इच्छित कार्यांत यश येऊन अनिष्ट ग्रहांची पीडा निरसन व्हावी त्या करितां एका महान सिद्ध पुरुषाचा प्रासादिक ताईतास ३।. सूचना— ग्राहकांनीं वरील कामा करितां साग्रजन्मकाल व प्रश्नवेळ व वय लिहून कळवावें. विशेष खुलासा पत्रद्वारें उत्तरास ८- आण्याचे तिकिट पाठवावें.

ज्यो. डि. टि. मायधनी
म्या. ज्योतिषकार्यालय. चांडडकर
पेठ— नाशिक
नो० नं० ७३

---

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H L Batliwala Sons & Co. Ltd.**
N. N. 6 Dadar Bombay

---

## श्री दत्तात्रय अलंकारालय
### कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीफुलें, बिल्वदळी टीका, मुदी अग्रफुलें साखळ्या व घागऱ्याचीं वगैरे स जातीचा माल-तसेच चांदीच्या मासोळ्या चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, इत्यादी माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोन्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निवण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रेल्वेनें अगर व्ही पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर

---

## आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका. आपले आयुष्याचा विमा **धि एशियन कमार्शियल अशूअरन्स** कंपनी लिमिटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने माहिती आमचे वऱ्हाड आणि मध्यप्रांताचे फिरते एजंट रा. रा वि रा. सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटाची जरूरी आहे.

सेक्रेटरीज
धी एशियन कमार्शियल अशूअरन्स
कं. लि. इस्मायल बिल्डिंग्ज.
फोर्ट, मुंबई.
नो. नं. ८

## काश्मीरी केशर.

पवित्र आणि अस्सल १८८ उत्तम कस्तुरी ३५, शुद्धशिलाजीत ८८ सुर्मा ममीरा ३ तो. अंगूरी हींग २।, सुगंधित जीरा १ कागजी बादाम ८९ पौंड, बादाम मुरब्बा २ पौं. टिन १

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५
नो० नं० ९

अगोदर हें वाचा. नंतर निराश व्हा.

## प्रारब्धपरीक्षा
### फुकट पाठवूं.

खालील दोन्ही कामें एकदम मागविणारास छापील फार्मावर संपूर्ण माहितीसह पत्रिका बक्षीस म्हणून फुकट करून पाठवूं.

फक्त प्रश्न, वेळ आणि वय व इच्छेप्रमाणें वाटेल ते ६ प्रश्न स्पष्ट लिहून पाठवावे उत्तर १ रु ८४ चे व्ही. पी. नें अनुभवशीर पाठवूं. शिवाय जन्मकुंडलीवरून एका सुप्रसिद्ध ग्रंथाधारें आयुष्य असे तों चीं फलें लिहून पाठविल्यास १ रु. ८४ विशेष माहिती पत्रद्वारें उत्तरास ८१ तिकीट पाठवा.

ज्योतिषी दा. दाजि शास्त्री नं. १०३७
नो. नं. ७३ नाशिक

वऱ्हाडसमाचार

वैशाख वद्य ३० पिंगल संवत्सर १८३९

## स्वराज्याची मागणी.

लोकांच्या वाजवी मागण्या त्यांना देऊन टाकण्यांत सरकारी अधिकारी जितका जितका विलंब करतील, तितका तितका त्या मागण्यांना अधिकाधिक जोर येऊन लोकांचा पक्ष प्रबळ होत असतो, हें तत्त्व गेल्या तीन वर्षांतल्या राजकीय चळवळीच्या इतिहासावरून इतकें स्पष्ट झालें आहे कीं तें आपणांस दिसत नाहीं असें म्हणणें म्हणजे मुद्दाम अंधत्वाची बतावणी करणें होय १९१६ सालीं मुंबईच्या कांग्रेसचे वेळीं अध्यक्ष सर सत्येंद्र प्रसन्न सिंह यांनीं हत्याराच्या कायद्या विरुद्ध जोराचें भाषण करून राजकीय सुधारणा करण्यासंबंधानें सरकारनें आपला उद्देश नुसता तूर्त जाहिर करावा येवढीच मागणी केली होती, आणि ही सुद्धां त्याकाळीं मोठी धीटपणाची मागणी वाटत होती. पण गेल्या दोन वर्षांत हिंदुस्थानांतल्या राजकीय पुढाऱ्यांच्या विचारांत ध्येयांत, वर्तनांत व धोरणांत इतका फरक पडला आहे व हा फरक पडण्यास युद्धसंबंधाच्या गोष्टींचें वातावरणच पुष्कळ अंशीं कारण झालें आहे कीं आतां ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वायत वसाहतींसारखे स्वराज्याचे पूर्ण हक्क व ते ही अविलंबेंकरून हिंदुस्थानाला प्राप्त झाले पाहिजेत, व त्या हक्कास हिंदुस्थानचे लोक सर्व प्रकारें लायक आहेत असें मत कांग्रेसचे, मुस्लीम लीगचे, होमरूल लीगचे व इतर समाजाचे पुढारी एकतानतेनें उच्च स्वरांत घोषणा करून मागत आहेत. बडोद्याचे माजी दिवाण मि. व्ही. पी. माधवराव हे असंतुष्ट, उपद्रव्यापी राजकीय चळवळ्यांपैकीं नाहींत. राज्यकारभार करणारांवर केवढी जबाबदारी असते व त्यांत कोणत्या अडचणी येतात याची त्यांना पूर्ण जाणीव आहे. अशा माणसाच्या मताचा आदरपूर्वक विचार हिंदुस्थान सरकारास करणें भाग आहे. मि. माधवराव म्हणतात कीं सध्याचा काळ मोठा निकराचा आहे. लोकांच्या राजकीय मागण्याचा कांहीं तरी निकाल आतां सरकारला लावावयासच पाहिजे. १८५७ च्या बंडानंतर कंपनी सरकारच्या हातून हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें ब्रिटिश सरकारनें स्वतःच्या हातीं घेऊन कंपनी सरकारच्या अंमलदारांच्या जुलुमांचा अंत केला. आतां त्यानंतर ६० वर्षांनीं खुद्द हिंदुस्थानांतल्या सरकारनियुक्त अधिकाऱ्यांनीं चालविलेल्या अनियंत्रित अधिकारांचा अंत करून त्याबद्दल लोकतंत्री संस्थांचा अधिकार स्थापन करण्याची वेळ खचित् आली आहे. गेल्या आठवड्यांत नाशिक येथें भरलेल्या प्रांतिक सभेचे अध्यक्ष ना. श्रीनिवास शास्त्री यांनीं ही स्वराज्याच्या हक्काच्या मागणीचा कर्णा मोठ्या जोरानें फुंकून सर्व महाराष्ट्रदेश, गुजराथ, सिंध, वऱ्हाड, वगैरे प्रांतांना जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे. मि. माधवरावासारखे राजकीय चळवळीपासून आजपर्यंत सर्वथा अलिप्त राहिलेले गृहस्थ ही स्वराज्याचें ध्येय पुढें मांडतांना जेथें दिसतात, तेथें आतां प्रत्येक मनुष्य मात्र स्वराज्यवादी आहे असें म्हणण्यास शंकेला तिळमात्र जागा नाहीं असें म्हटलें पाहिजे बिकानेरच्या महाराजांना किंवा त्यांच्या सारख्या पोलिटिकल पंजरस्थ शुकांना स्वराज्याचे हक्क हिंदुस्थानास आतांच मिळणें रास्त आहे असे जरी वाटले तरी अंतःकरणांतले खरे विचार प्रकट करण्याचे कामीं फार अडचणी असतात हें आम्हांस ठाऊक आहे. तथापि त्यांनीं सुद्धां युद्धोत्तर काळीं राजकीय संघटनेंत दुरुस्ती करून पुनर्रचना करण्याची अवश्यकता स्पष्टपणें बोलून दाखविली आहे. सारांश, गेल्या दोन अडीच वर्षांत स्वराज्याच्या मागणीचें समर्थन इतक्या निरनिराळ्या रीतीनें व अकल्पित व्यक्तीकडून अकल्पित प्रसंगीं व अकल्पित प्रकारें झालें आहे कीं ही लोकांची विचारक्रांति मानवी कल्पनेच्या अतीत अशा परमेश्वरी प्रेरणेनेंच झाली आहे असें वाटणें स्वाभाविक आहे.

हिंदुस्थान स्वराज्याच्या हक्काला पात्र नाहीं हा आंग्लो इंडियन पत्रकर्त्यांचा युक्तिवाद इतका शिळा झाला आहे कीं तोच तो वाद जुन्या प्रमाणानीं लोकांपुढें मांडण्याची लाज सदर पत्रकर्त्यांना वाटूं लागली आहे. म्हणून आपल्या पक्षाच्या समर्थनार्थ नवें प्रमाण शोधण्याची त्यांचा खटपट चालली आहे. कलकता युनिव्हर्सिटीच्या परीक्षेचे प्रश्न फुटल्याचें बाहेर आल्याबरोबर तुम्हां हिंदी लोकांना नुसत्या एका परीक्षेची व्यवस्था नीट करतां येत नाहीं, याहून तुमच्या अपात्रतेचें दुसरें प्रमाण काय पाहिजे? असा प्रश्न पायोनियर कर्त्यानें मोठ्या ऐटीनें विचारला. पण या प्रश्नामुळें बाजू उलटी सरकारच्याच अंगावर येते हें त्या पत्रकर्त्याच्या लक्षांत आलें नाहीं. कर्झनशाहीच्या वेळीं झालेल्या युनिव्हर्सिटी आक्टानें युनिव्हर्सिटीचा सगळा कारभार सरकारी अधिकारी व सरकारनियुक्त फेलो यांच्या हातीं दिला आहे, व त्यांच्यानें जर परीक्षेची व्यवस्था नीट लागली नाहीं तर यावरून सरकारची निवड चुकीची होती हीच गोष्ट सिद्ध होते. अर्थात् हें प्रमाण स्वराज्यवाद्यांच्या म्हणण्यास विरोध करणारें नसून उलट त्याचें समर्थनच करणारें आहे. लोकनियुक्तांच्या हातीं जर युनिव्हर्सिटीचा कारभार असता तर अशी फजीती झाली नसती हाच याचा गर्भितार्थ आहे.

## सर स. सिंह आणि स्वराज्य.

सर सत्येंद्र प्रसन्न सिंह यांनीं ख्रिश्चियन सायन्स मॉनिटॅार नांवाच्या एका अमेरिकन पत्राच्या बातमीदारापाशीं स्वराज्यासंबंधानें काढलेले उद्गार वाचून आंग्लो-इंडियन पत्रकारांची स्थिति ब्रूटसनें आपल्या छातींत खंजिर खुपसलेला पाहणाऱ्या जुलीयस सीझर सारखी होईल. सर स. सिंह यांनीं वार कान्फरन्स पुढें जें भाषण केलें व इंग्रजी राज्याची स्तुति गाईली तो प्रसंग औपचारिक असल्यामुळें व स्वराज्याच्या हक्काची मागणी करण्यास सर्वथा अनुचित असल्यामुळें त्या भाषणानें हुरळून जाऊन आंग्लो-इंडियन पत्रें म्हणूं लागलीं कीं सिंहासारखे जबाबदार हिंदी वक्ते स्वराज्यासारखे अशक्य व भलभलते हक्क कधीं मागावयाचे नाहींत. या लेखकांच्या लेखांची शाई वाळली नाहीं तोंच उपरोक्त अमेरिकन पत्राच्या बातमीदारापाशीं सर स. सिंह यांनीं आपलें हृदयकपाट उघडे करून दाखविलें. वॅार कान्फरन्स पुढच्या त्यांच्या भाषणांत त्यांनीं मोघमपणें इतकेंच म्हटलें होते कीं हिंदुस्थानाविषयींच्या ब्रिटिश सरकारच्या राजनीतीचा पाया विस्तृत झाला पाहिजे. अमेरिकन पत्राच्या बातमीदाराशीं बोलतांना या वाक्यावर त्यांनीं स्वतः केलेलें भाष्य पाहिलें म्हणजे ते मिसेस ॲनी बिझांट, रा टिळक किंवा मि. व्ही. पी. माधवराव यांच्या सारखेच जवळ जवळ स्वराज्यवादी आहेत असें कोणास ही दिसून येईल. आम्ही स्वराज्याच्या हक्कास ज्याप्रमाणानें पात्र होऊं त्या प्रमाणानें ते हक्क आम्हांस मिळाले पाहिजेत असें त्यांनीं सांगितलें. यावर तुम्ही त्या हक्कास पात्र नाहीं अशी शंका कदाचित् कोणी घेईल म्हणून ते म्हणाले कीं जर आमचे कर्तृत्व दाखविण्याची संधीच तुम्ही दिली नाहीं, तर आमची पात्रता तरी तुम्हांला कशी कळणार? ज्या ठिकाणीं अशी संधी हिंदी लोकांना मिळाली त्या प्रसंगीं त्यांनीं चांगलें काम ही करून दाखविलें आहे. सर स. सिंह यांच्या या विधानाचें समर्थन त्यांची हिंदुस्थान सरकारच्या कार्यकारी कौंसिलांतली कामगिरीच उत्तम प्रकारें करीत आहे. राज्यकारभाराचा अनुभव नसल्यामुळें आरंभीं आरंभीं आमच्या लोकांच्या हातून घोडचुका ही कदाचित् होतील, पण आमच्यावर टाकलेला विश्वास अनाठायीं होता असें त्यावरून तुम्हाला म्हणतां येणार नाहीं असें त्यांनीं निक्षून सांगितलें. स्वराज्यवादी बिझांटबाई किंवा टिळक तरी हेंच सांगतात!

## स्वराज्य कीं सुराज्य.

सुराज्यापेक्षां स्वराज्याची मोहिनी कांहीं अजब आहे. सर हेनरी कॅ. बॅनरमन सारख्या इंग्रजी मुत्सद्यानें सुद्धां तिचें महत्त्व कबूल केलें आहे. पण ती मोहिनी हिंदी माणसानें मनांत वागावितां किंवा उच्चारून दाखवितां कामा नये असें हिंदुस्थानांतल्या अधिकाऱ्यांना वाटतें. असा कोंडमारा केल्यानें आम्हां हिंदी लोकांच्या आकांक्षेचा अंकूर खुंटून जाण्याची भीती आहे. म्हणून आम्हांस स्वराज्याचे हक्क अधिक महत्त्वाचे वाटतात. ब्रिटिश सरकारला ही गोष्ट कळत नाहीं असें नाहीं. इंग्रज लोक स्वातंत्र्यप्रिय आहेत. खऱ्या हाडाच्या इंग्रजाला दुसऱ्या राष्ट्राचें स्वातंत्र्य कायमचे हिरावून घेण्याचा पापमूलक विचार दुःसह वाटतो; आणि म्हणूनच हिंदुस्थानाचा आज नाहीं उद्यां स्वराज्याचे हक्क देणें न्यायाचें व वाजवी आहे ही गोष्ट अलीकडे इंग्रज मुत्सद्दी व लेखक उघडपणें कबूल करूं लागले आहेत. हे हक्क हळूं हळूं द्यावयाचे कीं आतांच द्यावयाचे एवढाच काय तो प्रश्न आहे. सर स. सिंह व मुंबईचे टाइम्सकर्ते म्हणतात कीं आम्ही तुम्हाला ते हक्क देऊं असें सरकारनें आतांच आश्वासन द्यावें यांतलें इंगित हेंच आहे.

## केसरीची साक्ष.

आम्ही गेल्या अंकांत देशी संस्थानिकांसंबंधानें जे लेख लिहिले ते त्या संस्थानिकांनीं डोळे उघडून जगांत प्रगति कशी चालली आहे तें ओळखावें व आपण तेवढे देवाचे लाडके पुत्र— किंवा प्रतिदेवच आहों, आपल्याहातीं सत्ता आहे ती प्रजेवर आपलें प्रभुत्व गाजविण्याकारितां आहे, किंबहुना ब्रिटिश सार्वभौमत्वाखालीं आल्यामुळें आपणास जें थोडेबहुत गौणत्व आलें आहे त्याचें उट्टें 'वड्या चें तेल वांग्यावर काढण्या' च्या न्यायानें आपल्या प्रजेशीं वर्तन ठेवून काढण्यांतच आपणांस समाधान मानतां येईल, असे आकुंचित विचार मनांत बाळगण्याचे हे दिवस नाहींत हें सदर संस्थानिकांनीं ओळखून वेळींच सावध व्हावें अशा सद्धेतूनें लिहिले होते. हे आमचे विचार विक्षिप्तपणाचे किंवा एककल्ली नाहींत, तर त्यास मराठी भाषेंतल्या केसरी सारख्या सर्वमान्य पत्राचा ही पाठिंबा आहे हें ता. १५ च्या त्या पत्रांतल्या अग्रलेखावरून कोणाच्या ही ध्यानीं येईल. देशी संस्थानिक प्रजेला हक्क देण्याचे कामीं कशी कुचराई करतात, व आपल्या राज्यांत एकतंत्री राज्यव्यवस्था सर्रास राहावी याविषयीं किती खबरदारी घेतात, प्रजेपासून घेतलेल्या कराचा केवढा मोठा भाग स्वतःच्या व स्वकीयांच्या हातखर्चांत उपयोगांत आणितात, व प्रजेचें शिक्षण, आरोग्य, उद्योगधंद्यास उत्तेजन, वगैरे सारख्या प्रजेच्या कल्याणाचे कामीं तो पैसा खर्चणें त्यांच्या किती जिवावर येतें, प्रजेला वर्तमानपत्रें काढण्याची किंवा जाहिरसभा भरवून आपलीं दुःखें कायदेशीर रीतीनें प्रकट करण्याची सुद्धां कशी मनाई करण्यांत येते, व त्यांच्यावर प्रजामताचा तर दाब मुळींच नाहीं, पण त्यांच्या स्वैर वर्तनास थोडा बहुत आळा पोलिटिकल एजंटाचा असतो तोही उडाला तर त्यांना किती हवा असतो, वगैरे गोष्टींचें यथार्थ चित्र केसरीनें जें दिलें आहे तें वाचून देशी संस्थानिकांच्या प्रजेविषयीं कोणाचें अंतःकरण कळवळणार नाहीं?

## विद्यार्थी आणि राजकारण.

हायस्कुलांतल्या अपरिपक्व बुद्धीच्या विद्यार्थ्यांनीं राजकीय चळवळींत पडूं नये ही गोष्ट कोणालाही अमान्य होईल असें आम्हांस वाटत नाहीं. पण त्यांनीं कोणत्याही राजकीय विषयाच्या सभेला जाऊं सुद्धां नये, व भावी आयुष्यांत नागरिकत्वाच्या नात्यानें

आपणावर येऊन पडणाऱ्या जबाबदारीला तोंड देण्याची पात्रता अंगीं येण्यास अवश्य असें ज्ञान ही संपादूं नये असें म्हणणें हें अमळ चमत्कारिक दिसतें. कॉलेजांतल्या विद्यार्थ्यांना ही तशीच मनाई करणें हें तर अक्षम्य आहे. आपल्या देशाच्या राजकीय, सामाजिक, औद्योगिक वगैरे स्थितीचें यथार्थ ज्ञान त्यांनीं या वयांत संपादावयाचें नाहीं तर संपादावयाचें तरी केव्हां? त्यांनीं अभ्यासक्रमाच्या पलीकडे इकडे तिकडे पाहूं नये अशा सासुरवासांत आयुष्याचीं ऐन उमेदीचीं वर्षे घालविणारे तरुण पुढें उत्तम नागरिक स्वयंभूपणानें होतील अशी जर सरकारची समजूत असेल तर कॉलेज लायब्रऱ्यांतून या विषयांवर जीं पुस्तकें ठेवण्यांत येतात किंवा वाचनालयांतून नियतकालिकें घेतात तीं काय केवळ कपाटाच्या किंवा टेबलांच्या शोभेसाठीं? जर पुस्तकें व नियत कालिकें त्यांना वाचण्यास हरकत नसेल तर सदर पुस्तकें लिहिणारे किंवा नियतकालिकें चालविणारे संपादक भाषण करण्यास उभे राहिले असतां त्यांच्या अंतःकरणांतून निघणाऱ्या उद्गारांच्या जिवंत झऱ्याचें पाणी न पितां ग्रंथांतल्या साचक्या पाण्यावरच विद्यार्थ्यांनीं आपली तहान भागवावी असें म्हणणें म्हणजे मनाचें दौर्बल्य दाखविणें आहे. पण मद्रास सरकारासारखें शहाणेसुर्ते सरकार तें दाखवीत असलेलें पाहून कोणाला त्या सरकारची कींव वाटणार नाहीं? सरकारच्या अशा कृत्यांनींच तरुणांचीं मनें बहकतात, आणि उघडपणें ज्या शंका विचारून त्यांनीं त्यांचें निरसन करून घेतलें असतें तें करून घेण्याचा मार्ग बंद झाल्यामुळें गुप्त मंडळ्या स्थापन करण्याची दुर्बुद्धि त्यांना होते. पण खरोखर याबद्दल न्यायानें जबाबदार कोण आहे तें विचारी माणसांस सहज कळणार आहे

## शिक्षक आणि हिंदु युनिव्हर्सिटी

लार्ड कर्झनच्या कारकीर्दीतल्या युनिव्हर्सिटी आक्टानें हिंदुस्थानांतल्या युनिव्हर्सिट्यांचें स्वातंत्र्यापहरण करून त्यांना सरकारी अधिकाऱ्यांचे अंकित करून ठेविलें आहे. अशा गुलामगिरींत दिवस कंठणाऱ्या युनिव्हर्सिट्यांच्या संख्येंत भर टाकण्यासाठीं लोकांनीं लाखो रुपये देणगीरूपानें देऊन हिंदु युनिव्हर्सिटी खास अस्तित्वांत आणिलेली नाहीं; पण गेल्या आठवड्यांतल्या 'लीडर' पत्रावरून कळतें कीं हिंदु युनिव्हर्सिटीचे मुख्य उत्पादक व चालक ना. पंडित मदन मोहन मालवीय यांनीं सेंट्रल हिंदु कॉलेजांतल्या दोघा शिक्षकांनीं एका राजकीय विषयाच्या सभेंत अंग ठेविल्याबद्दल त्या कॉलेजच्या शिक्षक मंडळीला बोलावून आणून त्यांना तसें न करण्याबद्दल विनंतीच्यारूपानें ताकीद केली! मद्रास सरकारनें सर्क्युलर काढून हायस्कूल व कॉलेजच्या विद्यार्थ्यांनाच तेवढें सभेस जाण्याची मनाई केली. पण सेंट्रल हिंदु कॉलेजांत तर शिक्षकांना सुद्धां राजकीय चळवळींत पडण्याची मनाई! थोड्या वर्षांपूर्वी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजांच्या प्रोफेसरांचे ही असेच हात जखडून बांधण्याचा विचार मुंबई सरकारानें केला होता. पण त्या कॉलेजाच्या स्वाभिमानी प्रोफेसरवर्गानें सरकारच्या या विचाराचा तीव्र निषेध करून सरकारकडून मिळणाऱ्या ग्रांटची स्वाभिमानापेक्षां अधिक किंमत आह्मी समजत नाहीं असा रोखठोक जबाब दिल्यामुळें त्यांचें स्वातंत्र्यापहरण करण्याचें धैर्य मुंबई सरकारास झालें नाहीं. जो स्वाभिमान ना. मि. परांजपे, व त्यांच्यासहकारी प्रोफेसर वर्ग यांस दाखवितां आला तो ना. पंडित मदन मोहन यांना हिंदु युनिव्हर्सिटीच्या बाबतींत कां दाखवितां येऊं नये तें आह्मांस समजत नाहीं.

## महायुद्धाची प्रगति.

पश्चिम रणक्षेत्रावरील लढाई न मंदावतां उलट फार जोरानें सुरु आहे. शत्रूनें आपल्या अनेक शिपायांचे प्राण खर्ची घालून संयुक्तांच्या ताब्यांत असलेलें फेस्नाय ठाणें परत घेतलें. लष्करी दृष्टीनें हा त्यांचा विजय फार किफायतशीर होणार नाहीं. संयुक्त सैन्यानें मात्र मोठा पराक्रम गाजवून शत्रू सैन्याला दाद न देतां अनेक महत्वाचीं ठिकाणें हस्तगत केलीं त्यांतील मुख्य बुलेकोर्ट व रॉक्स ही होत. दोस्तांचा जय येथेंच थांबला नाहीं तर आरास-कॅब्राय कडील सेनापति हिंडेंबुर्ग यानें खणलेला १२ शें यार्ड खंदकही काबीज केला. पूर्वरणांगणावर राशियन फौजेची व शत्रूची स्टॉकेड नदी नजिक निकराची लढाई झाली तींत बरेच राशियन सैनिक मारले गेलें या चकमकी खेरीज पूर्वरणांगण शांतता अनुभवीत आहे असें ह्मटलें असतां चालेल.

गेल्या आठवड्यांत संयुक्तांच्या आरमाराचें नुकसान झालें नाहीं उलट ता० १४ रोजीं ब्रिटिश आरमारी जहाजानें एका विमानाचा उत्तर समुद्रांत नाश केला. पाणबुड्यांच्या मोहिमेवरच असलेल्या जर्मनीच्या आशेस अंकूर फुटलेला दिसत नाहीं. तथापि जर्मन ॲडमिरल पाणबुड्या हाच एक यशाची प्राप्ति होण्यास रामबाण उपाय आहे हें आपल्या लोकांस वारंवार सांगत आहेत.

या आठवड्यांत जर्मनीनें पुनरपि तहाची धडपड सुरुं केली आहे. ही चळवळ जर्मन सरकारनें स्वतः चालविली नसून आपल्या सोशियालिस्ट पक्षाकडून चालविली आहे. हे जर्मन सोशियालिस्ट राशियन सोशियालिस्टशीं संगनमत करून तहाची वाटाघाट सुकर करतील या उद्देशानें कैसरनें सोशियालिस्ट पक्षाला लोकसत्तावृद्धिचें आमिष दाखविलें आहे. त्याप्रमाणें जर्मन सोशियालिस्ट पक्ष राशियन सोशियालिस्ट पक्षांला असें वारंवार भासवीत आहेत कीं आपले उभयतांचे हितसंबंध मित्रत्वाचेच असल्यामुळें ते संबंध अधिक दृष्टतर झाल्यास आपण ज्या उच्च तत्वाकरितां भांडत आहोत त्या तत्वाचा विजय होऊन सर्व लोकांस शांततेचा अनुभव मिळेल. अशा युक्त्या प्रयुक्त्या तह करण्यास त्यास मोहास पाडित आहेत परंतु नुकत्याच आलेल्या बातमी वरून कळतें कीं राशियन सोशियालिस्ट या मोहास बळी पडण्याइतके खुळे बनले नाहींत. त्यांनीं असें स्पष्ट जाहीर केलें आहे कीं आमचे व जर्मन सोशियालिस्टांचे हितसंबंध एक नसून त्यांमध्यें विरोध वसत आहे. राशियन मंत्रिमंडळ आपण वेगळा तह करणार नाहीं ह्मणून अट्टाहासनें वारंवार बजावित आहे. इटलीला दोस्तराष्ट्रांच्या कटांतून फोडून तहास त्याची अनुमति मिळवावी अशा हेतूनें जर्मन प्रिन्स ब्यूली याच्या मार्फत खटपट सुरूं आहे.

## किरकोळ बातम्या

—तुर्कांनीं जाफामधून ज्यू लोकांना घालवून दिलें. ते तेथून जात असतां तुर्कांनीं त्यांचीं घरें चीजवस्त वगैरे सर्व लुटुन नेलें. ज्या ज्यू लोकांनीं त्यांना प्रतिरोध केला, त्यांना त्यांनीं फासावर चढविलें. हांकून दिलेल्या ज्यू लोकांत जरुसलेम येथील ही कांहीं ज्यू होते.

—आपला तटस्थपणा अबाधित ठेवण्याचा स्कॅन्डिनेव्हियन मंत्रि मंडळानें ठराव केला असल्याची बातमी स्टॉकहोम येथें प्रसिद्ध झाली आहे.

—जशास तसें हें धोरण स्वीकारल्यामुळें दोन इस्पितळी जहाजें टार्पेडोनीं बुडविण्यांत आलीं असें मि० बोनर लॉ यांनीं कामन्स सभेंत सांगितलें.

## कांग्रेस डेप्युटेशन.

'अजून तरी कांग्रेसकडून विलायतेला डेप्युटेशन जाऊं द्या' असा टाहो हिंदुस्थानांतले पत्रकर्ते फोडीत आहेत व तो टाहो सद्धेतु प्रेरित आहे यांत शंका नाहीं. पण डेप्युटेशन पाठविण्याचे बाबतींत ऑल इंडिया कांग्रेस कमिटीनें केलेला ठराव अमलांत आणण्यांत कांग्रेसच्या पुढाऱ्यांकडून बिल्कुल दिरंगाई होत नाहीं हें सर्वांस जाहिर होणें इष्ट आहे. खरा प्रकार असा आहे कीं डेप्युटेशन पाठविण्याचे बाबतींत ना. भूपेंद्रनाथ बसु व सर विल्यम वेडरबर्न यांच्यामध्यें पत्रव्यवहार सुरू असून विलायतेंतली परिस्थिति क्षणोक्षणीं बदलत असल्यामुळें 'तूर्त डेप्युटेशन पाठविण्याचें तहकूब ठेवा' अशा अर्थाचा संदेश सर वि. वेडरबर्न साहेबांकडून आल्यामुळें डेप्युटेशन पाठविण्याचें काम थोडेंसें लांबणीवर टाकावें लागलें आहे सर सत्येंद्रप्रसन्नसिंह हे जूनमध्यें हिंदुस्थानास परत येणार आहेत. त्यांनीं विलायतेंतली परिस्थिति प्रत्यक्ष पाहिलेली आहे. तेव्हां ते सल्ला देतील त्याप्रमाणें केव्हां डेप्युटेशन जावयाचें तें ठरविण्यांत येईल.

## इंद्रपद.

(स्वराज्याचें वरप्रदान.)

स्वराज्याच्या मंत्र घोषानें सर्व इंडियन वातावरण गजबजून गेलें आहे. आणी आमच्यांतील जे मंत्रद्रष्टे राजकीय महर्षी आहेत, त्यांनीं सर्व राष्ट्रास स्वराज्याचा उपदेश फार नामी केलेला आहे. गेल्या १२-१९ दिवसांत बंगाल, मद्रास व मुंबई या तीन इलाख्यांच्या प्रांतिक परिषदा भरल्या होत्या. आणि बंगाल्यांत राजश्री दास, कडलोर येथें दिवाण माधवराव आणि नाशिक येथें नामदार श्रीनिवास शास्त्री यानीं स्वराज्याचा घोष इतक्या उच्च स्वरानें केला आहे कीं जर या पुढें इंडियन राष्ट्राची ही मागणी देण्यांत येणार नाहीं तर या महायुद्धाची परिसमाप्ती होणार नाहीं इतकेंच नाहीं तर बेल्जमला पुनः स्वातंत्र्य देण्यासाठीं ज्या ब्रिटिश शीलानें सर्वस्वाची आहुती दिली त्या शीलाला पुनः दुसरी अग्निशुद्धी घ्यावी लागेल. स्वातंत्र्याचा सर्वत्र उदय होत आहे, आणि त्या योगानें सर्व मानव कोटीची कल्याण संपदा वृद्धिंगत व्हावयाची आहे. अशावेळीं इंडियाला स्वराज्य मिळेपर्यंत जर्मनीच्या विरुद्ध संयुक्त झालेलीं राष्ट्रें आपलीं युद्ध कंकणें सोडूं शकणार नाहींत. ही स्वराज्याची मागणी ह्मणजे सर्व राष्ट्रास पुनीत करणारा गंगौघ वाटतो आणि येथें जहाल, मवाळ, किंवा प्रागतिक हे सर्व भेदाभेद धुवून जाऊन सर्व राष्ट्र तन्मय झालें असून या नव्या क्रांतीची अपेक्षा अहोरात्र करीत आहे. साम्राज्याच्या राष्ट्रसंघामध्यें स्थान मिळो किंवा न मिळो, पण त्यापेक्षां खरी राष्ट्रकल्याणाची कामधेनू ह्मणजे इंडियनांच्या मतानें चालणारा राज्यकारभार हा होय. रशियांतली जशी झारशाही, त्याच पद्धतीची हिंदुस्थानांतली सिव्हिल सर्व्हंटशाही होय. ही सिव्हिल सर्व्हंटशाही किती ही सुंदर असली तरी ती सांप्रतच्या नव्या विचारांना इंडियन आकाक्षांना व भावी कल्याणांना अगदीं विसदृश, अपात्र व मृतजीव अशी झालेली आहे. जें ब्रिटिश साम्राज्य स्वातंत्र्य चाहातें तेंच स्वातंत्र्याची श्री सर्वत्र प्रसृत करील. आणि हेंच पवित्र कार्य ब्रिटिश साम्राज्याच्या थोर थोर राजपुरुषांनीं, मुत्सद्यांनीं व खुद्द चक्रवर्ती बादशहानीं स्वतःपुढें रेखाटून घेतलेलें आहे. तेव्हां तें महायुद्धानंतर सर्व मन्वंतरच पालटल्यामुळें लांबणीवर पडूच शकत नाहीं. अमेरिकन प्रेसिडेंट यांचाही युद्ध संदेश असा आहे कीं, निरनिराळ्या राष्ट्रांचीं स्वराज्यें राखण्यासाठीं, त्यांचीं स्वातंत्र्यें त्यास परत करण्यासाठी आणि मानव सुधारणा चक्र पुढें ढकलण्यासाठीं हें युद्ध विजयश्री मिळेपर्यंत लढण्यांत येईल, आणि त्याच अर्थानें आह्मी ह्मणतों कीं जर हिंदुस्थान ही सर्व राष्ट्रांची व्यापार-भूमी आहे तर येथें खरें स्वराज्य नांदू लागल्या शिवाय पृथ्वीवरील सुधारलेलीं राष्ट्रें तरी आपली सुधारणेची प्रौढी यापुढें कशी मारूं शकतील? आणि हिंदुस्थानाला जो पुढील इतिहासांत कार्यक्रम घ्यावयाचा आहे, त्या उच्च ध्येयाकडे पाहतां ही स्वराज्याची संपदा ब्रिटिश साम्राज्य आकाशांतील पावसाप्रमाणें आपणावर वर्षाव करील असाच हा काळ सांगत आहे. आणि आमचे राजकीय ऋषी त्या भविष्याचा अनुवाद आपापल्या प्रेमळ अर्थपूर्ण वाणीनें सर्वत्र करीत आहेत 'जागे व्हा, स्वराज्य उपभोगा आणि ब्रिटिश साम्राज्याची शान वाढवा.' असा हा नवा

आपणावर येऊन पडणाऱ्या जबाबदारीला तोंड देण्याची पात्रता अंगीं येण्यास अवश्य असें ज्ञान ही संपादूं नये असें ह्मणणें हें अमळ चमत्कारिक दिसतें. कॉलेजांतल्या विद्यार्थ्यांना ही तशीच मनाई करणें हें तर अक्षम्य आहे. आपल्या देशाच्या राजकीय, सामाजिक, औद्योगिक वगैरे स्थितीचें यथार्थ ज्ञान त्यांनीं या वयांत संपादावयाचें नाहीं तर संपादावयाचें तरी केव्हां? त्यांनीं अभ्यासक्रमाच्या पलीकडे इकडे तिकडे पाहूं नये अशा मासुरवासांत आयुष्याचीं ऐन उमेदीचीं वर्षें घालविणारे तरुण पुढें उत्तम नागरिक स्वयंभूपणानें होतील अशी जर सरकारची समजूत असेल तर कॉलेज लायब्ररयांतून या विषयांवर जीं पुस्तकें ठेवण्यांत येतात किंवा वाचनालयांतून नियतकालिकें घेतात तीं काय केवळ कपाटाच्या किंवा टेबलांच्या शोभेसाठीं? जर पुस्तकें व नियत कालिकें त्यांना वाचण्यास हरकत नसेल तर सदर पुस्तकें लिहिणारे किंवा नियतकालिकें चालविणारे संपादक भाषण करण्यास उभे राहिले असतां त्यांच्या अंतःकरणांतून निघणाऱ्या उद्गारांच्या जिवंत झऱ्याचें पाणी न पितां ग्रंथांतल्या साचलेल्या पाण्यावरच विद्यार्थ्यांनीं आपली तहान भागवावी असें ह्मणणें ह्मणजे मनाचें दौर्बल्य दाखविणें आहे. पण मद्रास सरकारासारखें शहाणेसुर्ते सरकार तें दाखवीत असलेलें पाहून कोणाला त्या सरकारची कींव वाटणार नाहीं! सरकारच्या अशा कृत्यांनींच तरुणांचीं मनें बहकतात, आणि उघडपणें ज्या शंका विचारून त्यांनीं त्यांचें निरसन करून घेतलें असतें तें करून घेण्याचा मार्ग बंद झाल्यामुळें गुप्त मंडळ्या स्थापन करण्याची दुर्बुद्धि त्यांना होते. पण खरोखर याबद्दल न्यायानें जबाबदार कोण आहे तें विचारी माणसांस सहज कळणार आहे.

## शिक्षक आणि हिंदु युनिव्हर्सिटी

लार्ड कर्झनच्या कारकीर्दीतल्या युनिव्हर्सिटी आक्टानें हिंदुस्थानांतल्या युनिव्हर्सिट्यांचें स्वातंत्र्यापहरण करून त्यांना सरकारी अधिकाऱ्यांचे अंकित करून ठेविलें आहे. अशा गुलामगिरींत दिवस कंठणाऱ्या युनिव्हर्सिट्यांच्या संख्येंत भर टाकण्यासाठीं लोकांनीं लाखो रुपये देणगीरूपानें देऊन हिंदु युनिव्हर्सिटी खास अस्तित्वांत आणिलेली नाहीं; पण गेल्या आठवड्यांतल्या 'लीडर' पत्रावरून कळतें कीं हिंदु युनिव्हर्सिटीचे मुख्य उत्पादक व चालक ना. पंडित मदन मोहन मालवीय यांनीं सेंट्रल हिंदु कॉलेजांतल्या दोघा शिक्षकांनीं एका राजकीय विषयाच्या सभेंत अंग ठेविल्याबद्दल त्या कॉलेजच्या शिक्षक मंडळीला बोलावून आणून त्यांना तसें न करण्याबद्दल विनंतीच्यारूपानें ताकीद केली! मद्रास सरकारनें सर्क्युलर काढून हायस्कूल व कॉलेजच्या विद्यार्थ्यांनाच तेवढें सभेस जाण्याची मनाई केली. पण सेंट्रल हिंदु कॉलेजांत तर शिक्षकांना सुद्धां राजकीय चळवळींत पडण्याची मनाई! थोड्या वर्षांपूर्वी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजांच्या प्रोफेसरांचे ही असेच हात जखडून बांधण्याचा विचार मुंबई सरकारानें केला होता. पण त्या कॉलेजाच्या स्वाभिमानी प्रोफेसर-वर्गानें सरकारच्या या विचाराचा तीव्र निषेध करून सरकारकडून मिळणाऱ्या ग्रांटची स्वाभिमानापेक्षां अधिक किंमत आह्मी समजत नाहीं असा रोखठोक जबाब दिल्यामुळें त्यांचें स्वातंत्र्यापहरण करण्याचें धैर्य मुंबई सरकारास झालें नाहीं. जो स्वाभिमान ना. मि. परांजपे, व त्यांच्यासहकारी प्रोफेसर वर्ग यांस दाखवितां आला तो ना. पंडित मदन मोहन यांना हिंदु युनिव्हर्सिटीच्या बाबतींत कां दाखवितां येऊं नये तें आह्मांस समजत नाहीं.

## महायुद्धाची प्रगति.

पश्चिम रणक्षेत्रावरील लढाई न मंदावतां उलट फार जोरानें सुरु आहे. शत्रूनें आपल्या अनेक शिपायांचे प्राण खर्ची घालून संयुक्तांच्या ताब्यांत असलेलें फेस्नाय ठाणें परत घेतलें. लष्करी दृष्टीनें हा त्यांचा विजय फार किफायतशीर होणार नाहीं. संयुक्त सैन्यानें मात्र मोठा पराक्रम गाजवून शत्रू सैन्याला दाद न देतां अनेक महत्वाचीं ठिकाणें हस्तगत केलीं त्यांतील मुख्य बुलेकोर्ट व रॉक्स ही होत. दोस्तांचा जय येथेंच थांबला नाहीं तर आरास-कँब्राय कडील सेनापति हिंडेंबुर्ग यानें खणलेला १२ शें यार्ड खंदकही काबीज केला. पूर्वरणांगणावर रशियन फौजेची व शत्रूची स्टोकेड नदी नजिक निकराची लढाई झाली तींत बरेच रशियन सैनिक मारले गेले या चकमकी खेरीज पूर्वरणांगण शांतता अनुभवीत आहे असें ह्मटलें असतां चालेल.

गेल्या आठवड्यांत संयुक्तांच्या आरमाराचें नुकसान झालें नाहीं. उलट ता० १४ रोजीं ब्रिटिश आरमारी जहाजानें एका विमानाचा उत्तर समुद्रांत नाश केला. पाणबुड्यांच्या मोहिमेवरच असलेल्या जर्मनीच्या आशेस अंकूर फुटलेला दिसत नाहीं. तथापि जर्मन ॲडमिरल पाणबुड्या हाच एक यशाची प्राप्ति होण्यास रामबाण उपाय आहे हें आपल्या लोकांस वारंवार सांगत आहेत.

या आठवड्यांत जर्मनीनें पुनरपि तहाची धडपड सुरु केली आहे. ही चळवळ जर्मन सरकारनें स्वतः चालविली नसून आपल्या सोशियालिस्ट पक्षाकडून चालविली आहे. हे जर्मन सोशियालिस्ट रशियन सोशियालिस्टशीं संगनमत करून तहाची बाटाघाट सुकर करतील या उद्देशानें कैसरनें सोशियालिस्ट पक्षाला लोकसत्तावृद्धिचें आमिष दाखविलें आहे. त्याप्रमाणें जर्मन सोशियालिस्ट पक्ष रशियन सोशियालिस्ट पक्षाला असें वारंवार भासवीत आहेत कीं आपले उभयतांचे हितसंबंध मित्रत्वाचेच असल्यामुळें ते संबंध अधिक दृढतर झाल्यास आपण ज्या उच्च तत्वाकरितां भांडत आहोत त्या तत्वाचा विजय होऊन सर्व लोकांस शांततेचा अनुभव मिळेल. अशा युक्त्या प्रयुक्त्या तह करण्यास त्यास मोहास पाडित आहेत परंतु नुकत्याच आलेल्या बातमी वरून कळतें कीं रशियन सोशियालिस्ट या मोहास बळी पडण्याइतके खुळे बनले नाहींत. त्यांनीं असें स्पष्ट जाहीर केलें आहे कीं आमचे व जर्मन सोशियालिस्टांचें हितसंबंध एक नसून त्यांमध्यें विरोध वसत आहे. रशियन मंत्रिमंडळ आपण वेगळा तह करणार नाहीं ह्मणून अट्टाहासानें वारंवार बजावित आहे. इटलीला दोस्त-राष्ट्रांच्या कटांतून फोडून तहास त्याची अनुमति मिळवावी अशा हेतूनें जर्मन प्रिन्स ब्यूलो याच्या मार्फत खटपट सुरू आहे.

## किरकोळ बातम्या

—तुर्कांनीं जाफामधून ज्यू लोकांना घालवून दिलें. ते तेथून जात असतां तुर्कांनीं त्यांचीं घरें चीजवस्त वगैरे सर्व लुटून नेलें. ज्या ज्यू लोकांनीं त्यांना प्रतिरोध केला, त्यांना त्यांनीं फांसावर चढविलें. हांकून दिलेल्या ज्यू लोकांत जरुसलेम येथील ही कांहीं ज्यू होते.

—आपला तटस्थपणा अबाधित ठेवण्याचा स्कॅंडिनेव्हियन मंत्रि मंडळानें ठराव केला असल्याची बातमी स्टॉकहोम येथे प्रसिद्ध झाली आहे.

—जशास तसें हें धोरण स्वीकारल्यामुळें दोन इस्पितळी जहाजें टार्पेडोनीं बुडविण्यांत आलीं असें मि० बोनर लॉ यांनीं कामन्स सभेंत सांगितलें.

## कांग्रेस डेप्युटेशन.

'अजून तरी कांग्रेसकडून विलायतेला डेप्युटेशन जाऊं या' असा टाहो हिंदुस्थानांतले पत्रकर्ते फोडीत आहेत व तो टाहो सद्धेतु प्रेरित आहे यांत शंका नाहीं. पण डेप्युटेशन पाठविण्याचे बाबतींत ऑल इंडिया कांग्रेस कमिटीनें केलेला ठराव अमलांत आणण्यात कांग्रेसच्या पुढाऱ्यांकडून बिलकुल दिरंगाई होत नाहीं हें सर्वांस जाहिर होणें इष्ट आहे. खरा प्रकार असा आहे कीं डेप्युटेशन पाठविण्याचे बाबतींत ना. भूपेंद्रनाथ बसु व सर विल्यम वेडरबर्न यांच्यामध्यें पत्रव्यवहार सुरू असून विलायतेंतली परिस्थिति क्षणोक्षणीं बदलत असल्यामुळें 'तूर्त डेप्युटेशन पाठविण्याचें तहकूब ठेवा' अशा अर्थाचा संदेश सर वि. वेडरबर्न साहेबांकडून आल्यामुळें डेप्युटेशन पाठविण्याचें काम थोडेंसें लांबणीवर टाकावें लागलें आहे सर सत्येंद्रप्रसन्नसिंह हे जूनमध्यें हिंदुस्थानास परत येणार आहेत. त्यांनीं विलायतेंतली परिस्थिति प्रत्यक्ष पाहिलेली आहे. तेव्हां ते सल्ला देतील त्याप्रमाणें केव्हां डेप्युटेशन न्यावयाचें तें ठरविण्यांत येईल.

## इंद्रपद.

(स्वराज्याचें वरप्रदान.)

स्वराज्याच्या मंत्र घोषानें सर्व इंडियन वातावरण गजबजून गेलें आहे. आणि आमच्यांतील जे मंत्रद्रष्टे राजकीय महर्षी आहेत, त्यांनीं सर्व राष्ट्रांस स्वराज्याचा उपदेश फार नामी केलेला आहे. गेल्या १२-१९ दिवसांत बंगाल, मद्रास व मुंबई या तीन इलाख्यांच्या प्रांतिक परिषदा भरल्या होत्या. आणि बंगाल्यांत राजश्री दास, कडलोर येथें दिवाण माधवराव आणि नाशिक येथें नामदार श्रीनिवास शास्त्री यांनीं स्वराज्याचा घोष इतक्या उच्च स्वरानें केला आहे कीं जर या पुढें इंडियन राष्ट्राची ही मागणी देण्यांत येणार नाहीं तर या महायुद्धाची परिसमाप्ती होणार नाहीं इतकेंच नाहीं तर बेल्जमला पुनः स्वातंत्र्य देण्यासाठीं ज्या ब्रिटिश शीलानें सर्वस्वाची आहुती दिली त्या शीलाला पुनः दुसरी अग्निशुद्धी घ्यावी लागेल. स्वातंत्र्याचा सर्वत्र उदय होत आहे, आणि त्या योगानें सर्व मानव कोटीची कल्याण संपदा वृद्धिंगत व्हावयाची आहे. अशावेळीं इंडियाला स्वराज्य मिळेपर्यंत जर्मनीच्या विरुद्ध संयुक्त झालेलीं राष्ट्रें आपलीं युद्ध कंकणें सोडूं शकणार नाहींत. ही स्वराज्याची मागणी ह्मणजे सर्व राष्ट्रांस पुनीत करणारा गंगौघ वाटतो. आणि येथें जहाल, मवाळ, किंवा प्रागतिक हे सर्व भेदाभेद धुवून जाऊन सर्व राष्ट्र तन्मय झालें असून या नव्या क्रांतीची अपेक्षा अहोरात्र करीत आहे. साम्राज्याच्या राष्ट्रसंघामध्यें स्थान मिळो किंवा न मिळो, पण त्यापेक्षां खरी राष्ट्रकल्याणाची कामधेनू ह्मणजे इंडियनांच्या मतानें चालणारा राज्यकारभार हा होय. रशियांतली जशी झारशाही, त्याच पद्धतीची हिंदुस्थानांतली सिव्हिल सर्व्हंटशाही होय. ही सिव्हिल सर्व्हंटशाही किती ही सुंदर असली तरी ती सांप्रतच्या नव्या विचारांना इंडियन आकांक्षांना व भावी कल्याणांना अगदीं विसदृश, अपात्र व मृतप्राय अशी झालेली आहे. जें ब्रिटिश साम्राज्य स्वातंत्र्य चाहातें तेंच स्वातंत्र्याची श्री सर्वत्र प्रसृत करील. आणि हेंच पवित्र कार्य ब्रिटिश साम्राज्याच्या थोर थोर राजपुरुषांनीं, मुत्सद्यांनीं व खुद्द चक्रवर्ती बादशाहांनीं स्वतःपुढें रेखाटून घेतलेलें आहे. तेव्हां तें महायुद्धानंतर सर्व मन्वंतरच पालटल्यामुळें लांबणीवर पडूच शकत नाहीं. अमेरिकन प्रेसिडेंट यांचाही युद्ध संदेश असा आहे कीं, निरनिराळ्या राष्ट्रांचीं स्वराज्यें राखण्यासाठीं, त्यांचीं स्वातंत्र्यें त्यास परत करण्यासाठी आणि मानव सुधारणा चक्र पुढें ढकलण्यासाठीं हें युद्ध विजयश्री मिळेपर्यंत लढण्यांत येईल, आणि त्याच अर्थानें आह्मी ह्मणतों कीं जर हिंदुस्थान ही सर्व राष्ट्रांची व्यापार-भूमी आहे तर येथें खरें स्वराज्य नांदू लागल्या शिवाय पृथ्वीवरील सुधारलेलीं राष्ट्रें तरी आपली सुधारणेची प्रौढी पापुढें कशी मारूं शकतील? आणि हिंदुस्थानाला जो पुढील इतिहासांत कार्यक्रम धावयाचा आहे, त्या उच्च ध्येयाकडे पाहतां ही स्वराज्याची संपदा ब्रिटिश साम्राज्य आकाशांतील पावसाप्रमाणें आपणावर वर्षाव करील असेंच हा काळ सांगत आहे. आणि आमचे राजकीय ऋषी त्या भाविष्याचा अनुवाद आपापल्या प्रेमळ अर्थपूर्ण वाणीनें सर्वत्र करीत आहेत 'जागे व्हा, स्वराज्य उपभोगा आणि ब्रिटिश साम्राज्याची दौलत वाढवा.' असा हा नवा

उपदेश आहे. तेव्हां लोकांनीं स्वराज्य पाहिजे ही मागणी करण्यास काडीमात्र कचरूं नये लढाई नंतरचा वरदानप्रसंग हें इंडियाचें इंद्रपदच होय.

## प्रांतिक कायदे कौन्सिल

येत्या आगष्टच्या १३ व्या तारखेला वऱ्हाडप्रांताचे ३ सभासद ह्मणजे नामदार मुधोळकर, दामले व जोशी यांची कौंसिलदारी संपते. तेव्हां म्युनिसिपालिट्या जिल्हाबोर्ड, व जमेदार मंडळी यांच्या वतीनें पुन्हा ३ सभासद निवडण्याची धामधूम तारीख १८-१९ व २० जुलैला व्हावयाची आहे. या पुढें नव्या उमेदांचे, अधिक धीरश्रीचे व पाणीदार उमेदवार कौंसिलांत आमच्या प्रांतातर्फे यावे ह्मणून वरील तिन्ही गृहस्थ पुनः उमेदवार होणार नाहींत असें त्यांच्या भाषणावरून कळतें. या तिघाही गृहस्थांनीं आपापली कामगिरी चांगली बजावली आहे हें आह्मी आनंदानें कबूल करितो. आणि त्यांच्या लोक कल्याणाच्या गोष्टींना मूर्तरूप येण्याला त्यांस जसा सरकारी मताचा पाठिंबा पाहिजे तसा मिळालेला नाहीं वस्तुस्थितीच अशी अडचणीची आहे. पण या पुढील कौंसिलदार या स्वीकृत कौंसिलदारीसाठीं आपला अधिक काल खर्चतील व आपल्या पुढील प्रश्नांचा अधिक नीटनेटका अभ्यास करून ठेवतील तर प्रांतिक कौंसिलांतील भावी वादाविवाद विशेष स्पृहणीय होतील असा आह्मास भरंवसा आहे.

## भरती.

### ( स्वराज्याचा विचारसमुद्र. )

महाराष्ट्राच्या स्वराज्य संघाची मोहीम नाशिक येथें मोठ्या विस्तृत प्रमाणावर झाली. संघाच्या वार्षिक इतिहास मोठा मनोरंजक आहे. आणि राजश्री बापटिस्टा यांच्या अध्यक्षतेखालीं गेल्या गुरुवारीं पुढील वर्षाच्या कार्याची योजनाही करण्यांत आली. त्याशिवाय श्री गंगेच्या पटांगणावर दररोज रात्रौ सभा भरून लोकांच्या विचारसरणीला स्वराज्याचा विद्युत् वेग देण्यांत आला. राजश्री खापर्डे, टिळक, कृष्णराव खाडिलकर, शिवरामपंत परांजपे, अच्युतराव कोल्हटकर, व केशवराव छापखाने इत्यादि कसलेल्या व्याख्यात्यांचीं इतकीं जोरदार भाषणें झालीं कीं ही नाशिकच्या विचारांची लाट वर्तमानपत्रद्वारा सर्व महाराष्ट्रभर प्रसृत होऊन या राजकीय मोहिमेविषयीं लोकांचीं अंतःकरणें चांगलीं जागृत झालीं आहेत. या नाशिकच्या ज्ञानयज्ञाचें प्रकाशन आमचे आन्हिक संदेशकर्ते यांनीं फार उत्कृष्टपणें केलें आहे.

## शोचनीय मृत्यु.

मराठींतले सुप्रसिद्ध कवि व मराठी भाषेचे प्रेमळ भक्त कर्नल कान्होबा रणछोडदास कीर्तिकर आय. एम. एस. यांस मागचे आठवड्यांत मुंबई येथें देवाज्ञा झाल्याचें शोचनीय वृत्त आलें आहे. क० कीर्तिकर हे प्रभुज्ञातींतले एक कर्तृत्ववान्, विद्वान्, आणि बाणिदार पुरुष होते. हे ग्रांट मेडिकल कॉलेजांत विद्यार्थी असतां त्याचे गुरु डा० ग्रे यांची त्यांचेवर फार मेहेरबानी होती, पण मृतशरीराचा व्यवच्छेद करतांना परीक्षेच्या वेळीं त्यांच्या हातून एक चूक झाली त्यावरून डा. ग्रे यांनीं त्यांना नापास केलें. त्यामुळें संतापून कीर्तिकर यांनीं मेडिकल कॉलेज सोडलें व विलायतेस जाऊन तेथील आय. एम. एस. ची परीक्षा देऊन सैन्यांत नोकरी धरली. लष्करी नोकरींत असतां ते अफगाणिस्थानच्या लढाईंत होते व एकदां त्यांचे मुख्य सेनापती व हे पळत असतां सेनापतीचा घोडा मारला गेला तेव्हां यांनीं त्यांना आपली घोडी देऊन त्यांचा जीव वाचविला, व स्वतः भिस्त्याचा वेष घेऊन शत्रूच्या तडाक्यांतून आपण निभावून गेले. कांहीं दिवसपर्यंत ते मेडिकल कॉलेजांत प्रोफेसर ही होते. पुढें ठाणें, रत्नागिरि वगैरे ठिकाणीं सिव्हिल सर्जनचें काम करून त्यांनीं पेनशन घेतलें. यांचा आवडता विषय वनस्पति शास्त्र होता. यांनीं या विषयावर एक अपूर्व ग्रंथ इंग्रजी भाषेत लिहिला असून त्यांत दिलेलीं वनस्पतींचीं चित्रें कित्येक वर्षें परिश्रम करून स्वतः काढलीं आहेत. यांना काव्यरचनेचा विशेष छंद असे. यांचें इंदिरा काव्य व कांहीं स्फुट काव्यें प्रसिद्ध आहेत. बडोद्याच्या साहित्य संमेलनाचे प्रसंगीं हे अध्यक्ष होते. यांचा स्वभाव थोडासा एककल्ली पण प्रेमळ असे. हे जसे उत्तम शास्त्रज्ञ होते तसेच परमेश्वराचे भक्त ही होते. यांच्या मृत्यूनें महाराष्ट्राची मोठी हानी झाली आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो

## वऱ्हाडवृत्त

**हवामानः**— वातावरणांत अश्रुतपूर्व चलविचल दिसते. विजांचा कडकडाट, तुफानाचे वारे व पर्जन्य यांनीं वर्षाऋतूचा देखावा उभा केला आहे. हवा चांगली थंड असून आरोग्य वाढविते.

यवतमाळास राजश्री चॅरमन यांनीं आपल्या जिल्ह्याचा दरबार भरविला होता व लोकांस पुष्कळ स्थानिक गोष्टींची माहिती सांगितली हा नवा प्रयत्न असल्यामुळें लोकांची प्रवृत्ती तिकडे वळण्याला थोडासा काल लागेल तरी इतर जिल्ह्यांतून ही हा दरबारचा उपक्रम होईल तर फार बरें!

**मनाईचा कोंबडाः**— स्वराज्य संघाच्या सभा भरविण्याला आमच्या स्थानिक सरकारची मनाई नाहीं; पण लोकांनीं या सभांना जाऊ नये अशा विषयीं सरकारी कोरीव अंतस्थ कामें चालू आहेत असा आमच्या वऱ्हाडांतील मंडळीचा अनुभव आहे. ही गुप्त छटाछाट स्वराज्य संघाच्या युद्ध कर्मांच्या कामगिरींत मोठा प्रत्यवाय आणते. सरकारी आजीबाईचा हा कोंबडा स्वराज्याचा सूर्योदय कांहीं लपऊं शकत नाहीं ह्मणून आह्मी सरकारी वाकडी कमान जाऊन सरळभाव उत्पन्न होण्याची वाट पहात आहों.

**उंच ताडः**— फरीदपूर येथें कांहीं ताडाचे वृक्ष सायंकाळ होतांच साष्टांग नमन करितात ह्मणजे त्याच्या शाखा इतक्या खालीं लवतात व पानें इतकीं मिटून जातात कीं सर्व वृक्ष साष्टांग घालतो कीं काय असा भास होतो हा चमत्कार डॉक्टर जगदीश बोस यांनीं आपल्या वनस्पती शास्त्राच्या शोध मालिकेंत मुद्दाम घेतलेला आहे. हे फरीदपूरचे ताड आमच्यांतील पुष्कळशा मोठमोठ्या लोकांचें साष्टांग पतन विशेष सुंदरतेनें सुचवितात पण हिंदी जन समाजाला भर्तृहरी सांगतात कीं ' विपादि उच्चैः स्थेयं '

**लाट**— नवीन न्यायखात्याच्या घटनेविषयीं आह्मी कितीही आक्षेप घेतले तरी तिचा अंमल गेल्या १४ व्या तारखेपासून सुरू झाला आहे. या योजनेंत रा. रा. वासुदेव रामचंद्र ढोवळे यांस अठराशे रुपयांचा डिस्ट्रिक्ट ॲन्ड सेशन जज्जाचा ४ था वर्ग मिळाला आहे ही आनंदाची गोष्ट होय. आतां त्यांचा जन्म हिंदुस्थानांत ह्मणून त्यांस १८०० च्या ऐवजीं १२०० च फक्त पगार मिळेल. ही पगाराची जुनी पद्धती यापुढें अगोदर लयास गेली पाहिजे व जन्मभूमीचा हा राजकीय दोष आह्मी भावी स्वराज्यांत पहिल्यानें मोडून टाकूं. राजश्री ढोवळे यांच्या मार्गांत ही बढतीची गंगा चालून आली हा हिंदी समाजावर थोडा बहुत उपकारच होय

**अभिनंदन**—रा. रा. योगेशचंद्र चतर्जी यांस ७०० रुपये, रा. रा. रामचंद्र वासुदेव परांजपे यांस ६०० रुपये व रा. रा. नीलकंठ गणपत सुभेदार यांस ५०० रुपये अशा ३ आनंदाच्या बढत्या आमच्या येथील न्यायाधिशांस मिळाल्या या त्यांच्या गुणाला व उत्कृष्ट चाकरीला अनुरूपच आहेत.

**अनुमान**—रा. रा. दामोदर भास्कर बापट हेडमास्तर लोकलबोर्ड मराठीशाळा खारेपाटण जि. रत्नागिरी यांनीं १९१७ सालच्या पर्जन्या संबंधाचें अनुमान छापून आह्माकडे पाठविलें होतें. त्याचा ठोकताळा पहातां पुष्कळशा गोष्टी चांगल्या जुळतात व चालू वातावरणांतील क्रांत्या ही त्यांच्या अदमासाप्रमाणें बरोबर ठरल्या आहेत. पश्चिमहिंदुस्थानचे पावसाळे यांत वर्तविलेले आहेत. राजश्री बापट हे चांगले शास्त्रीय शोधक असून त्यांनीं सूर्य मालेंतले ग्रह पृथ्वीवर आपल्या उष्णतेनें काम परिणाम करितात, ढगांची उंची व संचारण हीं कशी बदलतात इत्यादि संबंधानें गेल्या ४ वर्षांपासून आपले शोध व तर्क चालविले आहेत. त्यांच्या शोधास प्रस्तुतचें हवामान पुष्कळ बळकटी आणतात ही आनंदाची गोष्ट होय. आह्मी त्यांच्या प्रयत्नाचे अभिनंदन करितों व त्यांच्या धोरणाप्रमाणें आर्द्रा नक्षत्रापासून वर्षाकाल चांगला सुबत्तेचा होईल असें मुद्दाम कळवितों.

**कहाणी**—यवतमाळ इजारदार—इनामदार सभेनें स्थानिक कायदे कौंसिलाच्या ऐरणीवर घातलेल्या नव्या टेनन्सी बिला संबंधानें एक सुंदर लेख तयार केला असून हल्लींचें बिल उपयोगापेक्षां अधिक घातुक आहे असें साधक बाधक प्रमाणासह प्रतिपादिलें आहे. या सभेचा हा लेख सर बेंजामिन यांस सादर करण्यांत आला आहे, तेव्हां त्याची योग्य शहानिशा होईल असा आह्मांस भरंवसा वाटतो. त्यांतील विचारांचें मंथन आह्मी यथावकाश करणार आहों.

## नोटीस

मेहेरबान थर्ड ॲ. डि० जज्य साहेब आकोला यांचे फैलावरील नादारी अर्ज नंबर १२९ सन १९१६ यांतील तारीख १२-५-१७ चे हुकमा अन्वयें सर्वांस जाहीर करण्यांत येते कीं नादार भिवाजी वा। सखाराम कुणबी रा० पिंपरी वरघाट ता० मुर्तिजापूर जि० आकोला येथील खालील वर्गातील जिनगी आफिसर रिसिव्हर या नात्यानें आली आहे. तेव्हां लाट नं. १ चा घर व कोठा ही विकणार आहों व लाट नं. २ चे सेते पट्ट्यानें देणार आहों. तेव्हां या जाहीर लिलावाचे वेळीं पिंपरी येथील चावडीवर ता० २६-५-१७ इ रोजीं दिवसा १ वाजतां भावी खरीदीदारानीं व वहितदारानीं तेथें हजर राहावें. नादारीचे जिनगीचें वर्णन—लाट नं. १ घर व कोठा.

१ मौजे पिंपरी वरघाट ता. मुर्तिजापूर येथील गढीतील मकान चार दिवाली यांस तोळया चार वर कवेलु यांचा दरवाजा दक्षिणेस पुढें आंगण याची लांबी रुंदी पू. पश्चिमेस हात २४ द. उत्तर हात १४ याची चतुरसीमा पूर्वेस गढीची फांज दक्षिणेस रायभानचें आंगण. पश्चिमेसं रायभानचे घर उत्तरेस भिवाजीचें घर या चतुरसिमेतील सर्व जागा. पुर्वेकडील पानोठीचे जागेसुद्धा व इमल्यसुद्धांः—

२ मौजे पिपरी वरघाट ता. मुर्तिजापूर येथील गढीचे बाहेरील मकान बैलाचे कोठ्याचे यांस तोळया ६ वर तक्ते याचा दक्षणी भाग पूर्वेस असून त्यांस लागून ६ साहा नाटाचे कवेलुचे मकान. याचा दर्शणी भाग दक्षिणेस व दरवाजा उत्तरेस याची लांबी रुंदी पुर्व पश्चिम हात ३५ द. उ. हात २४ याची चतुरसिमा पूर्वेस हरीचे घर दक्षिणेसं रायभानचा कोठा पश्चिमेस सरकारी पडीत उत्तरेस सरकारी पडीत या चतुरसीमेतील मकान जागा इमलावगैरेसुद्धां

३ मौजे पिंपरी वरघाट ता. मुर्तिजापूर येथील शेते ४

| स. नं. | ए. गुं. | आ. रु. | हिस्से |
|---|---|---|---|
| ५पैकीं २ | २१४१० | २०॥ | सालीम |
| १६ | १७ ० | १३ | १/४ |
| ४ | १३४१९ | १९ | १/१२ |
| ५० | ११४२९ | १२ | १/६ |

Dated 19-5-17.
Akola

M. M. Khan
Official Receiver
Akola.

## नोटीस.

श्री मा. नारायण पांडुरंग साहु दुकान आकोले यांच सेवेसीः—

मी खालीं सही करणार यांजकडुन वि. वू. कळविण्यात येते कीं, मला आपले वडील के. श्री. मा. पांडुरंग गोविंद उर्फ अण्णा साहेब यांनी आ. नातु अज्ञान श्रीधर रामचंद्र यास देस बक्षीस पत्रानकन व नवीन व्यवस्थेपत्रावरून दिलेली स्थावर जंगम इस्टेट व धर्मार्थ कांहीं ठेवलेली इस्टेट हा जिनगी आ. श्रीधर रामचंद्र याचे वहीवाटींत दिलेली असून त्याजबद्दल वालनकर्ते या नात्यानीं ता. १-१२ १६ रोजीं आपले समक्ष उमरावती मुकामीं मजपासून करारनामा करून घेऊन मजला ते काम करण्यास नेमले. त्याप्रमाणें मी काम करीत आलो असतां आतांशी आपले मनात मी नौकर नसावे असे येऊन मला ता. २१-४-१७ रोजीं जाहीर नोटीस देऊन बंद केले असून माझे पश्चात माझे ताब्यांत असलेले वहा कागदपत्र आपले ताब्यांत घेऊन मी गावांहून परत आल्यावर सर्व कागदपत्र मिळाल्याची पावती विनंती पूर्वक मागत असतां आज देतो उद्या देतो असे ह्मणतां. तरी आतां तीन दिवसाचे आंत मजला पावती देऊन पोटभरण्यास मोकळे करावे. आतां मी आपला कोणचेही कागदपत्राचा हिशोबाचा जबाबदार नाहीं. कळावें हे विनंति. ता. १७-५-१७

सही

गणेश घनःशाम आष्टेकर द. खुद

ने० नं० २२४

NOTICE.

The following extract from a Government of India, Home Department Resolution No. 2951-2964, dated the 18th December 1914, is published for general information.

F. S. A. Slocock.

NAGPUR: The 12th May. 1917 } *Chief Secretary to the Chief Commissioner, Central Provinces.*

RESOLUTION.

2. Every native of India who contemplates proceeding out of India to foreign countries is strongly urged before leaving to furnish himself with an authoritative certificate of identity, in the appended form, signed by the Deputy Commissioner, in the case of residents of British India, and by the Political Agent in that of residents of Native States. In the case of a student the certificate should be signed by the head of his last school or college and countersigned by the Deputy Commissioner or Political Agent, as the case may be.

Appeals for assistance by destitute Indians who desire repatriation and by students who, owing to embarrassed circumstances, are unable to complete their course of education, cannot be dealt with satisfactorily unless the parties are in a position to produce evidence of identity. The possession of a certificate of identity will be specially useful to young men of good family, as it may enable the Secretary of State to obtain for them social and other attentions.

Those who are desirous however, of travelling in countries where a passport will be necessary are advised to furnish themselves with such a document also before leaving India, in lieu of, or in addition to, a certificate of identity. It should be remembered that no person is entitled to a passport, as of right, on the ground that he is a British subject, and the production befooe authorities outside India of a certificate of identity, unless supplemented by documentary evidence of respectability, is not sufficient to ensure that a passport will be granted.

FORM OF CERTIFICATE OF IDENTITY

1 Name of applicant ____________________

2 Father's name and caste ____________________

3 Residence ____________________

4 Age of applicant ____________________

5 * Nationality of applicant ____________________

6 Social or pecuniary status of father (or guardian) ____________________

7 Date of probable departure of applicant from India ____________________

8, Object of applicant's visit to England (Europe) / America / Japan

*Signature of Deputy Commissioner or Political Agent, o Head of School or College ‡*

*Signature of applicant*

Signed before me

Deputy Commissoner or Political Agent

Dated ____________

* i e, Whether a British subject by brith or by naturalization (or a subject of Native State.)

‡ Countersignature of the Deputy Commissioner or Political Agent should be obtained on certificates signed by Heads of schools or Colleges.

Note.—Holders of certificates of identity intending to apply subsequently in England or elsewhere for a passport to visit a foreign country are warned that no person is entitled to a passport as of right on the sole ground that he is a British subject. The production of a certificate of identity, therefore, will not ordinarily be sufficient to secure the grant of a passport, unless it is supplemented by documentary evidence of respectability, endorsed by a local Government or other authority competent to issue passports in India, certifying that the holder is a fit and proper person to receive a passport.

No. N.218

## नोटीस

विद्यमान सब जज्ज साहेब कोर्ट खामगांव सक्शेशन मु. नंबर १ सन १९१७

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, मौजे माटरगांव तालुके खामगांव येथील चुन्नीलाल कृपाराम मारवाडी हा मयत झाला असून त्याचा वारस आसाराम कृपाराम मारवाडी राहणार माटरगांव तालुके खामगांव हा असल्याबद्दल त्यानें मैताचे मिळकतीबद्दल सार्टिफिकीट मिळावे ह्मणून ह्या कोर्टीत अर्ज केला आहे. करितां त्यास वारसाचे सार्टिफिकीट कां दिले जाऊं नये याचें कारण दाखविण्याकारितां, त्याचे जे वारस असतील त्यांनीं तारीख २३-६-१७ रोजीं सदर्हू कोर्टीत हजर रहावे. कळावें. तारीख १२-५-१७

सही

Khamgaon 12-5-17 } R. M. Wathodker Sub Judge Khamgaon

N. N. 219

## नोटीस

ति. स्व. कृष्णराव बळवंतराव आवचट राहणार हिवर खुर्द तालुके मेहेकर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आमचे बाप अज्ञानपणींच वारले. व आपण आणि आमचे वडील विभक्त असून आपली इस्टेट अलग होती. पण तुह्मी आमचे पालनकरणार असल्यानें आमची इस्टेट एकत्र करून तुह्मी आह्मास फसऊन सर्व आमची जिनगी दाबली ही गोष्ट आह्मास तारीख २०-९-१६ रोजीं ती वारुबाई ( तुमची आई ) इजकडून कळली तरी खालील प्रमाणें इस्टेट व आह्मी नौकरी करून जी रक्कम तुह्मास दिली ती. असे ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत द्यावे. नाहीं तर रीतीप्रमाणें अज्ञानाचे इस्टेटीची अफरातफर केल्याबद्दल योग्य कोर्टीत दावा केला जाईल कळावें.

आबाजीची जिनगी.

चांदीचे कडे २ पळी १ फुल २ मासोळ्या २ हातातील तोडे २ किंमत १२५ सोन्याची ठुशी १ किंमत रुपये १०० वज्रटीक १ किंमत रुपये ५० बुगड्या २ किंमत रुपये १५ नथ १ किंमत रुपये ७५ नगदी रुपये १२५ व मी आबाजीच्या नौकरीचे तुह्मास दिलेले १३० आबाजीच्या बापाचे हातचा खरेदी नंबर सर्वे नंबर १० एकर गुंठे ३६।८१० आकार रुपये १५ वडीलाचे हातची सरी पैकीं एक तृतीयांश हिस्सा एकूण रुपये ६२०

आण्णाजीची जिनगी

सोन्याचा केकत किंमत रुपये १५ केवडा किंमत रुपये १० राखडी किंमत रुपये २० मुद किंमत रुपये १२ वज्रटीक किंमत रुपये ७५ सोन्याचे कडें तोळे १२॥ किंमत रुपये ३१२॥ वडीलाची सरी पैकीं एक तृतीयांश हिस्सा चांदीचे कडे २ किंमत रुपये २५ एकूण ४६९॥ रुपये सदर्हू माल ज्याचे त्याचे ताब्यांत मुदतीत द्यावे. तारीख ७-५-१७

सही

आण्णाजी भगवंत आबाजी रावजी

नो. नं. २२०

## नोटीस

रा. रा. दवलत सूर्यभान पाटील धामोडे रा. लांजूड ता. खामगांव जि. बुलडाणा

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुमचेकडे माझे एकंदर कर्ज असलेले रुपये व धान्य खालीं लिहिले प्रमाणें असे—

हात उसने रु. २४ चोवीस अंदाज ३ वर्षांपासून कर्जरोखा ता. १३-३-१३ इ. २० रुपयांचा व त्याची सवाई व्याजाबद्दल ५ रुपये असे एकंदर २५ रु. पंचवीस रुपये.

जवारी ७॥ मण अंदाज तीन वर्षांपासून [illegible] २२॥ [illegible] साडेबावीस रुपये.

येणेंप्रमाणें आपले कडे कर्ज आहे. ते आपण १ महिन्याचे आंत द्यावे न दिल्यास मी आपणावर कायद्याप्रमाणें एकंदर सर्व खर्चासुद्धां फिर्याद आणीन. या नोटिसीने कळविले आहे.

सही

चंद्रभान मारोती आंबोरे राहणार लांजूड ता. खामगांव जि. बुलडाणा निशाणी आंगठा

नो० नं० २२१

## नोटीस

रा. रा. सूर्यभान वा जानजी मोहोरूत रा. मौजे थार उर्फ बर्दापूर प्र० खेर्डा ता. मेहकर जि. बुलढाणे

यांसः—

नोटीस देणार व्यंकटी व उत्तम वा रामजी पैकीं उत्तम अ. पा. भाऊ व्यंकटी वा रामजी डोने याजकडून नोटीस देण्यांत येते कीं ता. २७-११-१६ रोजीं आह्मी तुह्मास जे दोन कुलमुखत्यार पत्र दिले होते ते आज तारखेपासून रद्द केले आहेत. यापुढें तुह्मी आमचे संबंधीं कोणतेही प्रकारचा कारभार, देवघेव, फिर्यादी वगैरे कोणतेच तऱ्हेचे काम करूं नये. केल्यास त्याजबद्दल आह्मी जबाबदार राहणार नाहीं. केल्यास त्याजबद्दल योग्य ती तजवीज करणें भाग पडेल. कळावें ता० १०-५-१९१७ इ.

सही

निा व्यंकटी वा रामजी डोने रा. थार उर्फ बर्दापूर ता. मेहकर याचा आंगठा अज्ञानाकरितां व स्वतः करितां

नो नं २२२

## नोटीस

रा. रा. किसनलाल राधाकिसन मारवाडी राहणार पातुरनंदापूर तालुका आकोला

यांसः—

खालीं सही करणार मोहनलाल ब्रिदीचंद मारवाडी ब्राह्मण कळवितो कीं मी तुह्मावर जो स्मालकाज कोर्टांत दावा ९० रुपयांचा केला त्याची तारीख १५ मे १९१७ होती. त्या दिवशी खालील गृहस्थासमोर तुह्मी या दाव्याचा निकाल आपसांत केला आणि दाव्यांतील रकमे शिवाय ४० रुपये मजकडून तुह्मी घेण्याचे कबूल करून तुमच्या बहिणीला ह्मणजे श्रीमती सीताबाईला मला जी रक्कम देणे होती तिचा संपूर्ण हवाला तुह्मी आपल्या कडे लावून घेतला. पंचाची नांवें अशीं:—

रा. रा. खरे वकीलसाहेब आकोला.
,, गिरधारीलाल मारवाडी, मुनीम आकोला.
,, गोंडी बापु देशमूख, निंब.
,, हनुमान कन्हयालाल, आकोला.
व ,, मारुती दिवटाजी, अंबिकापूर

आपण दोघांनीं कोर्टांत राजीनामा दाखल केला आणि ४० रुपये घेऊन लिहून ठेविलेली बहिणीच्या रकमेबद्दलची पावती मागू लागलो तर तर अपिलाचा नंबर पाहण्याचें मिष करून तुह्मी कोठें तरी पळून गेला व पुष्कळ शोध केला तरी पत्ता लागला नाहीं. याप्रमाणें तुह्मी विश्वासघात केला आहे. तुह्मी ही नोटीस पोचल्या तारखेपासून ८ दिवसांच्या आंत ४० रुपये घेऊन योग्य त्या तपशिलाची पावती द्यावी. तसें न केल्यास तुह्मावर दिवाणींत व फौजदारींत फिर्याद करण्यांत येईल, आणि सर्व नुकसानी तुह्माकडून भरून घेण्यांत येईल. कळावें. ता. १६ मे १९१७.

सही
मोहनलाल बिरंदीचंद राहणार शेगांव
दस्तुर खुद

नो. नं. २१४

## नोटीस

रा. रा. गुलाम नबी वलुद गुलाम गवस अज्ञान पालन करणार चुलता शाबासखा वलुद नवासखा राहणार आकोला.

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तुह्मी ता. ७ मे १९१७ च्या वऱ्हाड समाचारांतून दिलेली नोटीस पोचली. त्यांतील मजकूर चुकीचा आहे. अफजूलखान यांना तांबा तोडण्यासाठीं ह्मणून तुह्मी मला मुद्दाम घर भाड्यानें घेण्यास लाविले आणि तुमच्या ह्मणण्याप्रमाणें मी त्या घरांत जाऊन राहिलो. पण अफजूलखान हे कांहीं घरांतून निघाले नाहींत आणि तुह्मी मला जसा स्वतंत्र व पृथक् ताबा द्यावयाचा तसा देऊं शकला नाहीं आणि शेवटीं मला अफजूलखाना बरोबरच त्या घराच्या उत्तर भागांत राहणें भाग पडले. भाडे दोन महिन्याचे तुम्ही आगाऊ घेतलें आहे तर त्या रकमेपैकीं निम्मी रक्कम या नोटिशीच्या खर्चासुद्धां मला तुम्ही ही नोटीस पोचल्या पासून १५ दिवसांच्या आंत आणून द्यावी. मी घर खालीं करून दिल्याबद्दल तुम्हाला पूर्वींच नोटीस दिली आहे. अफजूलखान घर खाली करून देत नाहीं हा कांहीं माझा अपराध नाहीं हें तुम्हास माहित असून तुम्ही मुद्दाम लबाडीची नोटीस दिली आहे. कळावे. ता. १६ मे १९१७ इ.

सही उर्दूत
महमदगवस वलुद कासमअली रहणार आकोला

नो. नं. २१५

## नोटीस

नोटीस बेशमी रान्या वा. धापा माहार रा० आकोला तारफैल

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझी मुलगी जमनी उमर वर्षे १४ इचें तुमच्याशीं लग्न होऊन सुमारें १२ महिने झाले. लग्न झाल्याबरोबर लागलेच तुह्मी तिला नागपुरास घेऊन गेला. व तेथें तिच्यावर भलताच आरोप करून तिला दोरानें बांधून मारहाण केली. त्या मारहाणीच्या तिच्या आंगावर अद्याप खुणा आहेत. त्यानंतर तुह्मी आकोला येथें राहण्यास आला व हल्लीं रोज तिला गांवाबाहेर शेतांत नेऊन मारहाण करीत आहा. खाण्यापिण्यास देत नाहीं. त्यामुळें ती फार त्रस्त झाली असून तिला तुमची भीती वाटत आहे. ह्यामुळें ती आपले जिवास कधीं अपाय करील याचा नेम नाहीं. पुढें असा प्रसंग न यावा ह्मणून तुह्मास या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचें आंत तिची अन्नवस्त्रांचा निराळी सोय करून द्यावी. तसी न केल्यास मला योग्य वाटेल तो कायदेशीर इलाज मी करीन व त्याचा सर्व खर्च तुह्मास द्यावा लागेल ता. १२-५-१७ इसवी

सही
सहीची नि. बालकदास वा सिवजी माहार रा. आकोट फैल माची असे

नो. नं. २१६

## जाहिर लिलांव.

तुकाराम हरी नांवाची वणी (वऱ्हाड) येथें असलेली ४० चाळीस जिनची जिनींग फ्याक्टरी आंतील माशिनरी व जागेसह ता. ४ जून सन १९१७ इ. रोजीं संध्याकाळीं ४ वाजतां कंपनीचे कंपौंडांत जाहीर लिलांव होईल. मशिनरी व ३० जीन चालूं हालत मध्यें आहे. विशेष माहिती खालील पत्त्यावर मिळेल.

सही
शेट प्रयागदास नरसिंगदास म्यानेजींग डायरेक्टर वणी (वऱ्हाड)

नो. नं. २१७

# विकाऊ वाडा.

आकोला येथील हनुमान वस्तींतील हाश मशेटचे धर्मशाळे जवळील आमचा वाडा विकावयाचा आहे. सर्व घर फार उत्तम स्थितींत नाक्यावर व हवाशीर असें आहे. उत्पन्नाच्या मानानें या घराच्या खरेदींत घातलेल्या रकमेला चांगलें व्याज येईल. गरजू मंडळींनी आमची समक्ष गाठ घेऊन किंमतीचा खुलासा करून घ्यावा

गंगाधर वामन परांजपे
रा. आकोला.

नो. नं. २१३

पैसा मिळविण्याची नवी विद्या शिका.

# क्रोमोपॅथी इंस्ट्रक्टर

अर्थात्

## वर्णजलचिकित्सा—शिक्षक.

ज्या दिव्यौषधीच्या प्रभावानें आज युरोप, अमेरिकेसारख्या सुधारलेल्या देशांत सुद्धां नाना तऱ्हेचीं औषधें घेऊन कंटाळलेले हजारों असाध्य रोगी रोगमुक्त होत आहेत, त्या अपूर्व विद्येची सप्रमाण व सप्रयोग माहिती ह्यांत दिली असून ही गुप्त पण अगदीं सोपी विद्या प्रत्येकानें अवश्य शिकून कधीं न संपणारा व हटकून गुण देणारा दिव्यौषधींचा दवाखाना उघडावा! रोगग्रस्तांना नवजीवन प्राप्त करून द्या! पैसा व कीर्ति मिळवा. किं अवघी ८८, व्ही. पी. नें ८१०. जरूर मागवाच.

प्रो. ज्ञानमित्र, शनवार पुणें सिटी.

नो. नं. १९९

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भासंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळंतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांची लाली, सकाच, पुवस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवू.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

माल मागविण्याचा पत्ता—

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी, पो० हर्णै, जिल्हा रत्नागिरी.

नो० नं० २२

हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१] आकोला--सोमवार तारीख २८ माहे मे सन १९१७ ई० [अंक २१


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवी ट. हा. ........ २ रुपये.
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटींशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठून येणाऱ्या नोटीसास रविवार व रोड.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**
ह्या बँकेंत खाली दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा ज्यास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची श्री कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } Lyon Scott एजंट
नो नं १

### सांवतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**—उत्तम पानें व टिकाऊ पक्का रंग किंमत ।॥।, १, १।, १॥, २, २॥, ते ३ रु. प. **बुद्धीबळजोड लांकडी**— किंमत ।॥। १, १॥, २ ते ४ रु. प. **सोंगट्या जोड**— किंमत ।, ।॥, ।॥।, १, १॥, रु. प. **खडावा जोड**— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान टिकाऊ व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट

डी. आर. आळवणी, स्टेट सावंतवाडी
नो. नं. ३

### रोल्डगोल्ड सोन्याचे
#### कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. रु. १–४; गोट जोडी २–२॥; पाटल्या जडी २–२॥; वज्रटीका ३–४; ठुशी १. नथ उत्तम मोत्यांनी बांधलेली ४–९. शिंप्याचें मोतीं व्हान मोठे वाटेल तसें. सराची २–३–४; अंगठी १; सले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २–२॥. सरी ४

#### केंस काळे करण्याचा साबण.

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाकसची किं. १॥ रु.

पत्ता– मगनलाल के आणि कंपनी
गिरगांव– मुंबई
नो० नं० ५

अगोदर हे वाचा नंतर निराश व्हा.

### नशिबाची– परीक्षा.

सवलत— पुढील पांच कामें एकावेळीं मागविणारास २॥. रुपयांत पाठवूं, किरकोळ एकेका कामास पुढील प्रमाणें फी पडेल. (१) इच्छेप्रमाणें वाटेल त्या पांच प्रश्नांचे उत्तरास १। रु. (२) एक वर्षाचे वर्ष फलास १॥ रु. (३) छापील फार्मावर सर्व माहिती सह पत्रिकेस १। (४) जन्म कुंडलीवरून सुप्रसिद्ध ग्रंथाधारें आयुष्य असेंपर्यंतची फलें लिहून पाठविण्यास १॥. रु. (५) इच्छित कार्यांत यश येऊन अनिष्ट ग्रहांची पीडा निरसन व्हावी त्या करितां एका महान सिद्ध पुरुषाचा प्रासादिक ताविताल ३। सूचना— ग्राहकानीं वरील कामा करितां साग्रजन्मकाल व प्रश्नवेळ व वय लिहून कळवावे. विशेष खुलासा पत्रद्वारें उत्तरास ८/– आण्याचे तिकिट पाठवावे.

ज्यो. डि. टि. मायधनी
म्या. ज्योतिषकार्यालय. चांदडकर
पेठ— नाशिक
नो० नं० ७३

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हे औषध घेतल्यानें मागचठा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिळाफ करून बनविलें आहे. किं. ४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजळी, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला ने. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H L Batliwala Sons & Co. Ltd.**
N. N. 6 Dadar Bombay

### श्री दत्तात्रय अलंकारालय
### कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसूत्र माळ, ठुशा-जोड, गुलाबाचीफुले, बिल्वदळी टीका, मुदी अग्रफुलें साधीं व घागऱ्याची वगैरे सर्व जातीचा माल–तसेंच चांदीच्या मासोळ्या चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, इत्या माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोन्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों व ढागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन्नसाची लाख काढून वजन तोलून पाहावें गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय–कोल्हापूर

### आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका. आपले आयुष्याचा विमा धि एशियन कमर्शियल अशूअरन्स कंपनी लिमिटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने माहिती आमचे वऱ्हाड आणि मध्यप्रांताचे फिरते एजंट रा. रा. वि रा. सोमण यांनकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटाची जरूरी आहे.

सेक्रेटरीज
धी एशियन कमर्शियल अशूअरन्स
कं. लि. इस्मायल बिल्डिंग्ज.
फोर्ट, मुंबई.
नो. नं. ८

## काश्मीरी केशर.

पवित्र आणि अस्सल १।८ उत्तम कस्तुरी ३५, शुद्धशिलाजीत ४८ सुर्मा ममीरा ३ तो. अंगुरी हींग २।, सुगंधित जीरा १ कागजी बादाम ४९ पौंड, बादाम मुरब्बा २ पौं. टिन १
काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५
नो० नं० ९

अगोदर हें वाचा. नंतर निराश व्हा.

## प्रारब्धपरीक्षा

### फुकट पाठवूं.

खालील दोन्ही कामें एकदम मागविणारास छापील फार्मावर संपूर्ण माहितीसह पत्रिका बक्षीस म्हणून फुकट करून पाठवूं.

फक्त प्रश्न, वेळ आणि वय व इच्छेप्रमाणें वाटेल ते ६ प्रश्न स्पष्ट लिहून पाठवावे उत्तर १ रु. ४४ चे व्ही. पी. नें अनुभवशीर पाठवूं. शिवाय जन्मकुंडलीवरून एका सुप्रसिद्ध ग्रंथाधारें आयुष्य असे तों चीं फलें लिहून पाठविल्यास १ रु. ४४ विशेष माहिती पत्रद्वारें उत्तरास ४१ तिकीट पाठवा.

ज्योतिषी दा. दानि शास्त्री नं. १०३७
नो. नं. ७३ नाशिक

## जाहिर लिलांव.

तुकाराम हरी नांवाची वणी ( वऱ्हाड ) येथें असलेली ४० चाळीस जिनची जिनींग फ्याक्टरी आंतील माशिनरी व जागेसह ता. ४ जून सन १९१७ इ. रोजीं संध्याकाळीं ४ वाजतां कंपनीचे कंपौडांत जाहीर लिलांव होईल. माशिनरी व ३० जीन चालू हालत मध्यें आहे. विशेष माहिती खालील पत्यावर मिळेल.

सही

शेट प्रयागदास नरसिंगदास म्यानेजींग डायरेक्टर वणी ( वऱ्हाड )

नो. नं. २१७

## जहिरात.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं सुर्यभान वा जानजी मोहिरूत रा. मौजे थार उर्फ बर्दापूर प्र. खेडी ता. मेहकर जि. बुलढाणे

यांसः—

मी खुद स्वतः करितां आणि माझा अज्ञान भाऊ उत्तम याचा पालन करणार मीच भाऊ ह्मणून असे उभयतां करितां ता. २७-११-१६ रोजीं जे दोन कुलमुखत्यारपत्र करून दिले होते ते मी आज तारखेपासून रद्द केले आहेत तरी आमचे संबंधीं त्याच्याशी कोणी देवघेव, खरेदी, विक्री, गहाण वगैरे कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो रद्द समजला जाईल. त्याच्याशीं आमचे संबंधीं कोणतेही प्रकारचा व्यवहार करूं नये. कळावें ता० १०-५-१९१७ इ.

सही

निा व्यंकटी वा रामजी हेले रा. थार उर्फ बर्दापूर ता० मेहकर याचा आंगठा अज्ञानाकरितां व स्वतःकरितां

नो० नं० २२५

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस खाली सही करणार यांजकडून नोटिशीनें कळविण्यांत येते कीः— माझा सर्वांत वडील मुलगा नामें गोपाळ ओंकार झांबरे कुणबी राहणार जांभुळधाबे हा लोकांपासून कर्ज काढून ते बाहेरच अफरातफर करित असतो. त्या कर्जाचा उपभोग माझे संसारास होत नाहीं. करितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तो जे कांहीं तुमचे जवळून कर्ज काढेल त्या बद्दल मी अगर माझी इस्टेट त्यास जबाबदार राहणार नाहीं. तो जातीनें जबाबदार राहील. माझे जिनगीचा अगर माझे भरंवशावर त्यांस कोणी कर्ज देऊ नये. दिल्यास त्याबद्दल मी जबाबदार नाहीं. देणें झाल्यास त्याचे भरंवशावर द्यावें. ही नोटिस दिली. तारीख २४-५-१९१७ दस्तुर कृष्णाजी रामचंद्र निमगांवकर मलकापूर

सही

ओंकार गिरी पाटील नि. खुद हातचा आंगठा असे

साक्ष

अनंत नारायण वराडे मलकापूर द. खु.

१ गुलाबसा मोहनसा पोरवाड द. खुद

नो. नं. २२६

## नोटीस

रा. रा. रामु वा बापुना कुकडे राहणार राहीत तालुका आकोला

यांसः—

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, माझी धाकटी बहीण चिणकी वय १४ सुमारें ही तुमची कज्जाची बायको आहे. ती आतां शहाणी झाली आहे. तिला दुनियेदारीला लावावी ह्मणून आह्मी पुष्कळ प्रयत्न केले. कानसणी तालुका आकोला येथील देवीच्या देवळांत तुह्मी अनुष्ठान चालविलें तेव्हां तुमच्या वडिलांच्या सांगण्यावरून व आग्रहावरून माझा दुसरा बहिण जांवई सोन्या भोई यानें तिला माझ्या येथे आणून घालण्याचें कबूल केलें. आणि तुमच्या वडिलांनीं तिला त्याच्या बरोबर पाठवून दिलें. ती आली तेव्हां तिच्या अंगावर दागदागीना वगैरे कांहींच नव्हता. खरा प्रकार असा असून आतां तुह्मी खोटेंच २०० रुपयांचे दागिने तिच्या अंगावर होते ह्मणून ह्मणता. तुमचे पिलें खरोखर जाईल तर मी तुमच्या बायकोला तुमच्या घरीं आणून पोचती करण्यास तयार आहे. तुह्मीं स्वतां आमच्या घरीं पाहुणचाराला यावें ह्मणजे तुमच्या विसेपणाबद्दलची चौकशी माझे सोयरे लोक करितील व माझ्या बहिणीला पाठवावयाची किंवा नाहीं याबद्दलचा पंच मार्फत निकाल करून घेण्यांत येईल. गेल्या दोन वर्षांच्या खावटीचे रुपये तुमच्या इस्टेटींतून वसूल करण्यांत येतील. आणि तुह्मी कायमचे पिसे आहा असा पंचाचा निकाल झाला तर आपल्या जातीच्या नियमाप्रमाणें तिचा दुसरे ठिकाणीं घरठाव करून देईन. तुमच्या वडीलाच्या ह्मणण्यावर भरंवसा बसत नाहीं. ह्मणून ही मुद्दाम सूचना केली आहे. जातगंगा सांगेल त्याप्रमाणें पुढें वागण्यात येईल कळावें. ता. २० मे १९१७

सही

उकंडा वा शंभु भोई राहणार शिवणी तालुका मंगरूळपीर

दस्तुर खुद

नो० नं० २२७

## नोटीस

सौ. भिवरी उर्फ जमनाबाई मर्द मोतीराम वानखेडे सइतवाळ राहणार, इतवारी सर्कल १४-९. नागपूर

इसः—

खाली सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं तूं ता. ९ मेची जाहिर नोटीस दिलीस ही गोष्ट फार सुमार होय. तुझी आई व दुसरी कांहीं आप्तमंडळी तुला गैरगोष्टी शिकवितात व भलत्याच फंदाला लावूं पाहतात तर तूं शुद्धीवर येऊन ताबडतोब त्यांची संगती सोडून हिवरखेड येथें आपल्या घरीं सुखानें नांदण्यास लागावें यांतच तुझा नीटपणा आहे. तूं स्वतां स्वभावानें चांगली आहेस पण दुसऱ्या लोकांच्या छंदामुळें तूं आमच्या इच्छेविरुद्ध माहेरी निघून गेलीस या गोष्टीला एक वर्ष झालें तरी तूं अजून परत आली नाहींस. कांहीं लबाड लोकांच्या सल्यामुळें तुझ्या आईनें मारहाणीचा प्रसंग आणून तुला नेलें आहे. कांहीं दिवसांनीं सर्व संसार सुरळीत होईल व गैरसमज दूर होतील अशा हेतूनें मी जातेवेळीं तुझ्या अंगावरील दागदागिना अंदाजा किंमत रुपये ८०० चा होता तसाच तुला नेऊं दिला आहे. आतां ही तुझी नोटीस अगदीं बेफामपणाची असून तुला एक कवडी सुद्धां मी देणार नाहीं. तूं आपल्या मगरूरणानें मुद्दाम तिकडे राहिली आहेस. तेव्हां अन्न वस्त्राच्या पैशाची ढोंगे पुढें केल्यानें तुझ्या सल्लागारांचा दुष्ट हेतु सिद्धीस जाणार नाहीं. ही नोटीस पोचल्या नंतर आठ दिवसांच्या आंत तूं घरीं परत न आल्यास तुझ्यावर कोर्टांत फिर्याद करून तुला ताब्यांत घेतली जाईल आणि तुझ्या आईवर व दुसऱ्या आप्तवर्गावर दागिन्याबद्दल फसवेगिरीची फौजदारी करून सर्व चीजवस्तु परत घेतल्या जातील. या तुमच्या कृतीनें आमच्या इज्जतीला जो धक्का बसत आहे. त्याबद्दल अब्रु नुकसानीची निराळी फीर्याद मी तुझावर दाखल करणार आहे. लपंडावानें किंवा अन्य लबाडीनें जर दुसरा घरठाव करण्याची तयारी तुझ्या आप्तांनीं केली तर त्याबद्दल तुझा सर्वांचा जबाब फौजदारी कोर्टांत घेतला जाईल. कळावें. ता. १८ मे १९१७ इ.

सही

मोतीराम गोविंदा सईतवाळ रा० हिवरखेड रुपरावचे तालूका आकोट जिल्हा आकोला

नो. नं. २२८

वऱ्हाडसमाचार

जेष्ट शुद्ध ७ पिंगल संवत्सर १८३९

## समाजसुधारणा आणि राष्ट्रघटना.

हिंदुस्थानांत सध्या चाललेल्या राजकीय व सामाजिक जागृतीवरून राष्ट्र घटनेचें कार्य सफळ होत चाललें आहे असें समाधान मानण्यास पुष्कळ जागा आहे. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत राजकीय स्वराज्याची मागणी हल्लीं इतकी जोरानें चालली आहे कीं नेमस्त व जहाल असा भेदच आतां उरला नाहीं, आणि हें इष्ट कार्य घडून येण्याचे कामीं आपल्या स्वतःचे हातीं सगळें अधिकार ठेवूं इच्छिणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांची मदत फार मोठी होत आहे याबद्दल त्यांचे आभार मानिले पाहिजेत. जों जों स्वराज्याच्या हक्काची मागणी जोरानें होत आहे तों तों सरकारी अधिकारी स्थानिक स्वराज्याला ही आमचे लोक अपात्र आहेत असें ठरविण्याचा यत्न कसा जोरानें करीत आहेत हें मुंबई इलाख्यांतल्या कराची, हैदराबाद, अमदाबाद. सुरत, व पुणें येथील म्युनिसिपालिट्यांशीं सरकारी अधिकाऱ्यांचें होत असलेल्या वर्तनावरून आणि मद्रास, व मध्यप्रांत येथील सरकारांनीं विद्यार्थ्यांच्या संबंधानें काढलेल्या सर्क्युलरावरून व्यक्त होत आहे. जों जों विरोध ज्यास्त होईल तों तों लोकांच्या अंगांतला उत्साह ज्यास्त कसोटीला लागून तो वृद्धिंगत होईल. राजकार्य दृष्ट्या राष्ट्रसंघटनेचा उचित काळ जवळ येत चालला आहे याचें हें सुचिन्ह आहे. ज्याप्रमाणें राजकीय जागृतींत सरकारी अधिकाऱ्यांकडून होणारा विरोध आमच्या राजकीय आकांक्षा वृद्धिंगत व पुष्ट करण्यास कारण ह्मणून अभिनंदनीय आहे, त्याप्रमाणें सामाजिक सुधारणेच्या बाबतींत हा असा विरोध असता तर तोही आह्मांस तसाच अभिनंदनीय वाटला असता. परंतु सुदैवानें ह्मणा अगर दुर्दैवानें ह्मणा तेथें असा विरोध मुळींच उरलेला नाहीं. तेथें विरोधाचें कार्य संपून सामाजिक सुधारणेची खरी खरी उपयुक्तता लोकांना पटली आहे आणि आपल्या देशांत प्रांतोप्रांतीं होणाऱ्या ज्ञातिपरिषदा लोकांच्या सामाजिक सुधारणेविषयींच्या उत्साहाची साक्ष देत आहेत. या उत्साहाचा आतां राष्ट्रघटनेच्या कार्यांत उपयोग करून घेण्यासाठीं त्याला एका केंद्रांत आणून सोडण्याची अवश्यकता आहे. परवा नाशिक येथें भरलेल्या सामाजिक परिषदेंत अध्यक्षाच्या पदावरून झालेलें मि जयकर यांचें भाषण व गंजम येथील सामाजिक परिषदेचे अध्यक्ष मि. महादेव शास्त्री यांचें भाषण पाहिलें असतां निरनिराळ्या प्रांतांतल्या पुढाऱ्यांना ही अवश्यकता कशी भासत आहे तें चांगलें व्यक्त होईल. मि. महादेव शास्त्री यांनीं तर या केंद्रीकरणाची आपली योजना ही तयार करून लोकांपुढें मांडली आहे. या योजनेचा विचार निरनिराळ्या प्रांतांतले सामाजिक पुढारी करतील व सर्वे संमत व व्यवहार्य अशी एखादी योजना त्यांतून निघून ती अमलांत आणण्याचे प्रयत्न लवकर होऊं लागतील तर राष्ट्रोन्नतीच्या चार अंगापैकीं दोन अंगें ह्मणजे राजकीय व सामाजिक जागृति यासंबंधानें लोकांनीं आपलें कर्तव्य उत्तम प्रकारें बजाविलें आहे असें ह्मणतां येईल. राहिलेलीं दोन अंगें ह्मणजे उद्योग जागृति व शिक्षण प्रसार यांच्याकडे अधिकाधिक लक्ष देण्याचें तेवढें राहील व तेंही कार्य आमचे पुढारी लवकरच हातीं घेऊन यशस्वी रीतीनें पार पाडतील अशी आह्मांस उमेद आहे.

## अजून कामाचा डोंगर पुढेंच आहे!

आमच्या देशांत शेतकऱ्यांच्या साह्यार्थ सहकारितेच्या तत्त्वावर थोड्याशा पेढ्या कोठे निघाल्या न निघाल्या तोंच आंग्लोइंडियन पत्रें त्या काढण्यांत सरकारी अधिकाऱ्यांनीं घेतलेल्या पुढाकाराबद्दल त्यांना डोक्यावर घेऊन नाचत आहेत, आणि कित्येक तर आता सरकारनें यापुढें मदत करण्याचें

कारण नाहीं लोकांवरच त्यांचा सगळा भार टाकावा असें ही सुचवूं लागलीं आहेत! पण सहकारित्वाच्या कार्यावर शेतकऱ्यांची व एकंदर देशाची सांपत्तिक स्थिति सुधारण्याच्या प्रश्नाला किती विविध अंगें आहेत व त्या सर्व अंगांनीं हिंदुस्थानची सुधारणा लवकर होण्याला सरकार व लोक या दोघांच्याही संयुक्त प्रयत्नाची किती जरूरी आहे तें करवून ठेवण्यांत अर्थ नाहीं. डेनमार्क हा देश हिंदुस्थानासारखाच कृषिप्रधान देश आहे. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत आज जी हिंदुस्थानच्या शेतकीची स्थिति दिसत आहे तशीच डेन्मार्कची ही होती. पण गेल्या ६०-७० वर्षांत ती किती सुधारली आहे व डॅनिश शेतकरी सांपत्तिक स्थितींत युरोपांतल्या इतर संपन्न राष्ट्राच्या बरोबरीला कसे आले तें पाहिलें ह्मणजे हिंदुस्थानच्या पुढें या बाबतींत कामाचा डोंगर उभा आहे असें कोणास ही वाटल्यावांचून राहणार नाहीं. पूर्वी डेन शेतकरी इकडच्या प्रमाणें नुसतें धान्य विकविण्याकडे लक्ष देत; गुरांची जोपासना किंवा दुधदुभतें याकडे त्यांचें लक्ष नसे. पण तेथील सरकारानें लोकांमध्यें सार्वत्रिक शिक्षणाचा प्रसार झपाट्यानें केल्यामुळें आपलें हित कशांत आहे तें तेथील शेतकऱ्यांना कळून आलें व त्यांनीं सहकारित्वावर शेतकी व त्या धंद्यांचीं वर सांगितलेलीं निरनिराळीं अंगें यांकडे लक्ष पुरवून आपली सांपत्तिक स्थिति सुधारली. गुरांची जोपासना चांगली होऊं लागल्यापासून दूधदुभत्याचा पुरवठा चांगला होऊं लागला व दुभत्याचा धंदा शेतकऱ्यांना किफायतशीर होऊन लोकाना निर्मळ व स्वच्छ दुधाचा पुरवठा विपुल होऊं लागल्यामुळें लोकांच्या आरोग्यांत सुधारणा होऊन एकंदर मृत्युसंख्येचें व विशेषतः अर्भकांच्या मृत्यूंचें प्रमाण कमी झालें. पण या सगळ्या सुधारणेच्या मुळाशीं शिक्षणप्रसार ही एक गोष्ट विशेषतः होती हें विसरतां कामा नये. शिक्षण हा देशाच्या सर्वांगीन उन्नतीला कसा रामबाण उपाय आहे हें यावरून दिसून येईल. पण आमचे सरकारी अधिकारी हा उपाय करून पाहण्याला कसे भीत आहेत तें ना. गोखले यांच्या सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या बिलाच्या अवस्थेवरून सर्वांस ठाऊकच आहे. शिक्षणाप्रीत्यर्थ खर्चण्यास तुमचे जवळ पैसे नाहींत, तर निदान ज्या म्युनिसिपालिट्या शिक्षण विषयक कर बसवून घेण्यास तयार असतील त्यांना तरी तो बसवून घेण्यास परवानगी द्या अशी ना. गोखल्यांची संयुक्तिक मागणी होती. पण सरकारास ती ही मान्य झाली नाहीं. पण सार्वभौम हिंदुस्थानसरकारास जी गोष्ट करतां येत नाहीं ती गोष्ट एकाच हाडामांसाच्या व एकाच रक्ताच्या आपल्या प्रजेच्या कल्याणाची खरी इच्छा असल्यास देशी संस्थानिकांना करतां येते ही गोष्ट बडोदे संस्थानच्या उदाहरणावरून सर्वांना दिसून आलीच आहे. सारांश, नुसता शेतकरी वर्ग घेतला तरी त्याच्या सांपत्तिक उन्नतीच्या संबंधांत प्रयत्न करण्यास क्षेत्र येवढें मोठें आहे कीं त्या क्षेत्राचा येवढासा कोपरा झाडून साफ केल्याबद्दल फुशारक्या मारून बाकीचें सारें काम तसेंच पडूं देणें या सारखा मूर्खपणा दुसरा कोणताही नसेल.

---

## क्षुब्धतेचें कारण.

विलायतच्या बातम्या इकडे किंवा इकडच्या बातम्या विलायतेस पाठवितांना रूटर कंपनीचे एजंट कशी चालाखी करतात व राईचा पर्वत करून अथवा वडाची साल पिंपळास लावून कसा गैरसमज पसरून देतात याचा अनुभव मागें अनेक वेळां आला आहे. मि. गांधी यांनीं बहारप्रांतांत मळेवाले व मजूर यांच्या मधील संबंधाविषयींची जी चौकशी हिंदुस्थान सरकारच्या संमतीनें चालविली आहे तिच्या संबंधानें असोशिएटेड प्रेसच्या बातमीदारानें असाच गैरसमज उत्पन्न करण्याचा प्रयत्न नुकताच केला व एका कारखान्याला लागलेल्या आगीचा संबंध मि. गांधी यांनीं चालविलेल्या चौकशीशीं लावून दिला! सुदैवानें तेथील अधिकारी आपलें डोकें शांत ठेवणारे आहेत. ह्मणून मि. गांधी यांनीं केलेल्या तक्रारीस त्यांनीं येवढेंच उत्तर दिलें कीं या आगीचा संबंध मि. गांधी यांच्या चौकशीशीं प्रत्यक्ष नसला तरी तिच्यामुळें उत्पन्न झालेल्या क्षुब्धतेशीं आहे. ही क्षुब्धता कोणामध्यें व कशामुळें उत्पन्न झाली हें कळण्यास तूर्त मार्ग नाहीं. मि. गांधी यांच्या चौकशीचा रिपोर्ट बाहेर पडेल तेव्हां तें कळेल. पण कलकत्त्याच्या 'बंगाली' पत्राच्या गया येथील बातमीदारानें जी एक गोष्ट खरी घडलेली ह्मणून प्रसिद्ध केली आहे ती जर खरी असेल तर मात्र या क्षुब्धतेबद्दल कांहीं अनुमान करतां येण्यासारखें आहे. तो बातमीदार लिहितो कीं ता. २६ एप्रिल रोजीं सकाळीं मि. गांधी हे एक वकील व पोलिस इन्स्पेक्टर यांच्या सह संघचप्रा नांवाच्या गांवीं गेले असतां मळेवाल्यांनीं आपल्या बंगल्याच्या कंपौंडांत सुद्धां निळीची लागवड केलेली त्यांना दिसून आली. इतक्यांत एक विधवाबाई १० वर्षांच्या आंतल्या आपल्या चार मुलांस घेऊन आली आणि आपल्या डोक्यावरल्या केसाकडे बोट दाखवून आपल्या दुःखाची कहाणी सांगूं लागली. तिनें असें सांगितलें कीं कोठीच्या ठिकेदारानें आपले केस धरून आपणास ओढीत नेलें व आपण गांवकऱ्यांच्या विनवण्या केल्या असतां कोणी ही आपल्या मदतीस आले नाहींत. ठिकेदारानें आपणांस मळ्यांत नेऊन आपणांस व आपल्या १० वर्षांच्या मुलांस जबरदस्तीनें कामाला लाविलें. द्रौपदीच्या केशहरणाची ही द्वितीयावृत्ति खरी असेल तर मि. गांधी यांनीं चालविलेल्या चौकशीमुळें उत्पन्न होणारी क्षुब्धता कोठें शोधावी याचा उलगडा आपोआप होण्यासारखा आहे.

---

## महायुद्धाची प्रगति.

पश्चिमरणांगणावर लढाई पूर्ववत जोरानें चालली आहे. शत्रूच्या हातून एकेक ठिकाण निघून तें संयुक्त पक्षाच्या हातीं येत चाललें आहे. या जयामुळें संयुक्त पक्षास विशेष हुरूप वाटून शत्रूशीं तो मोठ्या उत्साहानें व धैर्यानें झुंजत आहे. या उत्साहामुळें लढाईस अपूर्व रंग चढत चालला आहे. आरासकांबे या सडकेवरील महत्वाचीं ठाणीं सर करण्याच्या उद्देशानें ब्रिटिश फौजेनें शत्रूवर निकराचे हल्ले केले. या हल्लयांत तरवारी व संगिनी यांचा उपयोग विशेष झाला.

आस्ट्रियाचा खरपूस समाचार घेण्याकरितां इटली आज बरेच दिवस आपले सैनिक तयार करीत होती. एकदाची तयारी कडेकोट होऊन इटालियन सैन्यानें आस्ट्रियावर अचानक हल्ला केला. या सैन्यानें एसोन्झो नदीचा साठ मैल पर्यंत किनारा व्यापला आहे. या हल्यानें आस्ट्रियन सैन्याची दाणादाण झाली, व कको टेंकडी व कार्सो पठाराचा बराचसा भाग इटलीनें काबीज केला. इटलीनें एकदम हल्ला केल्यामुळें या पुढें आस्ट्रिया इटालियन सरहद्दीवर ज्यास्त सैन्य ठेवील आणि त्यामुळें सालोनिकाकडे शत्रूची तयारी कमजोर होईल.

राशियन सरहद्दीवर महत्वाचे असें वृत्त कांहीं घडलें नाहीं. किरकोळ झोंबाझोंबी सुरु आहे व त्यांतही राशियन सैन्याचीच सरशी आहे.

जर्मनीविरुद्ध लढाईचें शिंग फुंकल्यापासून अमेरिका आपल्या सैन्याची, होईल तितक्या जलदीनें, तयारी करीत आहे. तयारी झटपट केल्यामुळें लढाईवर पाठविण्यास योग्य असें कांहीं सैन्य तेथून रवाना झालें आहे. तें सैन्य फ्रान्समध्यें उतरल्यावर पराक्रम गाजविण्यास सुरवात करील.

**तहाची वाटाघाट**—लढाई बरोबर तहाची वाटाघाट सुरु आहे. ही वाटाघाट फक्त जर्मनींत चालू आहे. राज्य क्रांतीमुळें राशिया कमजोर झाला असेल या समजुतीनें जर्मनी राशियास वेगळा तह करण्याची भुरळ पाडीत आहे. परंतु राशियानें जर्मनीस एकच उत्तर मागें देऊन ठेविलें आहे कीं आह्मी अखेरपर्यंत दोस्तांच्या बाजूनें लढणार असून जों पर्यंत जर्मनीची अरेरावी नाहींशी झाली नाहीं तों पर्यंत जर्मनीशीं तह करणें ह्मणजे जर्मन जूं मानेवर घेण्यासारखेंच आहे. जर्मन चॅन्सेलर कितीही राशियाला आपल्या नादीं लावण्याचा प्रयत्न करूं लागला व त्यानें कोणत्याही गुळचट थापा मारल्या तरी राशिया त्यास दाद देणार नाहीं. सध्या प्रबळ असलेला व कांहीं दिवसापूर्वी ज्याविषयीं सर्व लोक साशंक झाले होते त्या सोशियालिस्ट पक्षानें पुनः एकवार सर्व जगास व विशेषतः जर्मन चॅन्सेलर यास सांगितलें कीं राशिया अखेरपर्यंत दोस्तांच्या बाजूनेंच लढेल. त्यास निराळा तह करण्याची इच्छा नाहीं. जोंपर्यंत प्रत्येक देशाच्या ताब्यांत-तो देश लहान असो किंवा मोठा असो--आपलें भवितव्य ठरविण्याचा अधिकार आला नाहीं व जोंपर्यंत स्वतःचें भवितव्य ठरविण्याचा अधिकार स्वतकडे अबाधित राहावा हें तत्व प्रस्थापित झालें नाहीं तोंपर्यंत तह न करणें शहाणपणाचें आहे.

---

## आठवड्यांतल्या बातम्या.

भारतसंरक्षक सैन्या संबंधानें हिंदुस्थान सरकारानें एक महत्वाचा ठराव काढला आहे. त्याचे तीन भाग आहेत. पहिल्यांत सहा महिन्यांत ६००० शिपायांची भरती करावयाची असतां गेल्या दोन महिन्यांत फक्त ३०० लोक भरती झाले याबद्दल खेदाचे व निराशेचे उद्गार काढले आहेत. दुसऱ्या भागांत सरकारानें या शिपायांच्या पगारा वगैरे संबंधानें ज्या अटी ठरविल्या आहेत त्याविषयीं वर्तमानपत्रांतून झालेल्या टीकेस उत्तर दिलें आहे व त्यांत ब्रिटिश टेरिटोरियल सैन्य व भारतसंरक्षक सैन्य यांची तुलना करून पहिल्यांतले लोक कोणती ही अट न घालतां भरती होतात, व हिंदुस्थानचे लोक मात्र ज्यास्त पगाराची व सवलतीची अपेक्षा करतात असें ह्मटलें आहे व तिसऱ्या भागांत हिंदी पुढाऱ्यांनीं हा प्रश्न जोरानें व कळकळीनें हातीं घ्यावा असा त्यांना उपदेश केला आहे. यासंबंधांत आह्मांस लवकरच लिहावयाचें आहे.

आयरिश प्रश्नासंबंधाच्या आतांपर्यंतच्या प्रयत्नास यश न येण्याचें कारण मि. लाइड जार्ज यांनीं कामन्ससभेंत असें सांगितलें कीं आतांपर्यंतच्या योजना इंग्रज मुत्सद्यांनीं तयार केल्या होत्या. ह्मणून आतां कॅबिनेटनें असें ठरविलें आहे कीं या खेपेस आयरिश पुढाऱ्यांनीं योजना तयार करून पार्लमेंटपुढें मांडावी ह्मणजे ती तयार करतांना कोणकोणत्या अडचणी लक्षांत घ्याव्या लागतात त्यांचें आयरिश लोकांना ज्ञान होईल. ही योजना तयार करण्यासाठीं सर्व पक्षांच्या (सिनफेन सुद्धां) प्रतिनिधींची एक सभा बोलावण्याचा सरकारचा विचार आहे.

कॅनेडियाचे वॉर कान्फरन्समधले प्रतिनिधि सर बोर्डन ह्मणाले कीं सदर कॉन्फरन्ससाठीं आलेले हिंदुस्थानच्या प्रतिनिधींची वागणूक अत्यंत प्रशंसनीय होती व त्यामुळें आपणांस इतका संतोष झाला कीं यापुढें ज्या अटींवर हिंदुस्थानांत कॅनेडियन लोकांस येतां येतें त्याच समान त्याच्या अटींवर हिंदी लोकांना ही कानडा देशांत येऊं देण्यास कानडामधील सरकारानें ठरविलें आहे. सर बोर्डन यांचे हे उद्गार ऐकून हिंदुस्थानांतल्या लोकांना फार संतोष होईल. समानत्वाच्या अटींचें तत्त्व वस्तुतः तीन वर्षांपूर्वीं लॉर्ड हार्डिंज यांनीं व्हाइसराय असतांनाच सुचविलें होतें. त्यावेळीं जरी त्याचें ह्मणणें कानडामधील लोकांना उपेक्षणीय वाटलें तरी आतां तें त्यांना मान्य झालेलें पाहून लॉर्ड हार्डिंज साहेबांना ही खरोखर फार संतोष होऊन कानडा मधील हिंदी लोकांसंबंधाचा प्रश्न कायमचा निकालाला लागेल अशी उमेद आहे.

चीन, जपान, सैबेरियावगैरे कडून विलायतेला जाणारी व त्याचप्रमाणें इराणी आखाताकडून विलायतेला जाणारी अशा दोन मेल बोटी शत्रूनें सबमरीननें समुद्रांत बुडविल्या असें पोष्टखात्यानें जाहिर केलें आहे.

राशिया वेगळा तह करण्यास कबूल नाहीं. पण प्रांत किंवा दंड न घेतां व आपापल्या कामाचा निकाल आपला आपण

करण्याच्या तत्त्वावर सामान्य तह करण्याकडे रशियाचें मन झुकत आहे.

एकट्या एप्रिल महिन्यांत जर्मनीचीं ४२८३८ माणसें लढाईत निकामी झालीं. एकंदर आजपर्यंत निकामी झालेल्यांची संख्या ४२४५८०४ असून एप्रिलमध्यें ठार झालेल्यांची संख्या ११९७९ व एकंदर ठार झालेल्यांची संख्या १०,४२,०२९ आहे असें जर्मन प्रेसब्युरोतर्फे जाहिर करण्यांत आलें आहे.

प्यालेस्टाईन ज्यूडिया व गॅलेली मधल्या यहुदी लोकांचा तुर्क लोक अतिशय छळ करीत आहेत व मागें आर्मेनियन लोकांची अमानुष कत्तल झाली तशी आतां ज्यू लोकांची होईल अशी भीती वाटत आहे म्हणून सर्व ठिकाणच्या सोशिआलिस्टांनीं हा प्रकार बंद करण्याची कांहीं खटपट करावी अशी प्यालेस्टाइनमधल्या सोसायट्यांनीं विनंतिपत्रक काढलें आहे.

आंग्लो—फ्रेंच चढाईचे वेळीं हिंडेनबर्गकडून ज्या पद्धतीनें लढाई करण्यांत आली तिच्या संबंधानें केसर व हिंडेनबर्ग यांच्यामध्यें बरीच बाचाबाची झाली अशी खबर आहे.

विलायतेंतलें 'नेशन' पत्र विलायतेच्या बाहेर पाठविण्यास ब्रिटिश सरकारकडून जी मनाई करण्यांत आली तिच्याबद्दल खुलासा करतांना मि. लाईड जॉर्ज यांनीं असें सांगितलें कीं ब्रिटिश सैन्याला सध्याच्या युद्धांत यश मिळणें अशक्य आहे असें निराशेचे उद्गार त्या पत्रांत वारंवार येत असत व त्याचा परिणाम लढणाऱ्या इंग्रज शिपायांवर अनिष्ट प्रकारचा होई, त्यांची नाउमेद होई अशा तक्रारी लष्करी अधिकाऱ्यांकडून व फ्रेंच अधिकाऱ्यांकडून ही आल्यामुळें वॉर आफिसेनें परभारें सदर पत्राला बाहेर पाठविण्यास मनाई केली, यांत कांहीं गैर झालें असें आपणांस वाटत नाहीं. हा खुलासा ऐकून मि. चर्चिल सभेंतच खो खो हंसले, पण जमलेल्या बाकीच्या मंडळीस मि चर्चिल यांचें हें वर्तन आवडलें नाहीं.

शारीरिक रोगांची चिकित्सा व औषधोपचार करणारे दवाखाने हिंदुस्थानांत सर्वत्र आहेतच. पण मानसिक रोगांची चिकित्सा करून त्यांवर उपचार करणारा एकही दवाखाना हिंदुस्थानांत नाहीं. असा दवाखाना कलकत्त्याजवळ भवानीपूर येथें काढण्याचें बंगाल सरकारनें ठरविलें असून तूर्त त्यांत १९ हिंदी व १९ युरोपियन रोग्यांना घेण्यांत येईल अशी योजना केली आहे.

मि. रुझवेल्ट यांच्या हाताखालीं फ्रान्समध्यें लढाईवर जाण्यासाठीं व्हालंटियरांची एक तुकडी तयार होत होती. पण तिला अमेरिकन सरकारकडून परवानगी मिळाली नाहीं. तथापि रेग्युलर अमेरिकन सैन्यांपैकीं लष्करी शिक्षण घेऊन तयार झालेले असे २६०० शिपाई जनरल पार्शींग यांच्या हाताखालीं फ्रान्सांत लढाईवर पाठविण्याचें अमेरिकेनें ठरविलें आहे.

## गठडीं लाल

**( भारत सेनेचा कंगालपणा )**

भारत सैन्य गोळा होत नाहीं आणी इंग्लिश तरुण रणांगणीं आपल्या जिवाची आहुती देतात असे दोन व्युत्क्रम मातृभूमीच्या पुत्राविषयीं हिंदुस्थान सरकारनें आपल्या ठरावांत सशोक हर्षानें नमूद केले आहेत. आम्ही त्या मार्मिक व चतुरस्त्र नेपोलियन बोनापार्टाच्या भाषेंत उत्तर देऊं कीं हिंदुस्थानातलें इंग्रजी राज्य बानियेशाहीचें आहे. तेव्हां त्या वैश्यवृत्तीच्या अतिरेकांत इंडियन अंतःकरणाच्या खुणा व क्षात्रीय तेज पटण्याचा संभव नाहीं. स्वामी रामतीर्थांच्या सिद्धांतानें आम्ही इंडिया सरकारास म्हणतों कीं—

.... .... .... ....सबकी गठडीं लाल।
गांठ खोल नही जानते इतबिध भये कंगाल॥

आमच्या भारत सेनेच्या कंगालपणाचें मुख्य कारण यांतच आहे.

## सर्कसचे हत्ती घोडे.

स्वराज्य हें ध्येय आमच्या स्थानिक सरकारास कबूल आहे. पण तो प्रसाद तात्कालिक किंवा कालहरणाचा असावा या संबंधानें इंडियन मताशीं सरकारी विरोध आहे. स्वराज्य संघाच्या सभा कायद्यानें मना करतां येत नाहींत, तथापी हार्दिक इच्छा ही कीं कोणी चीट पाखरूं देखील या संघांत सामील असूं नये. या इच्छेच्या पूर्णते साठीं आमचे प्रांतिक सरकार सर्कशीचा प्रयोग करून दाखवीत आहेत. पिंजऱ्यांतले जसे सिंह, व्याघ्र, हत्ती, घोडे इत्यादि जनावरें सर्कस वाल्याच्या इच्छेप्रमाणें नाचतात व वागडतात, त्या प्रमाणेंच ज्या लोकांचीं मनें व बुद्धी सरकारापाशीं आमच्या प्रांताप्रमाणें तावेगहाण आहेत त्या सरकारी अंमलदार, चाकर नोकर, देशमूख देशपांडे, पाटील पटवारी इत्यादिकांनीं स्वराज्यसंघाकडे जाऊं नये म्हणून द्वाही फिरविली आहे. वरील मंडळी शिवाय इतर ऑनररी मॅजिस्ट्रेट, पुष्कळसे म्युनिसिपल् सभासद व जिल्हा बोर्डाचे सभासद हेही संसर्गानें हत्ती घोडे बनले आहेत. आणि या रितीनें बाह्यतः तरी स्वराज्यसंघाचे हातपाय तोडून टाकण्यांत आले आहेत. स्वराज्यसंघाला तरी वरील पशुवर्गांत मोडणाऱ्यांची मानसिक उन्नत्ति करण्यापेक्षां ज्या कांहीं लोकांत राम आहे, त्याच्यांत हें नवें चैतन्य उत्पन्न करणें बरें.

## वृश्चिक दंशावर सुलभ उपाय.

मिरज हायस्कूलचे हेडमास्तर रा. बी. आर. गोगटे यांनीं वृश्चिक दंशावर अति सुलभ व खात्रीचा असा उपाय प्रसिद्ध केला आहे. तो आम्ही आमच्या वाचकांसाठीं येथें देत आहों.

विंचू चावून बधिर झालेली जागा, थंड पाणी घेऊन पाय धुतों त्याप्रमाणें दगडानें किंवा चाकूनें घांसून स्वच्छ करावी. आणि थंड पाण्यांत वेखंड उगाळून त्याचें गंध त्या जागेवर थोडेसें चोळावें व लेप करावा. लेप करितांच विंचू तावडतोब उतरूं लागून लगेच आराम वाटतो. बहुतेकांची जागची फुणफुणहि नाहींशी होते आणि सर्वांस झोंपहि चांगली येते. जागेची फुणफुण न राहिल्यास अर्ध्या तासानें पुनः धुवून लेप करावा. या उपायाइतका सुलभ व खात्रीचा दुसरा उपाय नाहीं, हें अनुभवानें खास कळून येईल.

सर्पदंशावर डाक्टरच्या किंवा खात्रीच्या अभावीं असाच प्रयत्न करून पहावा. अपाय नाहीं. उपायच होईल. सर्पदंशांत याच गंधाचें अंजन व वेखंडाच्या चूर्णाचें नस्य करावें आणि वेखंड फोपाट्यांत भाजून एक मासाभर वेखंड गुळांतून पोटांत द्यावें. विंचवावर यापैकीं फक्त वरील उपायच करावा.

इं. प्र.

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**—सर्व ऋतूंचें संनिपात सध्या मोठे मौजेचे आहेत. डोंगरची हवा, गारांचा पर्जन्य व सपाटीचा ग्रीष्म ऋतू हे अनुभवतांना पुष्करावर्तक मेघ व सौदामिनी यांचे चमत्कार ही मनुष्यास संसाराची अंतरंगें शिकवितात. प्लेगादि रोगही विरळ होत चालले आहेत.

**पुरीची यात्रा**—येत्या ४ थ्या जूनपासून २९ तारखेपर्यंत जगन्नाथ पुरी येथें स्नान जत्रा व रथजत्रा असे दांडगे समारंभ होत असतात; पण सध्या त्या भागाला लष्करी जरुरीच्या कामानिमित्त सर्व ने आण गुडसूच्या व्यापाऱ्यांची चालू आहे. त्यामुळें त्या यात्रेला जाणाऱ्या प्रवासी मंडळींनीं यंदाचा आपला बेत तहकूब करावा. म्हणजे त्यांस विनाकारण कष्टापदा भोगून यात्रा बुडाल्याची निराशा त्रास देणार नाहीं अशी सूचना मुद्दाम सरकारांतून काढण्यांत आली आहे. तिकडे यात्रेकरूंनीं लक्ष द्यावें.

**निर्यात**—कापसाचे गठ्ठे दरसाल मध्य प्रांतांतून जितके जातात, त्यापेक्षां वऱ्हाडांतून तितकेच किंवा त्यापेक्षां अधिक जात असतात; पण यंदाचें वऱ्हाडचें पीक रुपयांत चार आणे सुद्धां नसल्यामुळें आंकड्यामध्यें विलक्षण विपर्यास झाला आहे. एक रुईची गठडी ३॥ हंड्रेडवेटाची, या मानानें जेथें मध्यप्रांतातून ५६८५३ गठडी आक्टोबरच्या १ ल्या तारखेपासून १९ मे पर्यंत बाह्य मुलुखी रवाना झाली, तेथें वऱ्हाडचा आंकडा फक्त ११७०४ गठडी आहे.

**युद्ध कर्ज**—युद्ध कर्जाचे आकडे दर आठवड्यास हजारो रकमांनीं वाढत आहेत. तथापि लोकांच्या अंतर्गत दशेकडे पाहतां आम्ही असें सुचवितो कीं १९१७ चा हंगामाचा सुकाळ येईपर्यंत ही युद्ध कर्जाची कामगिरी तहकूब ठेवण्यांत यावी. जे श्रीमंत धनिक व पैसेवाले लोक आहेत, त्यांच्या संबंधाचा हा विचार नसून जो शेतकरी वर्ग एक हंगाम उत्तम लागला कीं लगेच श्रीमंतीनें नाचूं लागतो, त्यांना सध्या युद्ध कर्जासाठीं निदान सावकारी कर्ज काढण्याची पाळी न येईल अशी युद्धकर्ज गोळा करणाऱ्या अधिकाऱ्यास खुद्द आलिशान चीफ कमिशनर साहेबांनीं ताकीद काढावी अशी आमची विनम्र व अंतःकरणाची विनंति आहे.

**वकील मंडळी**—यवतमाळास २००० वर स्वराज्य संघाचे सभासद होतात व आकोला जिल्ह्यांत ही संख्या ७०० जवळ आहे. आणि या स्वराज्याच्या चळवळींत वकील मंडळीच विशेष पुढाकार घेत असतात. तेव्हा या हत्तीसाठीं येत्या कायदे कौंसिलच्या बैठकींत निराळे अंकुश काढण्यासाठीं आम्ही सिव्हिल सर्व्हिसचे ध्वज मिरविणाऱ्यास शिफारस करितो.

रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार डिपटि कमिशनर हे पुन्हां येथें येऊन दाखल होणार असें आकोल्याचे लोक बोलतात, आणि ते वर्धेला डिपटि कमिशनर होणार असें तिकडील लोक बोलतात. म्हणून आम्ही गेल्या शनिवारचे सरकारी गॅझेट पाहातों तर तेथें कांहींच उल्लेख नाहीं. चांगल्या माणसाविषयीं अशीच लोकांच्या विचारामध्यें स्पर्धा चालते. पण स्वराज्याच्या दृष्टीनें पाहतां हे नामधारी सिव्हिलियन ही नकोत किंवा सिव्हिलियनशाहींतले हे नेटिव्ह राजेही नकोत. तर या दोघांवर ही नियंत्रण करणारा निराळाच लोक कल्याणकारी अधिकारी पाहिजे.

'श्रीराम शालिग्राम' या नांवाचीं दुकानें वऱ्हाडांत सुप्रसिद्ध आहेत. त्या दुकानच्या मालकांपैकीं राजश्री फत्तेलाल शालिग्राम शेट यांस गेल्या गुरुवारीं धामणगांव येथें वयाच्या ६० व्या वर्षी देवाज्ञा झाली. पोकरणाच्या महेसरी मंडळीमध्यें हे मोठे अकलवान् व नशीब शिकंदर असून मध्यंतरीं ही दुकान थकली तेव्हां यांनींच बाणी राखून पुनः जम बसवून दिला. हे मारवाडी सभेचे उमरावती येथें अध्यक्ष ही होते. सार्वजनीक कार्यांत विशेष पुढें असून त्यांनीं आपले पुत्राचें स्मारक म्हणून एक धर्मार्थ दवाखानाही काढला आहे. असा कर्तृत्ववान् आत्मा आपल्या पुण्यसंपदा स्वर्गांत भोगून भावी जन्मक्रांतींत विशेष लोकोपयोगी होईल असें अनुमान निघतें.

## पत्रव्यवहार

श्री

श्रीक्षेत्र देऊळगांवराजा येथील श्रीमत् परमहंस नरहरी नाथांच्या प्रित्यर्थ चालत आलेल्या सांवत्सरीक उत्सवाचें यथामति संक्षिप्त निवेदन व मठाचें वर्णनः——

श्रीमत् नरहरीनाथ हे क्षेत्र पैठण येथील समाधिस्थ प्रसिद्ध राजयोगी सिद्ध पुरुष श्रीमत् शिवदिन केसरी यांचे वंशस्थ असून ते तीर्थ यात्रा करित करित ह्या क्षेत्रांत आले. महत्पुण्याइनें श्रीलक्ष्मी व्यंकटेशाचें चरणाजवळ त्याचा आयुष्य भानू संपला, तेव्हां अनायासेंच येथील आम्ना गंगेच्या तटाकीं त्यांचे देहास समाधि दिली गेली. त्यांचे कुलोत्पन्न सांप्रदायी श्री गणेशनाथ महाराजांनीं त्या समाधीवर चिरेबंदी इमारतीचें काम उभारून समाधीपुढें जो सभामंडप केला आहे त्याचे लांकडी काम सुबक झालें असून नक्षीदार आहे व बांधकाम पैठणांतील धर्तीवर झालेलें आहे. सभामंडपांतील जमिनीचा पृष्ठभाग संगमरवरी चिप्यांनीं आच्छादित केलेला असून त्यावर कुशल कारागिरानें नक्षी केलेली आहे. समाधीच्या मागच्या कमानींत श्री रुक्मिणीकांताची मूर्ती स्थापन केलेली आहे. समाधीच्या सन्मुख सभामंडपांतच श्री मारुतीरायाची मूर्ती विराजमान आहे. मठाचे बाहेर चौफेर आंबे, पिंपळ, औदुंबर, आंवळी, वड, वगैरे गगन चुंबित वृक्ष गेलेले आहेत, त्यांवर भारद्वाजादिक पवित्र पक्षी संतोषानें बसून आपल्या कंठरवानें मनुष्यांची मनें सुप्रसन्न करितात. तेथेंच नानातऱ्हेच्या सुगंधिक पुष्पांची वाटिका लावलेली आहे; तसेंच केळीं, संत्रे, रामफळें,

वगैरे मधुर फळांच्या झाडांची शिस्तवार लागवड झालेली आहे; मागच्या बाजूस बाहेरूनच गोड पाण्याची विहीर असून तिचें बांधकाम चुने गच्चीचें आहे. तीवर हौद, पंप वगैरे सोयी केलेल्या आहेत. जवळच स्वयंपाक घर बांधलेलें आहे. मठाच्या तटबंदीस लागूनच श्री आम्ना गंगेचा प्रवाह पश्चिमेकडून पूर्वेस वहात चाललेला आहे, त्यामुळें हें स्थान रम्य होऊन प्रेक्षणीय व दर्शनीय झालेलें आहे. मठाचे आंतून व बाहेरून चौंफेर स्वच्छता अक्षयीं ठेविली जात असते. समाधीचें अर्चन शास्त्रोक्त पद्धतीनें होत असून समाधी जवळ अक्षयीं नंदादीप जळत असतो. नगारखान्या करितां केलेल्या जागेवर नियमानें वाजंत्री वाजत असते. सारांश ह्या स्थानाच्या पवित्रतेचें दिग्दर्शन ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायांतील ओव्याः—

"जेथ आराणुकेचेनिकोडें। बैसालिया उठोंना वडे। वैराग्यासि दुणीव चढे। देखालिया जे॥६४॥ जोसंती बसविला ठावो। संतोषासि सावावो। मना होय उत्साबो। धैर्याचा॥ इत्यादि ओव्या १८० पर्यंतच्या अभिप्रायासी हुबेहूब लागूं पडतें.

मला ह्या क्षेत्रांत येऊन एक तप होऊन गेलें आहे शके १८२१ पासून ह्या ब्रह्मीभूत जिवात्म्याच्या पुण्यतिथीचा उत्सव मी पहात आहे. ह्या उत्सवास श्रीगणेशनाथ महाराजांकडून सुरुवात झालेली आहे; नाथ गणेश समाधिस्थ होऊन सुमारें अठरा वर्षें झालेली आहेत, त्यांची समाधि जवळच मठाच्या पुष्प वटिकेंत आहे. त्यावर बांधकाम करण्याची इच्छा सांप्रदायीक शिष्य मंडळीची आहे. श्री गणेशनाथाचे चिरंजीव श्रीमंत गौतमनाथ यांचेकडून हा उत्सव प्रतिवर्षी वाढत्या प्रमाणावर होत असतो. मोगलाई, खानदेश, व वऱ्हाड ह्या प्रांतांतून बरीच शिष्यमंडळी उत्सवाकारितां येत असते, ह्यांत कांहीं सत्शिष्य जहागीरदार, देशमूख, रावबहादूर, रावसाहेब, असे पदवीधर आहेत. श्रीमंत नरहरी नाथांचे प्रसिद्ध शिष्य महिपती महाराज यांची समाधि ग्वालेरास असून तेथें प्रतिवर्षी उत्सव होत असतो. देऊळगांवांतील श्री नरहरी नाथांच्या उत्सवाप्रीत्यर्थ शिष्य व भाविक मंडळी कडून धान्याची, वस्त्राची, व रोख नगदी पैशाची देणगी येत असते. उत्सवांतील अन्नदानास पुरेसे तांदूळ श्री लक्ष्मी व्यंकटेश संस्थानांतून मिळत असतात. नरहरी नाथांचा उत्सव माघ वद्य १० पासून महाशिवरात्री पर्यंत चालू असतो. उत्सवाचा उपक्रम—समाधीस रुद्राभिषेक, पुराण, कीर्तन, गायन भजन व अन्न संतर्पण याप्रमाणें चालतो; शेवटीं द्वादशीचे रात्रीं मठाचे आंतील सभामंडपांत अप्रतीम रोषनाई करण्यांत येऊन त्या रात्रीं संस्थानचे गादीवर असलेले श्रीमंत गौतमनाथ स्वतः गळ्यांत सैली, सिंगी, पुंगी, धारण करून, पायांत तांब्याचा तोडा घालून कंबरेस भरजरी शालू खेंचून, शिरवर मोतियारंगी पगडी घालून अंगांत तटतटींत शुभ्र अंगरखा व मुख भस्म चर्चित अशा प्रकारें नाथ पंथास उक्त असा सुरेख पेहेराव गौतम महाराज धारण कारितात व प्रसन्न मुद्रेनें 'मिळोनी मिळतची असे, समुद्रीं गंगाजळ जैसे, मी होऊनी मज तैसे, भजती ह्या उक्तीप्रमाणें कीर्तन कारितात; ह्यावेळीं त्यांचे मुखांतील शद्बांची स्फूर्ति पुढील ओव्यांना अनुसरून असते—माझा मराठाचि बोलू कौतुकें। परि अमृतातें ही पैजा जिंके। ऐसी अक्षरें रासिकें मेळवीन॥ इत्यादि. त्यावेळीं सभा मंडपांत बसलेला श्रोतृ समुदाय महाराजांचे प्रसादिक शद्ब ऐकून तितक्या पुरता तरी देहभाव विसरतो. नंतर रात्रीं दोन वाजतां आरती झाल्यावर गौतम महाराज स्वतः काल्याचा प्रसाद वाटतात, त्याच वेळीं सांप्रदायीक शिष्य मंडळीस, शिष्ट ब्राह्मणांस व गृहस्थांस सन्मानार्थ नारळ दिले जातात, प्रसंग विशेषीं हरिदास, पुराणिक वैदिक यांस योग्य दक्षिणा देऊन संभावना केली जाते. दुसरे दिवशीं महाशिवरात्रीस सायंकाळीं चार वाजतां श्रीमंत नाथ शिवदिन यांच्या पादुकांची मिरवणूक पालखींतून होत असते. पालखी इंदूर सरकार कडून मिळालेली आहे. श्री पार्वतीसह आदिनाथांची मूर्ती पालखींत भरजरी गादीवर बसवितात, पालखीचें काम सुबक असून रंगीबेरंगी घोंटलेलें आहे. पिंजरीचें काम किनखाबी व भरजरीचें आहे. आंतून कलाबतू गोंडे लाविलेले असून चौफेर जाळीदार झालर ही लावलेली असते. पालखीच्या दांडीस दोहों बाजूंकडून चांदीचे सिंहमुखी खोबळे बसविलेले आहेत पालखीची मिरवणूक निघतेवेळीं श्री आदिनाथांच्या मनोहर मूर्तीवर व शिवदिनांच्या पादुकांवर मौल्यवान छत्र्या, अबदागिरी. चवऱ्या मोरचल डोलत असतात, निशाणेही बरोबर असतात, पालखीपुढें भजनाच्या दिंड्या, नौबदी डंके व सुस्वर वाजंत्री वगैरे वाजत असून मिरवणूक मोठ्या थाटानें रमत रमत चालून समागमे गांवचे राजे, हरिदास, पुराणीक, वैदिक, शेटसाहू आदिकरून सर्व जनसमुदाय चालत असतो व सर्वतो मुखीं जयघोष "श्री नरहरी नाथ महाराजकी जय" असा चालू असतो. कांहीं अंतरावर आम्नानदीचें वाळवटांत मृगासन केलेलें असतें. त्यावर पालखी बसवितात. आसपासच्या खेड्यांतून ही बहुतेक जातींचे लोक ह्या समारंभास येतात. मठाच्या चौफेर स्त्रियांचा समुदाय उभा राहून त्यांस पालखीची मिरवणूक चांगली पाहतां येते. गतवर्षीपासून स्त्रियांनाही पालखीजवळ जाऊन मूर्तीचें दर्शन घेतां यावे अशी तजवीज टेविली जाते. यंदा प्लेगचा आजार देऊळगांवास जोराचा झाल्यामुळें सुमारें चारशें लोक मुत्युमुखीं पडले ह्मणून असें वाटत होतें कीं परिस्थिति प्रतिकूल झाल्यामुळें समारंभास कांहीं न्युनत्व येते कीं काय? पण तसें कांहीं न होता उलट सालाबादपेक्षां लोकसमूह जास्त जमून आम्ना नदीचें पात्र गच्च भरून गेलें होते. ईश्वराची लीला अगाध आहे. मृगासनावरून पालखी मठाचें आवारांत नेतेवेळीं फाटका पाशीं श्रीमत् गौतमनाथाची भार्या अगर त्यांची भामजय ताटांत मंगल पदार्थ आणून श्री आदिनाथास ओवाळितात. ती शोभा जसी वधूची आई ज्याप्रमानें व जिव्हाळ्यानें सिमंत पूजनानंतर वरास ओवाळिते त्याप्रमाणेंच मंगल असून गृहस्थाश्रमी राजयोगी पुरुषास शोभणाऱ्या मौल्यवान वस्त्राभरणासहित लावण्यवती सुवासिनीचे तें ओवाळणें ज्यांत ईश्वरी तेजाची चमक असल्यामुळें फार प्रेमळ व प्रेमाश्रु उत्पन्न करणारें दिसतें.

यंदा विशेष चमत्कार पाहण्यांत आला तो हा कीं येथील श्री लक्ष्मीकांता सन्निध नवसाचीं मंगल कार्यें बाहेर गांवाहून येतात. तशाच रितीनें बाहेर गांवाहून दोन मुंजीची कार्यें येऊन नाथांच्या समाधिसान्निध्य झाली. ही विज्ञापना.

चैत्र शु॥ १ | नाथ सांप्रदायीक
अनन्य सेवक
शके १८३९ | त्र्यंबकराव वाजपेय

---

# Notice

MURTIZAPUR THE 10 TH
MAY 1917

Notice is bereby given that the Municipal Committee of Murtizapur, in the Akola District, proposes, under Section 116, Sub-Section (1), clause (j) and Section 116, Sub-Section (2), of the Berar Municipal Law, 1886, to make the following rules for dealing with nuisances committed within the limits of the Murtizapur Municipality.

The proposed rules will be taken into consideration on the expiry of one month from the date of the first publication of this notice, and any objections or suggestions in respect thereof must be forwarded to the Secretary to the Committee before the expiry of the said period.

RULES.

1 No person shall perform the offices of nature in any public road, drain or chanuel, or in any place of public resort or in their vicinity or in any abandoned site or any open place not specially set apart by the Committee for the purpose, and no parent or guardian of any child under the age 10 years shall, unless on the ground of the child's ill-health, allow such child to perform the offices of nature in any such place.

(2) No person shall sell or offer for sale as human food any mea which is unfit for human consumption.

(3) Every breach of any of the foregoing rules shall be punishable with fine which may extend to fifty rupees, or, when the breach is a continuing breach, with further fine which may extend to five rupees for every day after the first during which the breach continues.

B. M. Pandit.
Secretary Municipal Committee
Murtizapur.

No. N.235

---

## नोटीस

नोटीस कलम ११ आक्ट ८ सन १८९० प्रमाणें.

किर. दिवाणी मुकद्दमा नंबर ३७ सन १९१७ इ.
विद्यमान डिस्ट्रीक्ट जज्ज साहेब यांचें कोर्ट

मुक्काम आकोला

नांव संपत
बापाचें नांव खुशाल
जात कुणबी राहणार भाडगणी
तहसील मल्कापूर जिल्हा बुलढाणा
ह्या अल्पवयी सिती मर्द पंढरी
उमर वर्षें ९ अंदाजा
राहणार शिरसोद ता. बऱ्हाणपूर तहसिलीचे (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालनकर्ता (१) नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं—

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं सदहू अर्जदारानें सदहू अल्पवयीचें (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालन कर्ता नेमला जाण्या विषयीं अर्ज केल्यावरून सदहु अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख ७ माहे जुलै सन १९१७ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदहू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांना जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर झाले पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख ७ माहे मे सन १९१७ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्या निशीं दिली.

सही
R. W. Paranjape
ॲ. डि० जज्ज for डि. जज्ज
पश्चिम वऱ्हाड
आकोला

नो. नं. २३१

---

## जाहीर नोटीस

सकसेशन स. नं. ९ सन १९१७
चौ. ता. २३-६-१९१७
विद्यमान सिनीयर सब जज्ज साहेब ब. कोर्ट आकोला

अर्जदार

सिताबाई जवजे रामचंद्र देव ब्राह्मण राहणार माना ता. मुर्तिजापूर जि. आकोला

सर्व लोकांस या नोटिशीनें जाहीर करण्यांत येते कीं:—

सदहू अर्जदार इनें आमचे कोर्टांत मयत रामचंद्र भवानराव देव याचे इस्टेटीबद्दल कोणी वारस नसून फक्त त्याची बायको अर्जदार हीच मालक आहे. सबब तिला सकसेशन सरटिफिकीट मिळण्याबद्दल तिनें अर्ज केला आहे. तरी सदहू इस्टेटीशीं ज्यांचा हक्क संबंध असेल त्यानीं आपल्या पुराव्या निशीं आमचे कोर्टांत ता. २३-६-१७ रोजीं सकाळचे १० वाजतां हजर राहावें. सदहू तारखेवर कोणी हजर न झाल्यास दुसरे कोणी वारस नाहीं असें समजून अर्जदार इला सकसेशन सरटिफिकीट दिलें जाईल. हें या नोटिशीनें जाहीर करीत आहे कळावें. ता. १३-४-१७

सही
N. G. Subhedar
Senior Sub Judge
Akola

N. N.237

## नोटीस

ाई मर्द कृष्णाजी राऊत राहणार तालुका मुर्तिजापूर यांसः—

ाँ सही करणार यांनकडून कळवि- येते कीं तुह्मी माझ्या सख्या चु- वाच्या विधवा आहा. तुह्मी देखील असाल किंवा नुकत्याच सज्ञान झाला तुह्माला तुमचा भाऊ फरेफ देतो त्याच्या सांगण्यावरून तुमच्या जवळून लोकांनीं पुष्कळ जिन्नगी लांबविली कृष्णाची मयत होण्यापूर्वी तोच ालनपोषण करीत असे. मरतेसमयीं चार पंचासमक्ष तुह्मास सांगितलें ाच आपला मुलगा आहे यालाच आणि दत्तकवगैरे कांहीं घेऊं नये. माचें उल्लंघन तुमच्याकडून करवि- तुमच्या भावाचा हेतु दिसतो. सर्व जिन्नगी त्याच्या घरीं गेली आहे ाक सांगतात. तुह्माला सर्व जिन्न हिशोब द्यावा लागेल. तुह्मी दत्तक याल तर तो हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें रद्द ही नोटीस पोचल्यानंतर आठ दिव- आंत गांवच्या पंचासमक्ष सर्व जि- हिशोब द्यावा. असें करण्यास तर दिवाणी कोर्टामार्फत दावा योग्य ती दाद मिळविण्यांत येईल. ता. २३ मे १९१७.

सही

चंपत वा। पुंजाजी पाटील राहणार सोमठाणे दस्तुर खुद

नो. नं. २२९

## नोटीस

रा. 'रामगोपाल तेजमल्ल' दुकान व हिवाटदार मालक फौजराज गुला- मारवाडी राहणार तेल्हारें तालुका यांसः—

ाँ सही करणार यांनकडून नोटिस येते कीं, ता. २७ नोवेंबर १९१६ ्दीलाल वा। दुःखीलाल परदेशी तेली ा मौजे सायखेडे परगणे जामोद जळगांव जिल्हा बुलढाणा येथील र्हे नंबर १६८ पोट हिस्सा नंबर १ १६ हें सातशे रुपयांस दुसऱ्या ातासह एक हजार रुपयांस खरिदी ारिदीखत लिहून नोंदून घेतलें आहे. ाद हिस्सा पडित असून आह्मास तो प्रकारें वहितीस आणावयाचा आहे. जर हा घ्यावयाचा असेल तर तुह्मी ारील किंमत रुपये सातशे देऊन घ्यावा. आह्मी खरिदीखत करून तयार आहों. या गोष्टीला मुदत ाोटीस पोचल्या तारखेपासून ८ दिवसां ादिली आहे. या मुदतीनंतर तुमचा ाांहीं हक्क चालणार नाहीं. कळावें ाे मे १९१७

सही

१ नथु वा। आकाजी गुमरे राहणार टुणकी जहागीर दस्तुर खुद

नो. नं. २३०

## जाहीर नोटीस

ाो लक्ष्मण काळे राहणार रिसोड वाशिम यानें मजजवळून निव्वळ ाऊन २९० चा प्रा. नोट करून

घेतली आहे, ती रद्द असे.

सही

वासुदेव बाळकृष्ण शितुत.

नो. नं. २३१

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, माझा वडील मुलगा नामें पांडु वा। उदेभान होले कुणबी राहणार मौजे थेकोरी तालुके दर्यापूर जि. उमरावती हा सरासरी १६-१७ वर्षाचा असून तो अद्याप सज्ञान झालेला नाहीं. तो व्यसनी निघाला ह्मणजे गजांया दारू वगैरेच्या नादी लागला. मी असे ऐकितो कीं, त्यास कोणी बुडविण्याचे इरादानें कर्ज देत आहे. त्यास जो कोणी कर्ज देईल तर त्याची जबाबदारी त्याजवर आहे. कर्जाची जबाबदारी अज्ञानाचे इस्टेटीवर नसून पैसे देणारा त्याजबद्दल जबाबदार होईल. अज्ञानाचा पालन कर्ता मी आहे. तरी माझे अनुमता शिवाय कोणीही त्यास पैसा देऊ नये. कळावें. ता. १९-५-१९१७ इ. दस्तुर पांडुरंग विठ्ठल पातुरकर राहणार दर्यापुर

सही

१ नि॥ उदेभान वा। चंद्रभानजी होले कुणबी राहणार थेकोरी याचा आंगठा दस्तुर पांडुरंग

नो. नं. २३२

## नोटीस.

रा. रा. कृष्णराव मुकुंदराव देशमुख रा. मुंडगांव तालुके आकोट यांसः—

खाली सही करणार यांनकडून नोटीस देण्यांत येते कीं, माझे बापाचे हातच्या कर्जाच्या सन १९२५-२६ साल्च्या दोन २ किस्ती व्याजासुद्धां मी घेऊन आको असतां तुह्मी सदर्हू दोन्ही किस्तीची रक्कम घेतली नाहीं. करितां तुह्मास या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं, तुमची पडीत दोन २ किस्तीची रक्कम रामदत्त किसन दयाल साहु दुकान मुंडगांव ता. आकोट यांचे दुकानीं ठेविली आहे. तरी हिशोब करून व्याजासुद्धां सदर्हू दुकानाहून दोन्ही २ किस्तीची रक्कम घेऊन जावी. नाहींतर नोटीस पावल्या तारखे पासून पडीत किस्तीचे व्याज तुह्मास मिळणार नाहीं. ही नोटीस दिली सही ता. १०-५-१७ इसवी

सही

१ शेखमहमद वा। शेखअल्लु बागवान राहणार मुंडगांव ता. आकोट निशानी खुद हातची असे

नो. नं. २३३

## जाहीर नोटीस.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं ता. ७-५-१९१७ रोजी रात्रौ आह्मी मौजे झाडगांवावरून यवतमाळला जात असतां झाडगांव राळेगांव चे दरम्यान आमचे कपड्याचे गाठोडें व त्यांत असलेले लहानसे दफ्तर गाडींतून पडून गमावल्या गेले. त्यांत एक कोइमतुरी जरीचा फेटा १ पांढरा कोशाचा कोट १ रेशीमकाठी उपरणें १ पान आणि लाल खारव्याचे लहानसे जुगदान त्यांत त्रिंबक गुजाबराव व व्यंकटेश गुजाबराव यांचे दरम्यान झालेली हिश्याची फर्दी, लागवण पत्रक, हिशोबाचे व आणखी इतर कागद होते. राळेगांव पोलीस स्टेशनांत वर्दी देऊन आह्मी आसपास पुष्कळ शोध केला. परंतु अजूनपावेतो मिळाले नाहीं, तरी ज्याला हें गाठोडे मिळाले असेल किंवा जो शोध लावून आणून देईल त्याला आह्मी २५ पंचवीस रुपये इनाम देऊं कळावें. ता. ११-५-१९१७ इसवी सही

रामराव व्यंकटेश देशपांडे रा. झाडगांव प्र. राळेगांव ता. केळापूर जि. यवतमाळ वऱ्हाड

**ताजा कलम**— जरी कपडे पत्यास न लागेल तरी जो कागद पत्रासह दफ्तर आमचे हवाली करील त्यास ही वरील इनाम मिळेल कळावें. ता. ११-५-१९१७

नो. नं. २३४ रामराव देशपांडे


पैसा मिळविण्याची नवी विद्या शिका.

## क्रोमोपॅथी इंस्ट्रक्टर

अर्थात्



## वर्णजलचिकित्सा–शिक्षक.

ज्या दिव्यौषधीच्या प्रभावानें आज युरोप, अमेरिकेसारख्या सुधारलेल्या देशांत सुद्धां नाना तऱ्हेचीं औषधें घेऊन कंटाळलेले हजारों असाध्य रोगी रोगमुक्त होत आहेत, त्या अपूर्व विद्येची सप्रमाण व सप्रयोग माहिती ह्यांत दिली असून ही गुप्त पण अगदीं सोपी विद्या प्रत्येकानें अवश्य शिकून कधीं न संपणारा व हटकून गुण देणारा दिव्यौषधींचा दवाखाना उघडावा! रोगग्रस्तांना नवजीवन प्राप्त करून द्या! पैसा व कीर्ति मिळवा. किं अवघी ८८, व्ही. पी. नें ८१०. जरूर मागवाच.

प्रो. ज्ञानमित्र, शनवार पुणें सिटी.

नो. नं. १९९



ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भसंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मुत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुळांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळंतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व लहान भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळीच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवशांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३१ गो० १ रु० ७१ गो० २ रु० १९१ गो० ४ रु० २७१ गो० ६ रु० ५१० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—पानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्राचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांची आग, सकाच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० कि० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवू.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीचीं असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी, पो० हर्णै, जिल्हा रत्नागिरी.

नो० नं० २२


हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.